
SMART
PARTNERSHIP FOR PROSPERITY

THE WORLD BANK

## मा .बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प

# सुलभकर्त्यासाठी मार्गदर्शक पुस्तिका

## लिंगभाव संवेदनशीलता आणि कृषि क्षेत्रात महिलांचा सहभाग



## मार्गदर्शक



**श्री. धीरज कुमार**
**आयुक्त, कृषि - महाराष्ट्र राज्य, पुणे**



**श्री. दशरथ तांभाळे**
कृषि संचालक, आत्मा
कृषि विभाग, महाराष्ट्र शासन



**श्री. ज्ञानेश्वर बोटे**
अति. प्रकल्प संचालक,
PCMU, स्मार्ट प्रकल्प

## विषय तज्ञ



**श्री. जीवन बुंदे**
समन्वयक (M&E),
PCMU, स्मार्ट प्रकल्प



**डॉ. संगीता शेटे**
समाज विकास विशेषज्ञ,
PCMU, स्मार्ट प्रकल्प

तांत्रिक सहाय्य : प्रायमूव्ह, पुणे

# अनुक्रमणिका


प्रकरण १ मार्गदर्शन पुस्तिकेविषयी........................................................................४

प्रकरण २ प्रशिक्षणाविषयी संक्षिप्त माहिती ..............................................................७

प्रकरण ३ प्रशिक्षणाची रूपरेखा..............................................................................९

प्रकरण ४ प्रशिक्षणाचे वेळापत्रक............................................................................ १४

प्रकरण ५ सत्र क्र. १.१ वातावरण निर्मिती ................................................................ १६

प्रकरण ६ सत्र १.२ लिंगभेद आणि लिंगभाव .............................................................. २१

प्रकरण ७ सत्र १.३ लिंगभाव: काही महत्त्वाच्या संकल्पना............................................... २५

प्रकरण ८ सत्र १.४ सत्ता आणि विशेषाधिकार ............................................................ ३२

प्रकरण ९ सत्र १.५ लिंगभाव मापदंड (Gender Norms)............................................... ३९

प्रकरण १० सत्र २.१ - पहिल्या दिवसाची उजळणी ....................................................... ४३

प्रकरण ११ सत्र २.२ कृषि क्षेत्रातील लिंगभाव समस्या................................................... ४४

प्रकरण १२ सत्र २.३ लिंगभाव विश्लेषण: संकल्पना आणि साधने ....................................... ४७

प्रकरण १३ सत्र २.४ लिंगभाव विश्लेषण: छोट्या गटांमध्ये अभ्यास ..................................... ५९

प्रकरण १४ सत्र २.५ लिंगभाव विश्लेषण: छोट्या गटांचे सादरीकरण आणि माहितीचे विश्लेषण ....... ६१

प्रकरण १५ सत्र २.६ बेस्ट प्रॅक्टिसेस आणि केस स्टडी...................................................... ६४

प्रकरण १६ सत्र २.७ कृषि मूल्यसाखळीच्या मुख्य प्रवाहात महिला ...................................... ६८

प्रकरण १७ सत्र ३.१ दुसऱ्या दिवसाची उजळणी.......................................................... ७२

प्रकरण १८ सत्र ३.२ स्मार्ट प्रकल्पाची जेंडर स्ट्रॅटेजी ....................................................... ७३

प्रकरण १९ सत्र ३.३ कृषि खात्याच्या कार्यक्रमांचे जेंडर समावेशक नियोजन........................... ७९

प्रकरण २० सत्र ३.४ कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ - (प्रतिबंध, मनाई, आणि निवारण): अधिनियम २०१३........................................................................................ ८२

प्रकरण २१ सत्र ३.५ प्रशिक्षणार्थींची प्रशिक्षणातील विषयांची तयारी.................................... ९०

प्रकरण २२ सत्र ३.६ प्रशिक्षणार्थींचे सादरीकरण ........ ९२

प्रकरण २३ सत्र ३.७ समारोप ........ ९३

प्रकरण २४ परिशिष्ट ........ ९४

# प्रकरण १ मार्गदर्शन पुस्तिकेविषयी

**प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण पुस्तिकेची तोंडओळख व्हावी यासाठी पुस्तिका तयार करण्यामागील उद्देश, लक्षित गट, पुस्तिकेची रचना इ. बाबतची माहिती या भागात दिली आहे.**

## १.१ प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाने राज्यात जागतिक बँकेच्या सहाय्याने मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पाच्या अंमलबजावणीस प्रारंभ केला आहे. लहान आणि सिमांत शेतकरी तसेच कृषी नव उद्योजकांना केंद्रस्थानी ठेऊन प्रमुख पिकांच्या सर्वसमावेशक व स्पर्धात्मक कृषी मुल्यसाखळया विकसित करणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी शेतकऱ्यांचा समावेश असणाऱ्या समुदाय आधारित संस्थांनी (CBO) पिकाच्या मुल्यसाखळीतील अंतीम खरेदीदारांशी भागीदारी करून समुह पातळीवर शेती/ शेतीशी निगडीत क्षेत्रात व्यवसाय उभारून व तो चांगल्या पध्दतीने चालवून संस्थेच्या सभासदांचा निव्वळ नफा वाढविण्यासाठी काम करणे अभिप्रेत आहे. प्रकल्पांतर्गत यासाठी मुख्यत्वे उत्पादक भागीदारी उपप्रकल्प, बाजारपेठ संपर्क वाढीसाठीचा उपप्रकल्प, पुरक व नाविन्यपूर्ण गुंतवणूकीसाठीचा उपप्रकल्प, गोदाम आधारित उपप्रकल्प इत्यादीच्या माध्यमातून समुदाय आधारीत संस्थांना सहाय्य (तांत्रिक सहाय्य, पायाभूत सुविधा उभारणीसाठी अनुदान) करण्याचे प्रस्तावित आहे.

STATE OF MAHARASHTRA'S AGRIBUSINESS AND RURAL TRANSFORMATION PROJECT
SMART
PARTNERSHIP FOR PROSPERITY

कृषि मुल्यसाखळीमध्ये महिलांचा सहभाग हा मुख्यत्वे पीक उत्पादनामध्ये (पिक काढणीपर्यंतच्या कामामध्ये) आढळून येतो. कृषि उत्पादनांच्या प्रक्रियेत स्त्रिया उत्पादक आणि कामगार अशी दुहेरी भूमिका पार पाडतात. काढणीपश्चात व्यवस्थापन, विपणन (सामूहिक, घाऊक विक्रेते, अधिकृत विक्रेते, किरकोळ विक्रेते, निर्यातदार) भूमिकांमध्ये प्रामुख्याने पुरूषांचे वर्चस्व असून या क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग अत्यल्प आहे. स्मार्ट प्रकल्पाद्वारे महिलांच्या शेतकरी उत्पादक संस्था तयार करणे, त्यांचा काढणीपश्चात व्यवस्थापन व विपणन प्रक्रियेत सहभाग वाढवणे, आणि त्या अनुषंगाने त्यांची क्षमता बांधणी करणे यावर विशेष भर देण्यात आला आहे.

लिंगभाव समावेशक (जेंडर इन्क्लुजिव) कृषि मूल्यसाखळी विकसित करण्यासाठी महिला कृषि उद्योगांच्या आणि एकंदरित कृषि क्षेत्राच्या मुख्य प्रवाहात असणे गरजेचे आहे. सर्वसमावेशक आणि स्पर्धात्मक कृषिमूल्यसाखळीत स्त्रियांचा सहभाग वाढवणे आणि त्यांची क्षमता बांधणी करणे या प्रक्रियेत कृषि खात्याच्या कर्मचाऱ्यांची भूमिका महत्त्वाची आहे. कृषि खात्याच्या कर्मचाऱ्यांना जेंडर मेनस्ट्रीमिंग (Gender Mainstreaming) - महिलांना कृषि क्षेत्रात मुख्य प्रवाहात आणणे) ची संकल्पना स्पष्ट असणे, आणि ती अंमलात आणण्याचे ज्ञान आणि कौशल्य असणे या बाबी प्रकल्पाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी महत्त्वाच्या आहेत. या पार्श्वभूमीवर कृषि क्षेत्रात सहभागी होण्यात स्त्रियांना कोणत्या अडचणी येतात याबाबत महिलांशी चर्चा करून कृषि खात्यातील अधिकाऱ्यांनी नियोजन करणे अपेक्षित आहे.

सर्वसमावेशक आणि स्पर्धात्मक कृषिमूल्यसाखळीत महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी कृषि खात्यातील कर्मचाऱ्यांध्ये लिंगभाव (जेंडर) याविषयी जागरूकता निर्माण करणे, कृषि खात्याच्या कर्मचाऱ्यांची लिंगभाव संवेदनशीलता वाढवणे, आणि कृषि खात्यात संस्थात्मक पातळीवर लिंगभाव संवेदनशीलता वाढावी यासाठी सुधारणा करणे असे स्मार्ट प्रकल्पाचे बहुविध उद्देश आहेत. तसेच कृषी खात्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी लिंगभाव समावेशक (जेंडर इन्क्लुजिव) पद्धतीने करणे हा उद्देश डोळयांसमोर ठेऊन कृषि खात्याच्या ५० तज्ज्ञ प्रशिक्षकांना (मास्टर ट्रेनर्स) 'लिंगभाव संवेदनशीलता आणि कृषिक्षेत्राच्या मुख्य प्रवाहात महिलांचा सहभाग' याविषयी तीन दिवसांचे प्रशिक्षण देण्याचे नियोजीत आहे. हे तज्ज्ञ प्रशिक्षक कृषि खात्याच्या अन्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देतील.

## १.२ मार्गदर्शक पुस्तिकेचा उद्देश

कृषि खात्यातील तज्ज्ञ प्रशिक्षकांना (मास्टर ट्रेनर्स) कृषि खात्यातील कर्मचाऱ्यांसाठी तीन दिवसांचे 'लिंगभाव संवेदनशीलता आणि कृषि क्षेत्रात महिलांचा सहभाग' या विषयाचे प्रशिक्षण घेण्यास मदत करणे हा या मार्गदर्शक पुस्तिकेचा मुख्य उद्देश आहे. या पुस्तिकेमध्ये प्रशिक्षणाची उद्दिष्टे, प्रशिक्षणाच्या विविध पद्धती, माहिती देण्याचे प्रमुख मुद्दे, सत्र परिणामकारक होण्यासाठीची प्रक्रिया, आणि संदर्भ साहित्य अशी माहिती विस्ताराने देण्यात आली आहे. या माहितीमुळे प्रशिक्षणातल्या प्रत्येक सत्राचे नियोजन, सत्राचे संचालन, आणि प्रशिक्षणाचे मूल्यमापन करण्यास तज्ज्ञ प्रशिक्षकांना मदत होईल.

## १.३ मार्गदर्शक पुस्तिकेतील विषय

प्रशिक्षणासाठी अपेक्षित असणारे प्रशिक्षणार्थी कृषि खात्याचे अधिकारी आणि कर्मचारी आहेत. सदर बाब विचारात घेऊन या पुस्तिकेत मुख्यत: लिंगभेद आणि लिंगभाव संकल्पना, सत्ता आणि विशेषाधिकार, कृषी क्षेत्रातील महिलांचा सहभाग लिंगभाव विश्लेषण स्त्रियांचा कृषी मुल्यसाखळीतील सहभाग, स्मार्ट प्रकल्पाची जेंन्डर स्टॅटजी इत्यादी विषयाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. यासोबतच प्रशिक्षणाची उद्दिष्टे आणि सर्वसाधारण वेळापत्रक यांचाही पुस्तिकेत अंतर्भाव आहे. शिवाय प्रत्येक सत्रांविषयीची पुढील माहिती सविस्तर दिली आहे.

- सत्राचे उद्दिष्ट,

- सत्राला लागणारा वेळ,
- सत्रातला विषय शिकवण्यासाठी वापरायच्या पद्धती,
- सत्राचे वेळापत्रक,
- सत्रासाठी लागणारे साहित्य,
- विषयाचे सविस्तर विवेचन

तसेच प्रशिक्षणपूर्व आणि प्रशिक्षणोत्तर चाचणी, प्रशिक्षण हजेरीपत्रक आणि प्रशिक्षण मूल्यमापनासाठीचा फॉर्म याही गोष्टी या पुस्तिकेत आहेत.

## १.४ प्रशिक्षणाच्या पद्धती

या पुस्तिकेत प्रशिक्षणाच्या खालील विविद्ध पद्धती वापरल्या आहेत. यातल्या बहुसंख्य प्रशिक्षण पद्धतींमध्ये सहभागी पद्धत अपेक्षित आहे. प्रशिक्षणार्थींना विचारविनिमयात, चर्चेत सहभागी होण्याची संधी मिळावी या हेतूने छोट्या गटांत चर्चा हे देखील माध्यम वापरले आहे. प्रशिक्षणाच्या पद्धतींचे संकलन याप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| • दृकश्राव्य साधने (Audio visual clips)<br>• विचारविनिमय (Brainstorming)<br>• अनुभवकथन (Experience sharing)<br>• खेळ (Games)<br>• पॉवर पॉइंटच्या साहाय्याने व्याख्यात्याने माहिती देणे (Inputs with the help of Power Point Presentations (PPT))<br>• मोठ्या गटात चर्चा (Large group discussions (in plenary) | • प्रत्यक्ष कृतीतून शिकणे (Learning by doing through presentation of various topics)<br>• एकमेकांकडून शिकणे (Peer review and peer learning)<br>• छोट्या गटांत चर्चा (Small group work and discussions)<br>• प्रशिक्षणार्थींचे सादरीकरण (Presentation by Participants)<br>• उजळणी (Review of Learning) |

******

# प्रकरण २ प्रशिक्षणाविषयी संक्षिप्त माहिती

**या प्रकरणाच्या अभ्यासानंतर आपणास प्रशिक्षण आयोजनाचा उद्देश, लक्षित गट, प्रशिक्षणातील प्रमुख सत्रे, इत्यादी बाबतची संक्षिप्त माहिती मिळेल.**

| क्र | घटक | तपशील |
|---|---|---|
| १. | **शिर्षक** | **लिंगभाव संवेदनशीलता आणि कृषिक्षेत्रात मूल्यसाखळीच्या मुख्य प्रवाहात महिलांचा सहभाग** (Gender Sensitization and Gender Mainstreaming in Agriculture) |
| २. | **प्रशिक्षणाची उद्दिष्टे** | • लिंगभावाच्या मूलभूत संकल्पनांविषयी प्रशिक्षणार्थींची जाण वाढणे.<br>• कृषि क्षेत्रात असलेल्या जेंडरविषयक समस्यांचा प्रशिक्षणार्थींना परिचय होणे.<br>• लिंगभाव विश्लेषण संकल्पना आणि साधनांची ओळख होणे.<br>• कृषि क्षेत्रात महिलांनी मुख्य प्रवाहात सामील व्हावे या प्रयत्नांसाठी कृषि खात्याच्या कर्मचाऱ्यांना अधिक माहिती, कौशल्ये, आणि योग्य तो दृष्टिकोन मिळावा यासाठी प्रशिक्षणार्थींना मदत करणे. |
| ३. | **प्रशिक्षणार्थींची संख्या** | २५ - ३० |
| ४. | **प्रशिक्षणार्थी कोण आहेत** | कृषि खात्याचे अधिकारी आणि कर्मचारी |
| ५. | **प्रशिक्षणाचा कालावधी** | ३ दिवस |
| ६. | **सत्रांविषयी संक्षिप्त माहिती** | **प्रशिक्षणात पुढील विषयांवर सविस्तर माहिती देण्यात येईल. सविस्तर वेळापत्रक प्रकरण ३ मध्ये आहे.**<br>• प्रशिक्षणासाठी आवश्यक वातावरणनिर्मिती<br>• लिंगभेद आणि लिंगभाव संकल्पना<br>• लिंगभाव या विषयातील महत्त्वाच्या संकल्पना<br>• सत्ता आणि विशेषाधिकार<br>• कृषि क्षेत्रात महिलांच्या सहभागातील अडचणी<br>• लिंगभाव विश्लेषण संकल्पना आणि साधने<br>• लिंगभाव विश्लेषण - छोट्या गटांत अभ्यास आणि सादरीकरण<br>• स्त्रियांचा कृषिमूल्यसाखळीत सहभाग<br>• स्मार्ट प्रकल्पाची जेंडर स्ट्रॅटेजी<br>• बेस्ट प्रॅक्टिसेस आणि केस स्टडीज<br>• कृषि खात्याच्या कार्यक्रमांत आणि उपक्रमांमध्ये जेंडर |

| | | |
|---|---|---|
| | | मेनस्ट्रीमिंगचा अंतर्भाव<br>• कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ - (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) - अधिनियम २०१३<br>• प्रशिक्षणार्थींचा प्रशिक्षण घेण्याचा सराव<br>• कृतीद्वारे शिक्षण, आणि प्रशिक्षण देण्यासाठीची आवश्यक कौशल्ये |
| **७.** | **प्रशिक्षणाचे वेळापत्रक** | प्रकरण ३ मध्ये |
| ८. | **प्रशिक्षक होण्यासाठी आवश्यक असलेला अनुभव व कौशल्ये** | • कृषि क्षेत्रातील जेंडरच्या प्रश्नाविषयी चांगली समज असावी.<br>• लिंगभाव संवेदनशीलता या विषयावर किमान एका प्रशिक्षणात सहभाग असावा (प्रशिक्षणार्थी या नात्याने).<br>• अंतर्मुख होण्याची आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता असावी.<br>• प्रशिक्षणार्थींचे बोलणे लक्षपूर्वक ऐकणे, त्यांच्याकडून येणाऱ्या माहितीचे त्वरित विश्लेषण करून ते लिंगभावाच्या संकल्पनांच्या संदर्भात पाहण्याची क्षमता असावी. |

******

# प्रकरण ३ प्रशिक्षणाची रूपरेखा

**या प्रकरणाच्या अभ्यासानंतर आपणास प्रशिक्षणातील प्रमुख सत्रांची तसेच प्रत्येक सत्रात कोणते मुद्दे समाविष्ट (गृहीत धरणे) करणे अपेक्षित आहे याबाबतची संक्षिप्त माहिती मिळेल.**

| सत्र क्र. | वेळ | सत्राचा विषय | सत्राची सविस्तर माहिती |
|---|---|---|---|
| दिवस पहिला | | | |
| १.१ | **सकाळी ९.३० ते १०.३०** | **वातावरण निर्मिती** | • स्वागत<br>• प्रशिक्षणपूर्व चाचणी<br>• खेळाच्या माध्यमातून परस्पर परिचय आणि प्रशिक्षणाकडून असलेल्या अपेक्षा<br>• प्रशिक्षण का, प्रशिक्षणाची उद्दिष्टे, आणि वेळापत्रक<br>• प्रशिक्षणार्थींसाठी सहभागी पद्धतीने मार्गदर्शक तत्त्वे |
| प्रशिक्षण प्रारूप (Module) १ : लिंगभाव : संकल्पना आणि साधने | | | |
| १.२ | **सकाळी १०.३० ते ११.३०** | **संकल्पना: लिंगभेद आणि लिंगभाव** | • 'स्त्री' आणि 'पुरूष' हे शब्द ऐकल्यावर प्रशिक्षणार्थींच्या मनात उत्स्फूर्तपणे काय विचार येतो हे त्यांना कागदावर लिहायला सांगा. वरील शब्दांपैकी काय शारीरिक आहे, काय जीवशास्त्रीय आहे त्यावर चर्चा.<br>• लिंगभेद आणि लिंगभाव संकल्पना स्पष्ट करणे<br>• लिंगभेद आणि लिंगभाव संकल्पना समजली आहे का नाही ते जाणून घेण्यासाठी खेळ<br>• आधी चार्टवर लिहिलेल्या शब्दांची बी (बायालॉजिकल - जीवशास्त्रीय) आणि जी (जेंडर - लिंगभाव - सामाजिक धारणा) अशी वर्गवारी प्रशिक्षणार्थींनी करणे. |
| १.३ | **सकाळी ११.४५ ते दुपारी १.३०** | **लिंगभाव: काही महत्त्वाच्या संकल्पना** | • दोन प्रशिक्षणार्थींचा एक गट अशी विभागणी करून लिंगभाव संकल्पनेशी ओळख कधी आणि कशी झाली ते एकमेकांशी सविस्तर बोलणे.<br>• काही प्रशिक्षणार्थी स्वेच्छेने मोठ्या गटात त्यांचा अनुभव सांगतील.<br>• पुढील संकल्पना स्पष्ट करणे<br>    • लिंगभावाधारित भेदभाव (Gender Discrimination) |

| सत्र क्र. | वेळ | सत्राचा विषय | सत्राची सविस्तर माहिती |
|---|---|---|---|
| | | | • लिंगभावाधारित भूमिका (Gender Roles)<br>• लिंगभावाधारित गरजा (Gender Needs)<br>• लिंगभाव समता आणि लिंगभाव समानता (Gender Equity and Gender Equality) |
| १.४ | **दुपारी २.३० ते ३.३०** | **सत्ता आणि विशेषाधिकार** | • पॉवर वॉक हा अभ्यासवजा खेळ<br>• स्त्री-पुरूष असमानता आणि सामजिक समावेशन<br>• असमानता आणि सामाजिक असमावेशन यांचा लोकांच्या सहभागावर कसा परिणाम होतो<br>• सत्ता आणि विशेषाधिकार - संकल्पना<br>• प्रकल्पाचे सामाजिक समावेशन धोरण |
| १.५ | **दुपारी ३.४५ ते संध्याकाळी ५.००** | **लिंगभाव मापदंड** | प्रशिक्षणार्थींना छोट्या गटांत पुढील विषय अभ्यासाला देणे<br>• गट १ - सुनेकडून असणाऱ्या अपेक्षा आणि जावयाकडून असणाऱ्या अपेक्षा<br>• गट २ - चांगली स्त्री कोणाला म्हटले जाते आणि चांगला पुरूष कोणाला म्हटले जाते याची यादी<br>• गट ३ - जुळया बहीण-भावांचा जीवनप्रवास<br>• गट ४ - कार्यालयात चांगली स्त्री कर्मचारी आणि चांगला पुरुष कर्मचारी कोणाला समजले जाते त्या गुणांची यादी<br>• गट ५ - नोकरी करणारी (कामाला जाणारी) स्त्री आणि नोकरी करणारा (कामाला जाणारा) पुरूष यांच्याकडून असलेल्या अपेक्षा<br>• स्त्री-पुरूषांच्या जीवनात कसा आणि कशामुळे फरक पडतो याचे विश्लेषण |
| दिवस दुसरा | | | |
| प्रशिक्षण प्रारूप (Module) २ : कृषि क्षेत्रातील लिंगभावाच्या समस्या | | | |
| २.१ | **सकाळी ९.३० ते १०.३०** | **पहिल्या दिवसाची उजळणी** | • प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी शिकलेल्या मुदद्यांची उजळणी करणे.<br>• अस्पष्ट असणाऱ्या संकल्पना परत समजावून सांगणे. |
| २.२ | **सकाळी १०.३० ते ११.००** | **कृषि क्षेत्रातील लिंगभावाच्या समस्या** | • भारतातील आणि महाराष्ट्रातील शेती क्षेत्रातील लिंगभाव समस्यांची तोंडओळख |

| सत्र क्र. | वेळ | सत्राचा विषय | सत्राची सविस्तर माहिती |
|---|---|---|---|
| २.३ | **सकाळी ११.०० ते १२.१५** | **लिंगभाव विश्लेषण: संकल्पना आणि साधने** | • लिगभाव विश्लेषणाची संकल्पना<br>• लिंगभाव विश्लेषणाची साधने<br>○ हंगामी दिनदर्शिका (Seasonal Calendar)<br>○ शेतीमधले कामाचे लिंगभावाधारित विभाजन (Gender Division of Labor in Agriculture<br>○ २४ तासांचे घड्याळ (Daily Activity Clock)<br>○ संसाधनांचा वापर आणि संसाधनावंर नियंत्रण (Access to and Control over resources)<br>○ निर्णय सहभाग (Decision making) |
| २.४ | **सकाळी १२.१५ ते दुपारी १.१५** | **लिंगभाव विश्लेषण: छोट्या गटांमध्ये अभ्यास** | • चार-पाच प्रशिक्षणार्थींचा एक असे पाच गट.<br>• प्रत्येक गटाला वरीलपैकी एक साधन सविस्तर अभ्यासण्यास देणे<br>• गट त्यांचे साधन एका चार्टवर तयार करतील. |
| २.५ | **दुपारी २.१५ ते ३.१५** | **लिंगभाव विश्लेषण: छोट्या गटांचे सादरीकरण आणि माहितीचे विश्लेषण** | • गटांचे प्रतिनिधी त्यांच्या अभ्यासाचा सारांश सर्वांसमोर सादर करतील.<br>• लिंगंभावाधारित भूमिका, लिंगभावाधारित श्रमविभाजन, महिलांवरचा तिहेरी बोजा, लिंगभावाधारित गरजा .... इत्यादी मुद्द्यांवर सादरीकरणाच्या संदर्भात सविस्तर चर्चा.<br>• कृषिमूल्यसाखळीतील महिलांच्या सहभागातून वाढणारी उत्पादकता (business case) याविषयी प्रशिक्षकाकडून माहिती. |
| प्रशिक्षण प्रारूप (Module) ३ : केस स्टडी आणि बेस्ट प्रॅक्टिसेस | | | |
| २.६ | **दुपारी ३.३० ते ४.३०** | **बेस्ट प्रॅक्टिसेस आणि केस स्टडी** | • स्त्रिया कृषि क्षेत्राच्या मुख्य प्रवाहात यशस्वीपणे सहभागी झाल्याची १-२ उदाहरणे (केस स्टडी) सांगणे.<br>• महिला शेतकरी उत्पादक कंपनीच्या संचालक मंडळावर कार्यरत असलेल्या १-२ स्त्रियांशी चर्चा<br>• या चर्चेत पुढील मुद्द्यांचा समावेश असावा: महिला शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) स्थापन करण्याची गरज का भासली, FPC स्थापन करण्याची प्रक्रिया, FPC स्थापन करण्यात आलेल्या अडचणी, FPC ला कोणत्या |

| सत्र क्र. | वेळ | सत्राचा विषय | सत्राची सविस्तर माहिती |
|---|---|---|---|
| | | | संधी आहेत, FPC ने केलेले उपक्रम, भागभाडंवलाची उभारणी कशी केली, FPC चे प्रशासन आणि आर्थिक व्यवस्थापन ..... |
| प्रशिक्षण प्रारूप (Module) ४ : कृषिमूल्यसाखळीत महिलांचा सहभाग आणि स्मार्ट प्रकल्पाची जेंडर स्ट्रॅटेजी | | | |
| २.७ | **दुपारी ४.३० ते ५.३०** | **कृषि मूल्यसाखळीच्या मुख्य प्रवाहात महिला** | • कृषिमूल्यसाखळी म्हणजे काय<br>• निवड केलेल्या एका पिकासाठी कृषिमूल्यसाखळीचे उदाहरण.<br>• कृषिमूल्यसाखळीत स्त्रियांचा सहभाग वाढवण्यासाठी काय प्रयत्न केले पाहिजेत यावर चर्चा (व्यक्तिगत स्तर, कौटुंबिक स्तर, सामाजिक स्तर, कृषि खात्याचे धोरण आणि अंमलबाजवणी इत्यादी)<br>• छोट्या गटात एका पिकाची कृषिमूल्यसाखळी आणि त्यात स्त्रियांचा सहभाग याचा अभ्यास.<br>• कृषिमूल्यसाखळीतील महिलांच्या सहभागातून वाढणारी उत्पादकता (business case) याविषयी प्रशिक्षकाकडून माहिती. |
| दिवस तिसरा | | | |
| ३.१ | **सकाळी ९.३० ते १०.००** | **दुसऱ्या दिवसाची उजळणी** | • प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी शिकलेल्या मुद्द्यांची उजळणी करणे.<br>• अस्पष्ट असणाऱ्या संकल्पना परत समजावून सांगणे. |
| ३.२ | **सकाळी १०.०० ते ११.००** | **स्मार्ट प्रकल्प: जेंडर स्ट्रॅटेजी** | • 'सामाजिक मूल्यांकन' अभ्यासात निदर्शनास आलेल्या बाबींची माहिती<br>• जेंडर धोरणातील महत्त्वाचे मुद्दे |
| प्रशिक्षण प्रारूप (Module) ५ : कृषि खात्याच्या कार्यक्रमांचे जेंडर समावेशक नियोजन | | | |
| ३.३ | **सकाळी ११.०० ते दुपारी १२.००** | **कृषि खात्याच्या कार्यक्रमांचे जेंडर समावेशक नियोजन** | • प्रशिक्षणार्थींची जिल्हा अथवा तालुकानिहाय गटांत विभागणी<br>• प्रत्येक गट एक वर्षाचे लिंगभाव समावेशक नियोजन करेल<br>• गटांचे सादरीकरण व चर्चा<br>• लिंगभाव समावेशक नियोजनासाठी मार्गदर्श तत्त्वे सहभागी पद्धतीने तयार करणे. |
| ३.४ | **दुपारी** | **कामाच्या ठिकाणी** | • कायद्याची पार्श्वभूमी (भवरीदेवी, विशाखा मार्गदर्शक |

| सत्र क्र. | वेळ | सत्राचा विषय | सत्राची सविस्तर माहिती |
|---|---|---|---|
| | **१२.१५ ते १.३०** | **महिलांचा लैंगिक छळ -प्रतिबंध, मनाई, आणि निवारण: अधिनियम २०१३** | तत्त्वे)<br>• कायद्याचा हेतू ( प्रतिबंध, मनाई आणि निवारण)<br>• कायद्याने केलेली लैंगिक छळाची व्याख्या<br>• आंतरिक तक्रार निवारण समिती - हेतू, रचना, जबाबदाऱ्या, तक्रार चौकशी प्रक्रिया, गोपनीयता, अपील इत्यादी<br>• आस्थापनाच्या जबाबदाऱ्या<br>• कार्यालयीन समितीच्या कामकाजाचा आढावा |
| ३.५ | **दुपारी २.३० ते ३.३०** | **प्रशिक्षणार्थींची प्रशिक्षणातील विषयांची तयारी** | • तीन प्रशिक्षणार्थींचा एक असे गट<br>• प्रशिक्षणात दोन दिवस झालेल्या विषयांपैकी एक विषय निवडून प्रशिक्षणार्थींची तयारी<br>• विषयाची प्रस्तावना, विषयाची समज, विषय स्पष्ट करण्यासाठी निवडलेली उदाहरणे, विषय समजावून सांगण्याची पद्धत आणि विषयातला मुख्य संदेश यावर तयारीचे मोजमाप होईल.<br>• प्रत्येक गटाला सादरीकरणासाठी पाच ते सात मिनिटांचा वेळ मिळेल. |
| ३.६ | **दुपारी १२.१५ ते १.३०** | **प्रशिक्षणार्थींचे सादरीकरण** | • प्रत्येक गटाचे सादरीकरण.<br>• सर्व गटांचे सादरीकरण झाल्यावर प्रत्येक गटाचे अन्य प्रशिक्षणार्थींकडून मूल्यमापन<br>• काय चांगले झाले, काही संकल्पनात्मक चूक होती का, विषय मांडण्याची पद्धत, योग्य तो संदेश पोचला का आणि काय सुधारणा करण्याची गरज आहे इत्यादी मुद्द्यांवर चर्चा<br>• प्रशिक्षणाचे वेळापत्रक कसे तयार करायचे याविषयी चर्चा |
| ३.७ | **दुपारी ३.३० ते ४.३०** | **समारोप** | • प्रशिक्षणोत्तर चाचणी,<br>• प्रशिक्षणाचे मूल्यमापन<br>• खुले मनोगत<br>• प्रशिक्षणानंतर पुढे काय<br>• आभार प्रदर्शन |

******

# प्रकरण ४ प्रशिक्षणाचे वेळापत्रक

**या प्रकरणात प्रशिक्षणाचे सुलभीकरण प्रभावीपणे व नियोजित वेळेत करता यावे यासाठी प्रशिक्षणाचे वेळापत्रक सादर केले आहे. प्रशिक्षणाच्या तयारीसाठी, साधनव्यक्ती निश्चित करण्यासाठी, सत्राच्या सुलभिकरणासाठी याचा उपयोग होईल.**

| सत्र | वेळ | विषय | साधन व्यक्ती |
|---|---|---|---|
| **दिवस पहिला** | | | |
| १ | सकाळी ९.३० ते १०.३० | स्वागत, परिचय इत्यादी | |
| २ | सकाळी १०.३० ते ११.३० | संकल्पना: लिंगभेद आणि लिंगभाव | |
| ३ | सकाळी ११.४५ ते दुपारी १.३० | लिंगभाव: काही महत्त्वाच्या संकल्पना | |
| ४ | दुपारी २.३० ते ३.३० | सत्ता आणि विशेषाधिकार | |
| ५ | दुपारी ३.४५ ते ५.०० | लिंगभाव मापदंड | |
| **दिवस दुसरा** | | | |
| १ | सकाळी ९.३० ते १०.३० | पहिल्या दिवसाची उजळणी | |
| २ | सकाळी १०.३० ते ११.०० | कृषि क्षेत्रातील लिंगभावाच्या समस्या | |
| ३ | सकाळी ११.०० ते दुपारी १२.१५ | लिंगभाव विश्लेषण: संकल्पना आणि साधने | |
| ४ | दुपारी १२.१५ ते १.१५ | लिंगभाव विश्लेषण: छोट्या गटांमध्ये अभ्यास | |
| ५ | दुपारी २.१५ ते ३.१५ | लिंगभाव विश्लेषण: छोट्या गटांचे सादरीकरण आणि माहितीचे विश्लेषण | |
| ६ | दुपारी ३.३० ते ४.३० | बेस्ट प्रॅक्टिसेस आणि केस स्टडी | |
| ७ | दुपारी ४.३० ते ५.३० | कृषि मूल्यसाखळीच्या मुख्य प्रवाहात महिला | |
| **दिवस तिसरा** | | | |
| १ | सकाळी ९.३० ते १०.०० | दुसऱ्या दिवसाची उजळणी | |
| २ | सकाळी १०.०० ते ११.०० | स्मार्ट प्रकल्प: जेंडर स्ट्रॅटेजी | |
| ३ | सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० | कृषि खात्याच्या कार्यक्रमांचे जेंडर समावेशक नियोजन | |
| ४ | दुपारी १२.१५ ते १.३० | कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ – (प्रतिबंध, मनाई, आणि निवारण) अधिनियम २०१३ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | दुपारी २.३० ते ३.३० | प्रशिक्षणार्थींची प्रशिक्षणातील विषयांची तयारी | |
| ६ | दुपारी ३.३० ते ४.३० | प्रशिक्षणार्थींचे सादरीकरण | |
| ७ | दुपारी ४.३० ते ५.३० | मनोगत, प्रशिक्षणोत्तर चाचणी. समारोप | |

# प्रकरण ५ सत्र क्र. १.१ वातावरण निर्मिती

**या प्रकरणात आपण पुढील मुख्य मुद्दे शिकणार आहोत:**

- ओळख व संवादासाठी पूरक वातावरण निर्मिती तयार करणे.
- प्रशिक्षणाची उद्दीष्टे स्पष्ट करणे.

## सत्र १.१ वातावरण निर्मिती

| घटक / मुद्दा | तपशील |
|---|---|
| सत्राची उद्दिष्टे: | • तीन दिवसांच्या प्रशिक्षणासाठी आवश्यक अशी वातावरण निर्मिती करणे<br>• प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणाची उद्दिष्टे आणि वेळापत्रक याबाबत माहिती देणे<br>• प्रशिक्षणार्थींचा परस्पर परिचय करून संवादासाठी अनुकूल वातावरण तयार करणे |
| कालावधी: | ६० मिनिटे |
| पद्धत: | • लेखी प्रशिक्षणपूर्व चाचणी<br>• खेळाच्या माध्यमातून परस्पर परिचय<br>• स्लाईड्सच्या दवारे प्रशिक्षणाची उद्दिष्टे आणि वेळापत्रक<br>• सहभागी पद्धतीने प्रशिक्षणार्थींसाठी मार्गदर्शक तत्त्वे |
| आवश्यक साहित्य: | लॅपटॉप, प्रोजेक्टर, प्रेझेंटेशन, चाट्र्स, मार्कर्स, प्रशिक्षणपूर्व चाचणीच्या पुरेशा प्रती |

## सत्र संचालनाची प्रक्रिया

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| ०० - ०५ | • सभागृहाच्या प्रवेशद्वाराशी प्रशिक्षणार्थींच्या नोंदणीची व्यवस्था असावी.<br>• हजेरीपत्रकात तीनही दिवस प्रशिक्षणार्थींनी सही करायची आहे याची सूचना द्यावी. **(परिशिष्ट १)**<br>• प्रत्येक प्रशिक्षणार्थीला वही व पेन द्यावे.<br>• सत्र वेळेत सुरू करावे. सत्राची सुरूवात सर्वांच्या स्वागताने करावी.<br>• प्रशिक्षण केंद्रात कार्यक्रमाची सुरूवात विशिष्ट गीताने वा दीपप्रज्वलनाने होत असेल तर त्यासाठी दोन तीन मिनिटांचा वेळ ठेवावा. |
| ०५ -१५ | **प्रशिक्षणपूर्व चाचणी**<br>• प्रशिक्षणातून प्रशिक्षणार्थी काय शिकले हे जाणून घेण्यासाठी प्रशिक्षणपूर्व आणि प्रशिक्षणोत्तर चाचणी घेतली जाईल हे स्पष्ट करावे.<br>• प्रत्येक प्रशिक्षणार्थीला प्रशिक्षणपूर्व चाचणीचा कागद द्यावा. **(परिशिष्ट २)**<br>• चाचणीवर नाव लिहिणे बंधनकारक नाही हे स्पष्ट करावे. |

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| | • प्रत्येक प्रश्नाचे उत्तर लिहावे हे स्पष्ट करावे.<br>• दहा मिनिटांनी कागद गोळा करून व्यवस्थित ठेवून द्यावेत. हे कागद प्रशिक्षकांचा गट सोडून अन्य कोणाच्या नजरेस पडणार नाहीत याची दक्षता घ्यावी. |
| १५ - ३५ | **परस्पर परिचय**<br>• दोन-दोन प्रशिक्षणार्थींचे गट करावेत. प्रत्येक गटाला एक कार्ड द्यावे जे नंतर चार्टवर चिकटवता येईल.<br>• दोन प्रशिक्षणार्थींनी एकमेकांची खालील मुद्द्यांवर ओळख करून घ्यावी.<br>○ नाव; मूळ गाव आणि जिल्हा; सध्या कोणत्या पदावर आणि कोठे काम करतात; शिक्षण किती झाले आहे; कोणता पदार्थ सर्वात जास्त आवडतो आणि कोणत्या गोष्टीचा प्रचंड राग येतो; स्वत:चा कोणताही एक गुण<br>○ दोन्ही प्रशिक्षणार्थींनी मिळून प्रशिक्षणात त्यांना काय शिकायला मिळावे असे वाटते याबाबत एक अपेक्षा लिहावी.<br>• यानंतर प्रशिक्षणार्थींनी क्रमाने आपल्या जोडीदाराची ओळख करून द्यायची आहे. प्रशिक्षणार्थी ‘अ’ प्रशिक्षणार्थी ‘ब’ ची ओळख करून देतील तर प्रशिक्षणार्थी ‘ब’ यांनी प्रशिक्षणार्थी ‘अ’ ची ओळख करून द्यायची आहे.<br>• प्रशिक्षणार्थींनी सांगितलेल्या सर्व अपेक्षा चार्टवर अथवा फळयावर नोंदवाव्यात.<br>• प्रशिक्षकांनीही आपली ओळख याच पद्धतीने करून द्यावी. |
| ३५ - ४५ | **प्रशिक्षण का?**<br>स्मार्ट प्रकल्पातील जेंडर मेनस्ट्रीमिंगचे (महिलांना कृषि क्षेत्रात मुख्य प्रवाहात आणणे) महत्त्व थोडक्यात सांगावे.<br>जेंडर या विषयातली कृषि खात्याच्या कर्मचाऱ्यांच्या क्षमता बांधणीचा एक भाग म्हणून हे तीन दिवसांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.<br><br>**प्रशिक्षणाची उद्दिष्टे**<br>१. लिंगभावाच्या मूलभूत संकल्पनांविषयी प्रशिक्षणार्थींची जाण वाढणे.<br>२. कृषि क्षेत्रात असलेल्या जेंडरविषयक समस्यांची प्रशिक्षणार्थांना परिचय होणे.<br>३. लिंगभाव विश्लेषण संकल्पना आणि साधनांची ओळख होणे.<br>४. कृषि क्षेत्रात महिलांनी मुख्य प्रवाहात सामील व्हावे या प्रयत्नांसाठी कृषि खात्याच्या कर्मचाऱ्यांना अधिक माहिती, कौशल्ये, आणि योग्य तो दृष्टिकोन मिळावा यासाठी प्रशिक्षणार्थींना मदत करणे.<br>**प्रशिक्षणाचे वेळापत्रक**<br>• प्रकरण ४ मध्ये सत्राची रूपरेखा दिली आहे.<br>• प्रशिक्षणाचे संपूर्ण वेळापत्रक प्रशिक्षण सभागृहात वा सभागृहाबाहेर सर्वांना |

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| | सहज दिसेल अशा ठिकाणी लावावे.<br>• प्रशिक्षणार्थींनी नोंदवलेल्या अपेक्षांचा विचार करून काही अपेक्षा या प्रशिक्षणात पूर्ण होणार नसतील तर ते कारणासह स्पष्ट करावे. (उदा. एखाद्या योजनेची सविस्तर माहिती.)<br>• प्रशिक्षणाचे वाचन साहित्य शेवटच्या सत्रानंतर सर्वांना दिले जाईल हे स्पष्ट करावे. |
| ४५ -५५ | **प्रशिक्षणार्थींसाठी मार्गदर्शक तत्त्वे**<br>प्रशिक्षणाचा सर्व प्रशिक्षणार्थांना जास्तीत जास्त लाभ मिळावा यासाठी सर्वांनी कोणते नियम पाळले पाहिजेत याबाबत प्रशिक्षणार्थींशी चर्चा करावी. साधारण आठ ते दहा मुद्दे झाल्यावर चर्चा थांबवावी. सहभागी पद्धतीने तयार झालेली ही नियमवाली सर्वांना सहज वाचता येईल अशा जागी तीनही दिवस लावून ठेवावी. काही नियम असे असतील:<br>• सर्वांनी सत्राला वेळेत हजर राहावे.<br>• सत्र चालू असताना मोबाईल बंद ठेवावा.<br>• चर्चेत सर्वांनी सहभागी व्हावे.<br>• दुसरी व्यक्ती बोलत असताना मध्येच त्या व्यक्तीचे बोलणे तोडू नये.<br>• मतभेद व्यक्त करताना चर्चा मतांवर व्हावी, व्यक्तींवर नको.<br>• प्रशिक्षणार्थींनी सांगितलेले अनुभव प्रशिक्षणात सामील नसलेल्या लोकांना सांगू नयेत.<br>• ........<br>• ........ |
| ५५ - ६० | शंकानिरसन |

### सत्र संचालनासाठी आवश्यक माहिती

“राज्यातील अल्प आणि अत्यल्प भूधारक शेतकरी आणि कृषि उद्योजकांना केंद्रस्थानी ठेवून स्पर्धात्मक व सर्वसमावेशक कृषि मूल्यसाखळी विकसित करणे” हे स्मार्ट प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. सदर प्रकल्पाद्वारे महिलांच्या शेतकरी उत्पादक संस्था तयार करणे, त्यांचा काढणी पश्चात व्यवस्थापन व विपणन प्रक्रियेमध्ये सहभाग वाढवणे, व त्या अनुषंगाने महिलांची क्षमता बांधणी करणे यावर विशेष भर देण्यात आला आहे. स्मार्ट प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी कृषि विभाग ही नोडल संस्था आहे.

प्रकल्पाची अपेक्षित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कृषि खात्याच्या अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या क्षमता बांधणीचे नियोजन स्मार्ट प्रकल्पाने केले आहे. जेंडर मेनस्ट्रीमिंग - महिलांन कृषि क्षेत्राच्या मुख्य प्रवाहात आणणे - हा स्मार्ट प्रकल्पाचा महत्त्वाचा भाग आहे. त्यासाठी कृषि खात्याच्या कर्मचाऱ्यांची जेंडर या

विषयातली क्षमता वाढविण्याचे विविध प्रयत्न स्मार्ट प्रकल्पात अपेक्षित आहेत. तीन दिवसांचे हे प्रशिक्षण हा क्षमता बांधणीमधला एक महत्त्वाचा टप्पा आहे.

या तीन दिवसांच्या प्रशिक्षणाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. लिंगभावाच्या मूलभूत संकल्पनांविषयी प्रशिक्षणार्थींची जाण वाढणे.
२. कृषि क्षेत्रात असलेल्या जेंडरविषयक समस्यांची प्रशिक्षणार्थांना परिचय होणे.
३. लिंगभाव विश्लेषण संकल्पना आणि साधनांची ओळख होणे.
४. कृषि क्षेत्रात महिलांनी मुख्य प्रवाहात सामील व्हावे या प्रयत्नांसाठी कृषि खात्याच्या कर्मचाऱ्यांना अधिक माहिती, कौशल्ये, आणि योग्य तो दृष्टिकोन मिळावा यासाठी प्रशिक्षणार्थींना मदत करणे.

******

# प्रशिक्षण प्रारूप (Module) १ :

# लिंगभाव : संकल्पना आणि साधने

# प्रकरण ६ सत्र १.२ लिंगभेद आणि लिंगभाव

**या प्रकरणात आपण पुढील मुख्य मुद्दे शिकणार आहोत:**

- लिंगभेद आणि लिंगभाव संकल्पना.
- स्त्री-पुरूषांबद्दल च्या इतरांच्या आणि प्रशिक्षणार्थींच्या स्वत:च्या धारणा.

## सत्राची रूपरेषा

| घटक / मुद्दा | तपशील |
|---|---|
| सत्राची उद्दिष्टे: | • लिंगभाव (जेंडर) ही जीवशास्त्रीय वास्तविकता नसून सामाजिक धारणा आहे हे स्पष्ट करणे.<br>• लिंगभावाच्या संकल्पना काळ, परिस्थिती, धर्म .... अशा अनेक घटकांनुसार बदलत जातात हे स्पष्ट करणे.<br>• स्त्री-पुरूषांबद्द्लच्या त्यांच्या स्वत:च्या सामाजिक धारणा (लिंगभाव) ओळखायला प्रशिक्षणार्थींना मदत करणे. |
| कालावधी: | ६० मिनिटे |
| पद्धत: | • खेळ<br>• प्रशिक्षकाचे व्याख्यान<br>• चर्चा |
| आवश्यक साहित्य: | प्रत्येक प्रशिक्षणार्थीसाठी दोन रंगांच्या प्रत्येकी पाच अशा एकूण दहा चिठ्ठ्या, चिठ्ठ्या ठेवण्यासाठी दोन छोटी खोकी, लॅपटॉप, प्रोजेक्टर, प्रेझेंटेशन, चार्ट, मार्कर्स, तीन फलक ('फक्त स्त्रिया', 'फक्त पुरूष' आणि 'स्त्रिया आणि पुरूष दोघेही' असे लिहिलेले.) |

## सत्र संचालनाची प्रक्रिया

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| ०० - २० | • प्रत्येक प्रशिक्षणार्थीला दोन वेगळ्या रंगांच्या प्रत्येकी पाच चिठ्ठ्या द्या. (एकूण दहा चिठ्ठ्या)<br>• 'स्त्री' हा शब्द ऐकल्यानंतर मनात काय कल्पना किंवा विचार येतात ते प्रशिक्षणार्थींना एका विशिष्ट रंगाच्या चिठ्ठीवर लिहायला सांगा. एका चिठ्ठीवर एकच विचार लिहायचा आहे.<br>• प्रशिक्षणार्थी पाच शब्द लिहू शकतात. दोन मिनिटांनी त्या चिठ्ठ्या गोळा करा आणि टेबलावरच्या एका खोक्यात ठेवा.<br>• 'पुरूष' हा शब्द ऐकल्यावर मनात काय कल्पना किंवा विचार येतात ते |

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| | प्रशिक्षणार्थींना दुसऱ्या रंगाच्या चिठ्ठीवर लिहायला सांगा. एका चिठ्ठीवर एकच विचार लिहायचा आहे.<br>• संकल्पना समजण्यासाठी एखादे उदाहरण द्या. उदाहरणार्थ 'पंजाब' हा शब्द ऐकताच मनात काय येते - देशभक्ती, गुरूद्वार, लस्सी वगैरे<br>• प्रशिक्षणार्थींच्या मदतीने चिठ्ठ्या वाचा आणि त्या स्त्री आणि पुरूष अशा दोन रकान्यांत चार्ट पेपरवर नोंदवा. |
| २० - ३० | • लिंगभेद आणि लिंगभाव संकल्पना प्रेझेंटेशनच्या साहाय्याने स्पष्ट करा.<br>• लिंगभाव म्हणजे काय - व्याख्या सांगावी<br>• जेंडर म्हणजे फक्त स्त्रियांचा विचार नाही,जेंडरचा विचार करणे म्हणजे पुरूषांच्या विरोधात विचार करणे असे नाही या बाबी स्पष्ट कराव्यात. |
| ३० - ४५ | **खेळ**<br>• प्रशिक्षणार्थींना द्यायच्या सूचना -. सभागृहाच्या तीन भिंतीवर 'फक्त स्त्रिया', 'फक्त पुरूष', आणि 'स्त्रिया आणि पुरूष दोघेही' असे वेगवेगळे फलक आहेत.<br>• प्रशिक्षक काही वाक्ये वाचेल. **(परिशिष्ट ४ पहावे)** प्रत्येक वाक्यानंतर, प्रशिक्षणार्थींच्या मते ते वाक्य कोणाला जास्त लागू पडते त्यानुसार त्या भिंतीसमोर जाऊन उभे राहायचे आहे.<br>• ज्या फलकासमोर कमी लोक असतील त्यांना त्यांच्या निवडीचे कारण विचारावे.<br>• या वाक्यांमधून आणि प्रशिक्षणार्थींच्या प्रतिसादातून लिंगभाव धारणा कशा समोर येतात याविषयी चर्चा व्हावी.<br>• प्रशिक्षणार्थींकडून परस्परांवर व्यक्तिगत टीका होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.<br>• या खेळात लिंगभाव धारणांमध्ये होत असलेले बदलही दिसून येतात, त्याबद्दल चर्चा व्हावी (उदा. ट्रॅक्टर चालवणारी महिला शेतकरी).<br>• परंतु अपवादांची चर्चा करताना समाजात स्त्रियांच्या स्थितीबद्दल साधारणपणे जे चित्र दिसते त्यावरही - ते कसे बदलायचे यावरही - चर्चा आणि कृती होणे गरजेचे आहे याची प्रशिक्षणार्थींना आठवण करून द्यावी. |
| ४५ - ५५ | सत्राच्या सुरूवातीस जमा झालेल्या शब्दांचे लिंगभेद आणि लिंगभाव या दोन गटांमध्ये सहभागी पद्धतीने वर्गीकरण करा. |
| ५५ - ६० | प्रश्नोत्तरे, शंकानिरसन |

### लिंगभेद आणि लिंगभाव

सभोवताली आपण पाहतो की काही कामे स्त्रियांची म्हणून गणली जातात तर काही कामे पुरूषांची म्हणून गणली जातात. रोजचा स्वयंपाक करणे, घरातल्या सर्वांचे कपडे धुणे, घराची स्वच्छता ठेवणे, भांडी घासणे वगैरे कामे घरातल्या स्त्रियांची जबाबदारी असते. पुरूषाने बाहेर काम करून पैसे कमवून आणावेत

आणि सर्व महत्त्वाचे निर्णय घ्यावेत असाही एक समज आहे. याला बरेच अपवाद आपण पाहतो. स्त्रिया सरकारी कार्यालयात आहेत, त्या बँकेत आहेत आणि त्या शेतातही काम करतात. म्हणजे अनेक स्त्रिया घराबाहेरचे काम करून पैसे कमावतात. स्वयंपाक करणे हे स्त्रियांचे काम मानले जाते, पण अनेक हॉटेलमध्ये स्वयंपाकाचे काम पुरूष करताना दिसतात. याचा साधासरळ अर्थ असा की स्त्री-पुरूषांच्या कामाची वाटणी, त्यांनी काय करावे आणि काय करू नये यासंबंधीचे नियम निसर्गाने बनवलेले नसून समाजाने बनवलेले आहेत.

समाजाने स्त्री-पुरूषविषयक बनविलेल्या धारणांना लिंगभाव (जेंडर) असे म्हटले जाते. कमला भसीन त्यांच्या **'Understanding Gender'** या पुस्तकात लिहितात**:** *पुरूष आणि स्त्री यांची सामाजिक-सांस्कृतिक व्याख्या म्हणजे जेंडर. समाज स्त्री आणि पुरूष यांच्यात जो भेदभाव करतो, त्यांना ज्या सामाजिक भूमिका देतो - तो आहे लिंगभाव.*

मग स्त्रिया आणि पुरूषांमध्ये काहीच फरक नाही का?

तसा तर कोणत्याही दोन माणसांमध्ये फरक असतो. दोन स्त्रिया एकसारख्या नसतात, आणि दोन पुरूष एकसारखे नसतात. वडील-मुलगा, आई-मुलगी एकमेकांपेक्षा वेगळे असतात. स्त्री-पुरूषांमधला फरक मुख्यत्वे प्रजनन संस्थेतला फरक आहे. पण त्या आधारे केले जाणारे बाकी सारे भेद मात्र समाजाने बनवलेले आहेत.

स्त्रिया आणि पुरूषांमधल्या जीवशास्त्रीय फरकाला लिगंभेद म्हणतात. तर स्त्रियांनी अमुक पद्धतीने वागावे (उदा. घरातले कामकाज करावे) आणि तमुक पद्धतीने वागू नये (उदा. मोठ्या आवाजात बोलू नये), पुरूषांनी असे वागावे (उदा. पत्नीपेक्षा जास्त कमवावे) आणि तसे वागू नये (उदा. रडू नये) अशा समाजाने लादलेल्या ज्या अपेक्षा असतात तो आहे लिगंभाव. 'चांगली स्त्री' आणि 'चांगला पुरूष' या समाजाने तयार केलेल्या चौकटीत आपण केवळ इतर स्त्री-पुरूषांना जोखतो असे नाही, तर आपण स्वत:चेही मूल्यमापन त्याच चौकटीतून करतो. कोणी ही पारंपरिक चौकट मोडून बाहेर पडण्याचा प्रयत्न केल्यास आप्तस्वकीयांकडून आणि समाजाकडून त्या व्यक्तीला नावे ठेवली जातात, काहीवेळी त्रासही दिला जातो. आपल्या इतरांकडूनच्या आणि स्वत:कडूनच्या अपेक्षा, स्वप्नं, अपराधी भावना हे सारे समाजाच्या स्त्री-पुरूषविषयक धारणांनी प्रभावित असते.

प्रजनन संस्थेतल्या भेदाला 'लिंगभेद' म्हटले जाते. लिंगभेद हा जीवशास्त्रीय फरक आहे. लिंगाधारित सामाजिक भेदाला 'लिंगभाव' म्हटले जाते. लिंगभाव हा लिंगावर आधारित भेदभाव आहे असा समज असला तरी तो लिंगविषयक धारणांमधला भेद आहे. लिंगभेद आणि लिंगभाव या दोन्हीतला फरक खाली स्पष्ट केला आहे.

**लिंगभेद**

- नर आणि मादी यांच्यातील शारिरीक आणि जीवशास्त्रीय फरक
- जन्मजात लाभलेल्या प्रजनन संस्थेवर आधारित
- स्त्री-पुरूष-अन्य असे वर्गीकरण केले जाते
- वैश्विक आहे – काळ आणि संस्कृती बदलली तरी फरक तोच राहतो

**लिंगभाव**

- स्त्रिया आणि पुरुष यांच्यातील सामाजिक, सांस्कृतिक, आणि व्यवहारातील फरक
- बाह्य घटकांमुळे हा फरक निर्माण होतो
- पुरूषी आणि बायकी असे वर्गीकरण केले जाते
- काळ, संस्कृती, स्थान, धर्म, वय ... यानुसार बदल दिसतो
- काळ आणि संस्कृती अशा घटकांमुळे बदल होतो

कोणत्याही समाजात, व्यवस्थेत स्त्रिया आणि पुरूष यांचे एकमेकांशी कसे नाते आहे याचा विचार करणे म्हणजे जेंडरचा विचार करणे. स्त्रिया आणि पुरूष कोणकोणती कामे करतात, स्त्रिया आणि पुरूष कोणकोणते निर्णय घेतात, स्त्रिया आणि पुरूष यांचा कोणकोणती संसाधने वापरतात, कोणकोणत्या संसाधनांवर स्त्रिया आणि पुरूषांचे नियंत्रण असते, स्त्रिया आणि पुरुष यांनी कसे वागावे आणि कसे वागू नये यासंबंधी समाजाचे जे काही नियम आणि अपेक्षा असतात त्या सर्वांचा एकत्रिक विचार करणे म्हणजे लिंगभावाचा विचार करणे.

लिंगभाव ही संकल्पना केवळ स्त्रियांबद्द्ल बोलत नाही हे आपल्याला आता समजले असेल.

खालील वाक्यं लिंगभेद दर्शवतात की लिंगभाव दर्शवतात ते सांगा.

१. पुरूषांना मासिक पाळी येत नाही.
२. स्त्रिया जास्त भावनाप्रधान असतात.
३. पुरूष जास्त चांगले व्यवस्थापक असतात.
४. आई तिच्या तान्ह्या बाळाला स्तनपान देऊ शकते.
५. पुरूष ट्रॅक्टर चालवतात आणि स्त्रिया खुरपणी करतात.
६. पुरूष कुटुंबप्रमुख असतात.
७. स्त्रिया एपीएमसीत (कृषि उत्पन्न बाजार समिती) जात नाहीत.
८. घरातले काम ही स्त्रियांची जबाबदारी आहे.

******

# प्रकरण ७ सत्र १.३ लिंगभाव: काही महत्त्वाच्या संकल्पना

**या प्रकरणात आपण पुढील मुख्य मुद्दे शिकणार आहोत:**

- लिंगभाव धारणांच्या वैयक्तिक आयुष्यातील स्थानाबाबत आत्मपरीक्षण.
- लिंगभाव धारणा स्त्रियांना आणि पुरूषांना कशा प्रभावित करतात.
- लिंगभाव धारणेशी संबंधित आणखी काही महत्त्वाच्या कल्पना.

**सत्राची रूपरेषा**

| घटक / मुद्दा | तपशील |
|---|---|
| सत्राची उद्दिष्टे: | • लिंगभाव धारणांच्या वैयक्तिक आयुष्यातील स्थानाबाबत आत्मपरीक्षण करणे.<br>• लिंगभाव धारणा स्त्रियांना आणि पुरूषांना कशा प्रभावित करतात हे समजून घेणे.<br>• लिंगभाव धारणेशी संबंधित आणखी काही महत्त्वाच्या कल्पना समजून घेणे. |
| कालावधी: | १०५ मिनिटे |
| पद्धत: | • अनुभवकथन<br>• खुली चर्चा<br>• प्रशिक्षकाचे व्याख्यान (चर्चेत आलेल्या उदाहरणांच्या विश्लेषणासह) |
| आवश्यक साहित्य: | चार्ट्स, मार्कर्स, सेलोटेप अथवा पिन्स |

**सत्र संचालनाची प्रक्रिया**

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| ०० - १५ | **अनुभवकथन**<br>• दोन प्रशिक्षणार्थींचा एक गट असे गट करावेत. स्त्रिया आणि पुरूष कदाचित एकमेकांशी मोकळेपणाने बोलू शकणार नाहीत अशा स्थितीत स्त्री-स्त्री आणि पुरूष-पुरूष असे गट करावेत.<br>• प्रत्येक गटाने खालील मुद्द्यांवर आधारित अनुभवकथन करायचे आहे.<br>○ तुम्ही मुलगी/मुलगा आहात हे तुम्हाला सर्वप्रथम कधी कळले? (साधारणपणे कितव्या वर्षी?)<br>○ तुम्ही मुलगी/मुलगा आहात हे तुम्हाला ज्या प्रसंगातून कळले त्या प्रसंगाचे वर्णन करा. तुम्हाला हे कोणी सांगितले? सांगणाऱ्या व्यक्तीला तुम्हाला काय संदेश द्यायचा होता? त्या प्रसंगी अन्य लोक उपस्थित होते का? त्यांची प्रतिक्रिया काय होती हे तुम्हाला आठवते का?<br>○ तुम्हाला कोणते काम दिले गेले? कोणत्या जबाबदाऱ्या दिल्या गेल्या?<br>○ तुम्हाला कोणत्या सोयी-सवलती-प्राधान्य मिळाले? |

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| | ○ तुमच्यावर कोणती बंधने होती? |
| १५ - ४५ | **एकत्र चर्चा**<br>• प्रशिक्षणार्थींना त्यांचे स्वत:चे अनुभव सांगायला आमंत्रित करावे. कोणावरही अनुभवकथनाची सक्ती करू नये. प्रशिक्षकाने आपला स्वत:चा अनुभव थोडक्यात सांगून सुरूवात करायला हरकत नाही. चार-पाच प्रशिक्षणार्थींचे अनुभवकथन झाल्यावर पुढच्या मुद्द्याकडे वळावे.<br>• पुढील मुद्द्यांवर चर्चा करावी<br>○ मुलींनी/मुलांनी काय करू नये असे आपल्याला शिकवले जाते?<br>○ मुलींकडून आणि मुलांकडून असणाऱ्या अपेक्षांमध्ये काय फरक असतो?<br>○ अशा कोणत्या गोष्टी आहेत ज्या मुलींनी केल्या तर चालतात पण मुलांनी केल्या तर चालत नाहीत?<br>○ अशा कोणत्या गोष्टी आहेत ज्या मुलांनी केल्या तर चालतात पण मुलींनी केल्या तर चालत नाहीत?<br>○ मुली आणि मुलगे यांच्यात अधिकाधिक फरक कोणत्या टप्प्यावर पडत जातो?<br>○ स्त्रीने कसे वागावे आणि पुरुषाने कसे वागावे हे आपण कोणकोणाकडून शिकतो?<br>○ स्त्री/पुरूष असण्यामुळे आपले आयुष्य कसे बदलते असे तुम्हाला वाटते? |
| ४५ - ९५ | **प्रशिक्षकाचे व्याख्यान**<br>पुढील संकल्पना स्पष्ट करणे<br>• लिंगभावाधारित भेदभाव (Gender Discrimination)<br>• लिंगभावाधारित भूमिका (Gender Roles)<br>• लिंगभावाधारित गरजा (Gender Needs)<br>• लिंगभाव समानता आणि लिंगभाव समता (Gender Equality and Gender Equity) |
| ९५ - १०५ | प्रश्नोत्तरे, शंकानिरसन |

**सत्र संचालनासाठी आवश्यक माहिती: लिंगभाव: काही महत्त्वाच्या संकल्पना**

प्रशिक्षणार्थी जे अनुभव सांगतील त्या अनुभवांत काही समान सूत्रे समोर येतील. मुलगी आणि मुलगा यांच्यात लहानपणापासून भेदभाव केला जातो हे उदाहरणार्थ मुला-मुलींना दिली जाणारी खेळणी आणि त्यांना घालण्यात येणार कपडे यावरून स्पष्ट होते. मुलगी जसजशी मोठी होते तसतसे तिने घरातल्या कामात आईला मदत करावी आणि मुलाने वडिलांनी बाहेरची कामे करण्यात मदत करावी या अपेक्षा केल्या जातात. या भूमिकांमुळे आणि काही जीवशास्त्रीय स्थितीमुळे महिलांच्या आणि पुरूषांच्या गरजा वेगळ्या

होत जातात. मुलग्यांना आणि पुरूषांना घरात एक प्रकारची सत्ता असते आणि मुलींचे-स्त्रियांचे स्थान दुय्यम राहते.

काही महत्त्वाच्या संकल्पनांची आपण थोडक्यात ओळख करून घेऊ

१. **लिंगभावाधारित भेदभाव (Gender Discrimination):** व्यक्तींना आणि विशिष्ट गुणधर्म असणाऱ्या समुहांना त्या गुणधर्मामुळे वेगळी भेदभावाची वागणूक मिळणे म्हणजे भेदभाव. स्त्रियांबाबत केवळ त्या स्त्रिया आहेत म्हणून व्यक्तिगत आणि सामाजिक पातळीवर अनेकदा भेदभाव केला जातो. हा लिंगभावाधारित भेदभाव होय. आपल्या सहकाऱ्यांनी सांगितलेल्या अनुभवांमधून आपल्याला लिंगभेदाची अनेक उदाहरणे मिळाली. आपल्याही आयुष्याकडे पाहतानाही आपल्याला ही उदाहरणे दिसतील. उदाहरणार्थ आपण गावात शेतकऱ्यांची बैठक घेतो तेव्हा पुरेशा खुर्च्या नसतील तर जमिनीवर कोण बसते आणि खुर्च्यांवर कोण बसते? एखाद्या कुटुंबात मुला-मुलींच्या शिक्षणासाठी पुरेसे पैसे नसतील तर कोणाच्या शिक्षणाला प्राधान्य दिले जाते? घरात सायकल कोणासाठी आधी घेतली जाते? सणासुदीच्या दिवशी घरात कोण आधी जेवते आणि कोण सर्वात शेवटी जेवते? नोकरीसाठी मुलाखत घेताना लग्नासंबंधीचे प्रश्न स्त्रियांना विचारले जातात की पुरूषांना विचारले जातात? देवळातले पुजारी कोण असतात - स्त्रिया की पुरूष? कुटुंबात आणि समाजात विविध स्तरांवर महिलांना अनेक ठिकाणी दुय्यम स्थान आहे हे अशा अनेक उदाहरणांवरून सिद्ध होते. स्त्रियांना कामाच्या ठिकाणी आणि घरातही लैंगिक छळ सहन करावा लागतो. स्त्री भ्रूणहत्त्या आणि कायदेशीर हक्कांचा अभाव अशा समस्या स्त्रियांना सोसाव्या लागतात. शिक्षण आणि नोकऱ्या यात असलेली स्त्री-पुरष विषमता आपण सारेजण जाणतो. समान काम करून आणि समान जबाबदारी घेऊनही अनेक क्षेत्रांत स्त्रियांना पुरूषांपेक्षा कमी वेतन मिळते. आपल्या देशात स्त्री आमदार-खासदार यांची संख्या पुरूष आमदार-खासदारांपेक्षा लक्षणीय रीतीने कमी आहे. स्त्रियांबाबत असा भेदभाव त्यांच्या क्षमतांमुळे केला जात नसून केवळ स्त्रियांविषयीच्या असलेल्या लिंगभाव धारणांमुळे केला जातो. पुरूषांनाही याचे परिणाम भोगावे लागतात पण स्त्रिया आणि मुलींना याचे जास्त परिणाम भोगावे लागतात.

२. **लिंगभावाधारित भूमिका (Gender Roles):** येथे भूमिका या शब्दाचा अर्थ व्यक्तीचा सर्वसामान्य व्यवहार असा आहे. सामाजिक संस्कार आणि सामाजिक परंपरा यावर ही भूमिका आधारित असते. सर्वच समुदायांमध्ये महिलांकडून आणि पुरूषांकडून विशिष्ट प्रकारच्या अपेक्षा केल्या जातात आणि त्या वेगवेगळया असतात. उदाहरणार्थ पुरूषाने रडू नये, बाईने मोठ्याने हसू नये. या अपेक्षा फक्त इतर स्त्री-पुरूषांकडून नसतात तर स्वत:कडूनही असतात. आपण घरात, शाळेत, समाजात, कामाच्या ठिकाणी वावरताना, पुस्तकातून, चित्रपटातून, धार्मिक ग्रंथांतून या अपेक्षा शिकतो. सर्वांनी या अपेक्षांनुसार वागले पाहिजे असा अलिखित नियम असतो. या भूमिका लिंगभेदावर - व्यक्तीचे लिंग काय आहे - यावर आधारित आहेत असा सर्वसाधारण समज असतो. परंतु हा समज चुकीचा आहे हे आपण यापूर्वीच्या सत्रात सविस्तर पाहिले आहे.

स्त्रिया आणि पुरूष त्यांच्या आयुष्यभरात जी कामे करतात त्यांची विभागणी तीन गटांत केली जाते.




**क. उत्पादक काम:** जे काम केल्याने काम करणाऱ्या व्यक्तीला पैसे मिळतात (किंवा तितके मूल्य असणाऱ्या वस्तू मिळतात) त्याला 'उत्पादक काम' म्हटले जाते. उत्पादक कामातून वस्तुंचे उत्पादन (उदा. शेतातले पीक) होते किंवा सेवा दिल्या जातात (उदा. पोस्टाची सेवा). समाजात साधारणपणे उत्पादक कामाला जास्त महत्त्व मिळते. स्त्रिया आणि पुरूष दोघेही उत्पादक काम करत असले तरी अनेकदा स्त्रियांचे काम एकतर मोजले जात नाही किंवा स्त्रियांनी केलेल्या कामाचे मूल्य कमी दिले जाते. काम 'उत्पादक' आहे की नाही असे सरसकट ठरवता येत नाही. त्या कामाचा परिणाम ते विशिष्ट काम 'उत्पादक' आहे की नाही हे ठरवतो. उदाहरणार्थ स्त्री रोज घर झाडते, पण त्याचे काही तिला पैसे मिळत नाहीत. म्हणजे तिचे झाडण्याचे काम 'उत्पादक' नाही. मात्र ग्रामपंचायत कार्यालयात झाडू मारणारा पुरूष अथवा स्त्री यांना त्या कामाचे पैसे मिळतात. येथे झाडण्याचे काम 'उत्पादक' बनते. स्त्रिया आणि पुरूष दोघेही 'उत्पादक' काम करतात हे आपण अनेकदा पाहतो.

**ख. पुनरूत्पादक काम:** 'पुनरूत्पादक' काम म्हणजे केवळ पुनरूत्पादनाचे, प्रजननाचे काम नाही. जे काम वारंवार करावे लागते आणि ज्याचे पैशात मूल्य होत नाही अशी सगळी कामे 'पुनरूत्पादक' म्हणून गणली जातात. स्वत:च्या घरातली सर्व कामे ही 'पुनरुत्पादक' कामे आहेत. ही कामे स्त्रियाच करतात, पुरूष क्वचित कधीतरी घरातले काम करताना दिसतात. पुनरूत्पादक कामाचे मूल्य पैशात केले जात तर नाहीच, पण ते काम अकुशल आणि दुय्यम दर्जाचे समजले जाते. पुनरूत्पादक कामाचा आणि व्यक्तीच्या लिंगाचा काहीही संबंध नाही हे आपल्या लक्षात आले असेलच. झाडून काढणे, स्वयंपाक करणे, भांडी घासणे, लहान मुलीला-मुलाला आंघोळ घालणे, मुलांना जेवण भरवणे, वृद्धांची सेवा करणे - ही कामे

स्त्रियांप्रमाणे पुरूषही करू शकतात. किंबहुना अशा कामांचे पैसे मिळाले तर पुरूषही ही कामे करतात हे दिसून येते. घरातील कामाची जबाबदारी मात्र परंपरेने स्त्रियांचीच समजली जाते.

ग. **सामाजिक व्यवस्थापनाचे काम:** 'सामाजिक व्यवस्थापनाचे काम' म्हणजे समाजातील परस्परसंबंध चांगले टिकून राहावेत, सामाजिक संसाधनांची सुरक्षितता राहावी यासाठी केलेली कामे. स्त्रिया आणि पुरूष दोघेही अशी कामे करताना दिसतात. गावच्या जत्रेत किंवा शेजाऱ्याच्या लग्नात किंवा मयतीच्या प्रसंगी स्त्रिया आणि पुरूष इतर कुटुंबाच्या मदतीस धावून जातात असे दिसते. हे काम करण्यातून पैसे मिळत नाहीत पण समाजातील इतर लोकांशी चांगले संबंध प्रस्थापित होतात. आपल्याला गरज पडेल तेव्हा इतर कुटुंबेही मदतीला येण्याची शक्यता वाढते. त्या अर्थी हे पुनरुत्पादक कामाचेच विस्तारित रूप आहे. अनेकदा पुरूष दिवसभर घराबाहेर असतात तेव्हा इतरांना मदत करण्याची जबाबदारी स्त्रियांना उचलावी लागते. सामाजिक व्यवस्थापनाचे काम पुरूष आणि स्त्रिया दोन्हीही करत असले तरी सर्वसाधारणपणे स्त्रियांवर याची अधिक जबाबदारी असते.

वरील तीनही कामांचा विचार केल्यावर असे दिसते की पुरूष दोन प्रकारची कामे करतात - उत्पादक आणि सामाजिक व्यवस्थापन. तर स्त्रिया तीनही प्रकारची कामे करतात. यालाच महिलांवर असलेला **"तिहेरी कामाचा बोजा"** असे म्हणतात.

३. **लिंगभावाधारित गरजा (Gender Needs) :** स्त्रिया आणि पुरूष यांच्या भूमिका वेगवेगळया असल्याचा परिणाम त्यांच्या गरजांवरही होतो, अनेकदा त्यांच्या गरजा वेगवेगळया असतात. या गरजा दोन प्रकारच्या आहेत.

1 व्यावहारिक गरजा

2 नीतिगत गरजा

क. **व्यावहारिक गरजा (Practical Gender Needs):** ज्या गरजा भागवल्याने अपेक्षित असणाऱ्या भूमिका निभावून **नेण्यास** स्त्री-पुरूषांना नदत होते, त्याला 'व्यावहारिक लिंगभाव गरज' असे म्हणतात. मुलींच्या आणि स्त्रियांच्या व्यावहारिक लिंगभाव गरजा त्यांच्याकडे आलेल्या पारंपरिक भूमिकेशी निगडित असतात. निवारा, पाणी, पैसे मिळवून देणारे काम यांच्याशी या गरजा जोडलेल्या असतात. उदारहणार्थ - स्वयंपाक करणे हे स्त्रीचे काम समजले जात असल्याने निर्धुर चूल ही स्त्रीची गरज असते, पुरूषाची गरज नसते. ग्रामपंचायत कार्यालयात महिला संध्याकाळी किंवा रात्री जात नाहीत. त्यामुळे ग्रामपंचायत कार्यालयात विजेचा दिवा हवा ही स्त्रियांची व्यावहारिक गरज नसते, पण ती पुरूषांची असू शकते.

स्त्रियांसाठी विशेष प्रशिक्षण, सुधारित विळा, बाजारभावाची माहिती .. या प्रकारच्या गरजा स्त्रियांच्या शेतीविषयक व्यावहारिक लिंगभाव गरजा आहेत. महिला-पुरूषांच्या व्यावहारिक गरजा समान नसतात आणि म्हणून कार्यक्रमाची आखणी करताना महिला आणि पुरूष या दोन्ही गटांशी आपण नेहमी विचारनिनिमय केला पाहिजे. व्यावहारिक गरजा ओळखणे तुलनेने सोपे असते आणि या गरजा बाहेरच्या मदतीतून पूर्णही करता येतात. या गरजांच्या पूर्तीतून रोजचे जगणे थोडेसे सुसह्य नक्कीच होते, पण या गरजांच्या पूर्ततेतून महिलांच्या घरातल्या आणि समाजातल्या स्थानात सुधारणा होत नाही. व्यावहारिक गरजांची पूर्तता हे आवश्यक पाऊल असले तरी ते पुरेसे नाही.

ख. **नीतिगत गरजा (Strategic Gender Needs/Interests):** पुरूषांच्या तुलनेत समाजात स्त्रियांचे स्थान दुय्यम असण्याच्या स्थितीतून ज्या गरजा उद्भवतात त्यांना 'नीतिगत गरजा' म्हणतात. काही लोक याला 'स्ट्रॅटेजिक इंटरेस्ट' म्हणतात. सत्तासंबंध बदलणे, लिंगभावावर आधारित श्रमविभाजन बदलणे, कायद्यानुसार साधनसंपत्तीवर समान अधिकार असणे, समान कामास समान वेतन, कुटुंबांतर्गत हिंसेला प्रतिबंध..... असे अनेक मुद्दे आहेत की ज्या नीतिगत गरजा आहेत. कृषि क्षेत्रातल्या नीतिगत लिंगभाव गरजांची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत - शेतकरी उत्पादक कंपनीच्या निर्णयप्रक्रियेच सहभाग, शेतकरी उत्पादक कंपनीच्या संचालक मंडळात स्त्रियांचा सहभाग, जमिनीवर मालकीहक्का, बँकेतून कर्ज मिळण्याची सोय, शासकीय योजनींचा लाभ, शेतीविषयक तंत्रज्ञानासंबंधीची माहिती.... इत्यादी. नीतिगत गरजा ओळखणे सोपे नसते आणि त्या पूर्ण करणेही सोपे नसते. फक्त स्त्रियांसोबत काम करून, त्यांना जागरूक करून, आणि नवे शिक्षण देऊन नीतिगत गरजा पूर्ण होणार नाहीत. स्त्रियांइतकेच किंबहुना थोडेसे जास्तच काम पुरूषांबरोबर करण्याची गरज आहे. नीतिगत गरजांच्या पूर्ततेतून जोवर स्त्रियांचे स्थान पुरूषांच्या बरोबरीचे होत नाही तोवर स्त्री-पुरूषसोबत सातत्याने काम करणे गरजेचे आहे.


४. **लिंगभाव समानता (Gender Equality):** स्त्रियांना आणि पुरूषांना समान हक्क, समान जबाबदाऱ्या आणि समान संधी असणे म्हणजे लिंगभाव समानता - जेंडर इक्वालिटी. या समानतेचा अर्थ असा नाही की स्त्रिया पुरूषांसारख्या बनतील आणि/किंवा पुरूष स्त्रियांसारखे बनतील. लिंगभाव समानतेचा अर्थ असा आहे की हक्क, जबाबदाऱ्या आणि मिळणाऱ्या संधी या बाबी ती व्यक्ती स्त्री आहे की पुरूष आहे यावर अवलंबून असणार नाहीत. निर्णय प्रक्रियेत महिलांचा समान सहभाग असणे हे लिंगभाव समानतेसाठी महत्त्वाचे पाऊल आहे.

५. **लिंगभाव समता (Gender Equity):** लिंगभाव समता ही महिला आणि पुरूषांना न्याय देणारी प्रक्रिया आहे. स्त्रिया आणि पुरूषांना केवळ समान संधी आणि समान साधने देणे पुरेसे नाही. पिढ्यानपिढ्या वंचित राहिल्यामुळे स्त्रियांना काही क्षमता, काही कौशल्ये शिकायला कदाचित अधिक थोडा वेळ लागेल. याचा अर्थ स्त्रियांमध्ये क्षमता कमी आहेत असा नाही. पुरूषांनी घरकाम करायचे असा उद्या नियम झाला तर पुरूषांनाही स्त्रियांसारखे झटपट आणि परिणामकारक

घरकाम करायला सहज जमेलच असे नाही. स्त्रिया आणि पुरूष यांचे जीवनानुभव ते स्त्री आणि पुरूष असल्यामुळे वेगळे असतात. याच कारणास्तव त्यांच्या गरजाही वेगळया असतात. समान संधी ही खरोखर समान नसते हे आपण आत्तापर्यंतच्या चर्चेत पाहिले आहे. स्त्रिया कोणत्याही गोष्टी करतात त्या घरकामाची जबाबदारी सांभाळून आणि समाजात-घरात दुय्यम भूमिका निभावून हे आपण विसरता कामा नये. स्त्रियांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन त्यांच्यासाठी काही वेगळया सोयी करणे ही समता होय. (समाजातील सर्व वंचित घटकांसाठी हा विचार लागू आहे.) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी आरक्षण, कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई, आणि निवारण) कायदा, ही आणखी दोन उदाहरणे समतेच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे. कृषि क्षेत्राचा विचार केला तर १९९२ ची महाराष्ट्र सरकारची 'लक्ष्मी मुक्ती योजना' -ज्याद्वारे महिलांचे नाव सातबाऱ्यावर जोडले जाऊ शकते, १९७६ चा समान काम समान वेतन कायदा, स्त्रियांना सरकारी योजनांमध्ये प्राधान्य, स्त्रियांच्या शेतकरी उत्पादक संस्थांची स्थापना, महिला शेतीशाळा, ATMA चे तीस टक्के बजेट स्त्रियांसाठी वापरणे .... अशी काही उदाहरणे सहज आठवतात. एका अर्थी असे म्हणता येईल की लिंगभाव समता ही लिंगभाव समानतेच्या दिशेने टाकण्याचे महत्त्वाचे पाऊल आहे. ऐतिहासिक अनुशेष (बॅकलॉग) भरून निघाला की खरी समानता येईल.

**समता आणि समानता - कोल्हा आणि करकोचा यांची गोष्ट (चित्रे - इंटरनेटवरून साभार)**

**Equality and Equity - The Tale of the Fox and the Stork** *(Images Source: Internet)*











या चार चित्रांपैकी दुसरे आणि तिसरे चित्र समानता दर्शवते तर चौथे चित्र समता दर्शवते.

******

# प्रकरण ८ सत्र १.४ सत्ता आणि विशेषाधिकार

**या प्रकरणात आपण पुढील मुख्य मुद्दे शिकणार आहोत:**

- सामाजिक समावेशनाची संकल्पना.
- लिंगभावाच्या संदर्भात सत्ता, प्राधान्य, आणि समावेशन या संकल्पना.
- स्मार्ट प्रकल्पाचे सामाजिक समावेशन धोरण.

**सत्राची रूपरेषा**

| घटक / मुद्दा | तपशील |
|---|---|
| सत्राची उद्दिष्टे: | • सामाजिक समावेशनाची संकल्पना स्पष्ट होणे.<br>• सत्ता ही संकल्पना लिंगभावाच्या संदर्भात स्पष्ट होणे.<br>• समाजातील कोणकोणत्या घटकांचा सामाजिक प्रक्रियेत समावेश होत नाही आणि तो का आणि त्यासाठीची उपाययोजना समजून घेणे.<br>• प्रकल्पाच्या सामाजिक समावेशन धोरणाची माहिती होणे. |
| कालावधी: | ६० मिनिटे |
| पद्धत: | खेळ, पॉवर पॉईट प्रेझेंटेशन, चर्चा |
| आवश्यक साहित्य: | २५ प्रशिक्षणार्थी एकमेकांत प्रत्येकी तीन फूट अंतर राखून 'पॉवर वॉक' हा खेळ खेळू शकतील इतकी जागा, प्रत्येक प्रशिक्षणार्थीसाठी भूमिका लिहिलेल्या चिठ्ठ्या, प्रशिक्षकाने वाचायची वाक्ये, खडू, चाट्र्स, मार्कर पेन्स, लॅपटॉप, प्रोजेक्टर, प्रेझेंटेशन |

**सत्र संचालनाची प्रक्रिया**

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| ०० - २५ | **पॉवर वॉक खेळ**<br>• सामाजिक समावेशनाची संकल्पना स्पष्ट होण्यासाठी हा अभ्यास-खेळ घेतला जात आहे. हा खेळ दोन फेरींमध्ये घेतला जाणार आहे.<br>**पूर्वतयारी**<br>• प्रत्येक प्रशिक्षणार्थीसाठी एक इतक्या चिठ्ठ्या सत्रापूर्वी तयार कराव्यात. या चिठ्ठ्यांवर वेगवेगळी ओळख असलेल्या व्यक्ती असाव्यात. या चिठ्ठ्यांमध्ये पन्नास टक्के चिठ्ठ्यांवर स्त्रियांच्या भूमिका असाव्यात. चिठ्ठ्यांवर समाजातील वेगवेगळ्या घटकांचे प्रतिनिधित्व असावे.<br>• प्रशिक्षकाने वाचायची वीस वाक्यं वेगळ्या कागदावर तयार ठेवावीत. |

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| | **अभ्यास-खेळ पहिली फेरी**<br>• प्रशिक्षणार्थींचे दोन गट करावेत. पहिल्या टप्प्यात एक गट खेळास सहभागी होईल आणि दुसरा गट निरीक्षकाची भूमिका पार पाडेल. दुसऱ्या टप्प्यात दुसरा गट खेळात सहभागी होईल आणि पहिला गट निरीक्षकाच्या भूमिकेत असेल.<br>• पॉवर वॉकच्या सविस्तर सूचना द्याव्यात. सूचना समजल्या आहेत याची खात्री करून खेळाला सुरूवात करावी. पहिल्या टप्प्यात फक्त पहिला गट सहभागी होईल.<br>• पहिल्या फेरीसाठी भूमिका आणि वाक्ये यासाठी **परिशिष्ट ५** पाहावे.<br>• सभागृहात पुढे-मागे हालचाल करण्यासाठी पुरेशी जागा असेल अशा ठिकाणी एक सरळ रेषा आखावी. पहिल्या गटातील प्रशिक्षणार्थींना रेषेवर उभे करावे.<br>• प्रत्येक प्रशिक्षणार्थीने एक चिठ्ठी निवडावी. आपली चिठ्ठी प्रशिक्षणार्थींनी दुसऱ्या कोणालाही दाखवू नये अथवा सांगू नये याबाबत सूचना द्यावी.<br>• प्रशिक्षक विविध वाक्ये म्हणेल त्यानुसार करणे शक्य असेल तर प्रशिक्षणार्थी एक पाऊल पुढे येतील. तसे करणे शक्य नसेल तर एक पाऊल मागे जातील.<br>• प्रशिक्षणार्थींनी पाऊल पुढे- मागे टाकण्याचा निर्णय स्वत:च्या जगण्यानुसार वा कलानुसार घ्यायचा नसून जी चिठ्ठी त्यांच्या हातात आहे ती व्यक्ती काय करू शकेल यानुसार निर्णय घ्यायचा आहे याची आठवण पहिल्या वाक्यानंतर करून द्यावी.<br>• दहा वाक्यं वाचून झाल्यावर प्रशिक्षणार्थींना जागा न सोडण्याची सूचना देऊन कोण पुढे आहे आणि कोण मागे आहे याबाबत इतरांना अंदाज बांधावयास सांगावे. उदाहरणार्थ - सगळयात पुढे राजकीय नेता असेल, सगळयात मागे दलित विधवा स्त्री असेल ...इत्यादी.<br>• प्रशिक्षणार्थी जागा सोडून खुर्चीवर बसण्यास उत्सुक असलयास फळयावर अथवा चार्टवर सर्वांचे स्थान लिहून ठेवावे - सगळयात पुढं कोण, दुसरं कोण, तिसरं कोण, शेवटी कोण इत्यादी - ही नावं चिठ्ठीवरच्या व्यक्तिमत्वांची आहेत.<br>**खेळाचे विश्लेषण पहिली फेरी**<br>• दुसऱ्या व्यक्तीच्या भूमिकेतून विचार करताना प्रशिक्षणार्थींना काय वाटले यावर चर्चा करावी<br>• जे लोक रेषेच्या पुढे आहेत , त्याची काय कारणे असतील यावर चर्चा करावी.<br>• जे लोक रेषेच्या मागे आहेत, त्यामागच्या कारणांवर चर्चा करावी.<br><br>**अभ्यास-खेळ दुसरी फेरी**<br>• पहिल्या फेरीप्रमाणे सर्व प्रक्रिया करावी. चिठ्ठी निवडणे, रेषेवर उभे राहणे, प्रशिक्षकाने वाचलेल्या वाक्यांवर भूमिकेनुसार एक पाऊल पुढे अथवा मागे जाणे, |

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| | आणि कोणते लोक कोणत्या स्थानांवर आहेत याचे विश्लेषण करणे.<br>• दुसऱ्या फेरीसाठी भूमिका आणि वाक्ये यासाठी **परिशिष्ट ६** पाहावे.<br><br>**खेळाचे विश्लेषण दुसरी फेरी**<br>• पहिल्या फेरीप्रमाणे खेळाचे विश्लेषण करावे.<br>• कृषि खात्याच्या कार्यक्रमात सामील होणाऱ्या लोकांबाबत आपल्याला काय म्हणता येईल? रेषेच्या पुढचे जास्त असतात की रेषेच्या मागचे जास्त असतात?<br>• रेषेच्या मागे असणारांना आपल्या कार्यक्रमात सहभागी करून घेण्यासाठी कृषि खात्याने काय प्रयत्न केले पाहिजेत यावर चर्चा करावी.<br>सामाजिक समावेशनाची व्याख्या सांगावी. |
| २५ - ३५ | **सत्ता आणि विशेषाधिकार**<br>• विशेषाधिकारातून सत्ता आणि पूर्वग्रह कसे निर्माण होतात<br>• पूर्वग्रह आणि भेदभाव |
| ३५ - ५५ | **प्रकल्पाचे सामाजिक समावेशन धोरण**<br>• विविध घटकांचा समावेश,<br>• विचारविनिमय,<br>• समता,<br>• फॅसिलिटेशन,<br>• पारदर्शिता<br>• उत्तरदायित्व |
| ५५ - ६० | प्रश्नोत्तरे, शंकानिरसन |

## सत्र संचालनासाठी आवश्यक माहिती

पॉवर वॉक या खेळातून आपल्याला हे स्पष्ट दिसून आले की सामाजिक समावेशनातून काही लोक नेहमी वगळले जातात. आपण काही वेळा सामाजिक जीवनात सहभागी होऊ शकतो तर काही वेळा आपल्या सहभागावर निर्बंध असतात. एका अर्थी समावेशित नसण्याचा अनुभव आपल्या सर्वांनाच कधी ना कधी आलेला असतो. तत्कालिक किंवा हंगामी समावेश न होऊ शकणे (उदाहरणार्थ मला चांगले इंग्रजी बोलता येत नसेल तर विदेशी पाहुण्यांसमवेतच्या चर्चेत माझा समावेश होऊ शकत नाही) आणि कायमचा समावेश नसणे यात मोठा फरक आहे हे आपण नीट समजून घेतले पाहिजे.

### क. 'सामाजिक समावेशन' म्हणजे काय?

समाजात वेगवेगळया घटकांचे लोक राहतात. प्रत्येक व्यक्तीची जशी व्यक्तिगत ओळख असते, तशी एक सामाजिक ओळखही असते. मी अमूक भाषा बोलते-बोलतो; मी शेतकरी आहे-नाही; मी शिक्षित आहे-नाही; मी मोठ्या शहरात- तालुक्याच्या ठिकाणी-खेड्यात राहते-राहतो; मी अमूक धर्माची-धर्माचा आहे; मी शाकाहारी-मांसाहारी आहे ....अशा विविध ओळख असणाऱ्या गटांमध्ये आपण वावरत असतो.


अनेक लोकांना ते एका विशिष्ट गटाचे आहेत म्हणून राजकीय, आर्थिक, आणि सामाजिक-सांस्कृतिक सहभागाची संधी नाकारली जाते. वय, शिक्षण, व्यवसाय, जात, लिंग, धर्म अशा अनेक बाबींवरून कोणाला सहभागी करून घ्यायचे आणि कोणाला टाळायचे हे ठरले जाते. असा भेदभाव करणे बेकायदेशीर असले तरी अनेकदा अनौपचारिक व्यवहारांत असा भेदभाव अनेक लोक करतात असे दिसते. आपणही कळत-नकळत अनेकदा असा भेदभाव करत असतो हे विचार केल्यावर आपल्या लक्षात येईल.

जागतिक बँकेनुसार सामाजिक समावेशन ही व्यक्तींचा आणि गटांचा सार्वजनिक जीवनातल्या सहभागामध्ये सुधारणा घडून येण्याची प्रक्रिया आहे. सहभागाची संधी न मिळणाऱ्या वंचित गटांच्या क्षमतांचा विकास करणे, त्यांना सहभागाच्या पुरेशा संधी उपलब्ध होणे, आणि त्यांच्या सामाजिक ओळखीला आत्मसन्मान प्राप्त होणे अशा सर्व पातळयांवर सुधारणा होण्यातून सामाजिक समावेशनाच्या प्रक्रियेला बळ मिळते.



### ख. सत्ता आणि विशेषाधिकार

सामाजिक रचनेमध्ये ज्या गटाला जन्मजात विशेषाधिकार असतात (पुरूष असणे, उच्च जातीचे असणे, श्रीमंत असणे इत्यादी) त्या गटांना सत्ता प्राप्त होते. या सत्तेसोबत इतरांबाबतत पूर्वग्रह बाळगण्याचीही प्रक्रिया होते. 'शेतकरी स्त्रिया कार्यक्रमात का सहभागी होत नाहीत' या प्रश्नावर 'त्यांना नवे शिकण्यात काहीच रस नसतो' असे उत्तर आपण सहज देतो. त्या स्त्रिया आहेत म्हणजे त्यांना घरकामाचीच आवड असणार आणि तंत्रज्ञान शिकण्याची ना त्यांची कुवत आहे ना त्यांना उत्साह असणार - हे आपण गृहित धरतो ते स्त्रियांबाबत असलेल्या आपल्या पूर्वग्रहामुळे.




'सत्ता' या शब्दाचा अर्थ फक्त राजकीय सत्ता असा नाही. सत्ता म्हणजे सामर्थ्य. सत्ता म्हणजे एखादी विशिष्ट कृती करण्याची क्षमता असणे. सत्ता म्हणजे इतरांचे विचार, निर्णय, आणि व्यवहार प्रभावित करण्याची क्षमता असणे. विशिष्ट प्रकारचे शारिरिक

काम करण्यातूनही सामर्थ्य दिसते.

आपल्या समाजरचनेत व्यक्ती म्हणून मला असलेले विशेषाधिकार आणि त्यातून मला (कळत वा नकळत) मिळणारी सत्ता यांचे भान आपल्याला सदैव असले पाहिजे.

काही प्रकारची सत्ता विशेषाधिकार म्हणून मिळते तर काही पदामुळे मिळते. 'भारताचे राष्ट्पती' हे पदानुसार मिळणाऱ्या सत्तेचे आणि विशेषाधिकाराचे उदाहरण आहे. ज्ञान, कौशल्य, आणि जबाबदाऱ्या यामुळे काही वेळा विशेषाधिकार मिळतो (उदाहरणार्थ डॉक्टर्स, नर्सेस, आरोग्यसेवक यांना प्राधान्याने कोविडची लस देण्यात आली). प्रशिक्षणात प्रशिक्षकाला काही विशेषाधिकार असतात. सत्ता आणि विशेषाधिकारांचे वर्गीकरण अशा सात-आठ वेगवेगळ्या प्रकारांत करता येते. आपण येथे या प्रकारच्या सत्ता आणि विशेषाधिकाराचे विश्लेषण करणार नसून सामाजिक धारणांमधून मिळणाऱ्या सत्ता आणि विशेषाधिकाराचे विश्लेषण करत आहोत.

सत्ता ही नातेसंबंधांमधून व्यक्त होते. सत्ता नेहमी वाईट पद्धतीने आणि शोषण करण्यासाठी वापरली जाते असे नाही. सत्तेचे नकारात्मक रूप जास्त प्रचलित असले तरी सत्ता सकारात्मक रीतीनेही वापरली जाते.

साधारणपणे सत्तासंबंधांचे चार प्रकारांत विभाजन केले जाते.

१. **नियंत्रणात्मक सत्ता (Power Over) -** दुसऱ्यावर सत्ता गाजवणे हे सत्तेचे स्वरूप आपल्याला साधारणपणे जास्त करून पाहायला मिळते. बळ, बळजबरी, नियंत्रण, अधिकार गाजवणे, भीती अशी याची अनेक वैशिष्ट्ये सांगता येती. 'परीक्षेत अमक्यातमक्यापेक्षा तुला कमी मार्क मिळाले तर वर्षभर तुझा टीव्ही बंद' अशी धमकी आपल्या मुलांना देणे ही नियंत्रणात्मक सत्ता आहे. 'तमुक खत वापरणार असाल तरच कर्ज मिळेल' हे या सत्तेचे आणखी एक उदाहरण. या प्रकारात एकच विजेता असतो-असते आणि बाकी सारे पराभूत असतात. त्यामुळे सत्ता बळकावण्याकडे आणि ती काहीही करून टिकवून ठेवण्याकडे कल असतो. सत्ता ही मर्यादित असते, ती व्यक्तीच्या हाती असते, काही लोकांना सत्ता असते तर काहींना सत्ता नसते या विचारसरणीवर हा सत्ताप्रकार अवलंबून असतो. या सत्ताप्रकाराचे नकारात्मक परिणाम भोगल्यावरही दुसऱ्यांशी संबंध प्रस्थापित होताना या प्रकारे सत्ता गाजवण्याचा मोह माणसांना होतो, कारण सत्तेचे दुसरे काही प्रकार सहसा आपल्याला माहिती नसतात. या सत्तेममधून विशेषाधिकार निर्माण होतो आणि पोसला जातो.

२. **सत्तासहभाग (Power With) -** सत्तेमध्ये एकापेक्षा अधिक व्यक्तींचा सहभाग जेव्हा असतो तेव्हा त्याला सत्तासहभाग म्हटले जाते. अशा प्रकारच्या सत्तेचा रोख संघर्ष टाळून अधिकाधिक लोकांचा उत्कर्ष साधण्याकडे असतो. फरकांवर लक्ष केंद्रित न करता साम्यावर लक्ष केंद्रित करून हा सहभाग साधला जातो. यात एकमेकांप्रति आदर राखून निर्णय घेतले जातात. यात विशेषाधिकारांवर भर नसतो तर अधिकाधिक लोकांना निर्णयांमध्ये, कृतीमध्ये आणि फायद्यांमध्ये सामावून घेण्यावर भर असतो. कुटुंब, संस्था, सामाजिक चळवळी ही या प्रकारच्या सत्तेची काही

उदाहरणे आहेत. (अर्थात सर्वच कुटुंबात, संस्थांमध्ये आणि सामाजिक चळवळींमध्ये असे घडत नाही - यातल्या काही ठिकाणी क्रमांक १ मध्ये सांगतिलेली नियंत्रणात्मक सत्ता असते.) स्वयंसहायता समूह आणि सामुदायिक उत्पादक संस्था ही या सत्तेची काही उदाहरणे आपल्याला माहिती आहेत.

३. **क्षमता (Power To) -** या सत्ताप्रकाराचे वैशिष्ट्य म्हणजे कोणत्याही नातेसंबंधाच्या अभावात ही प्रकट होते. प्रत्येक व्यक्तीमध्ये स्वत:च्या जीवनाला आकार देण्याची, भोवतालच्या जगाला प्रभावित करण्याची सुप्त शक्ती असते. नवे काही निर्माण करणे, आपले ध्येय साध्य करणे, भोवतालच्या परिस्थितीत आमुलाग्र बदल घडवून आणणे अशा रीतीने या सत्तेचा प्रत्यय येतो. येथे सत्ता शब्दापेक्षा क्षमता हा शब्द जास्त चपखल आहे. प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढून निष्ठेने एका मार्गावर चालून यश मिळवणारे अनेक लोक आपण पाहतो. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, महात्मा गांधी, गाडगेबाबा अशा अनेकांच्या जीवनात या क्षमतेचा आविष्कार आपल्याला दिसून येतो.

४. **आंतरिक सामर्थ्य (Power Within) -** व्यक्तीला स्वत:च्या जाणीवेतून आलेले आत्मभान म्हणजे आंतरिक सामर्थ्य. प्रत्येक व्यक्तीच्या क्षमता आणि आकांक्षा वेगवेगळया असतात याची जाणीव होऊन इतर सर्वांबद्दल आदर आणि सन्मानाची भावना निर्माण करण्याचे सामर्थ्य आत्मभानामध्ये आहे. यातून लोकांच्या स्वत: कृती करण्याच्या क्षमता (Power To) आणि इतरांसमवेत सत्तासहभागाची (Power With) दृष्टी विकसित होते. आत्मसन्मान ही या सत्तेची गुरूकिल्ली आहे.

लोकांबरोबर काम करताना त्यांच्यावर नियंत्रण मिळवण्याचा (Power Over) मोह आपण टाळला पाहिजे. कामाचे नियोजन, देखरेख, मूल्यमापन या सर्वांमध्ये लोकांना सहभागी करून घेतले पाहिजे.

### ग. स्मार्ट प्रकल्पाचे सामाजिक समावेशन धोरण

स्मार्ट प्रकल्प राज्यातल्या सर्व विभांगात - औरंगाबाद, लातूर, अमरावती, नागपूर, नाशिक, ठाणे, पुणे आणि कोल्हापूर - राबवला जाईल.

उपप्रकल्प तयार करताना अत्य व अत्यल्प भूधारक शेतकरी (महिला व पुरूष), महिला उत्पादक व कामगार आणि अनुसूचित जाती व जमाती यांच्या सहभागाचे महत्त्व प्रकल्पाने अधोरेखित केले आहे. या विविध गटांच्या अडचणी जाणून घेणे, त्यांना उपलब्ध असणाऱ्या संधी जाणून घेणे, उपप्रकल्पांचे त्यांच्यावर होणारे परिणाम जाणून घेणे आणि प्रकल्पाबाबत त्यांचे अभिप्राय जाणून घेणे अशा विविध मार्गांनी सामाजिक समावेशनाचे धोरण अंमलात आणले जाईल.

स्मार्ट प्रकल्पाच्या 'सामाजिक समावेशन' धोरणातील मुख्य मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत:

१. **विविध घटकांचा समावेश:** स्मार्ट प्रकल्पात विविध प्रकारच्या शेतकरी स्त्री-पुरूषांचा सहभाग असावा यासाठी विशेष धोरण आखण्यात आले आहे. ८० टक्के प्रकल्प लाभार्थी अत्य व अत्यल्प

भूधारक शेतकरी असतील. प्रकल्पाच्या लाभार्थींमध्ये महिलांचा सहभाग ५० टक्के असेल. अनुसूचित जातींचे ७ टक्के तर अनुसूचित जमातींचे ६ टक्के शेतकऱ्यांना प्रकल्पाचा लाभ मिळेल.

२. **सर्व घटकांतील लाभार्थींशी विचारविनिमय:** प्रकल्पाबाबतचे निर्णय आणि प्रकल्प देत असलेल्या सेवा अधिक परिणामकारक व्हाव्यात यासाठी सर्व घटकांतली लाभार्थींशी सातत्याने विचारविनिमय केला जाईल. आवश्यकतेनुसार महिला, युवा वर्ग, दिव्यांग आणि तत्सम वंचित गटांशी वेगळ्या चर्चा केल्या जातील.

३. **समता:** महिला उत्पादक संस्था, अनुसूचित जाती आणि जमाती, दिव्यांग, गरीब, आणि अल्पसंख्य समुहाचे लोक अशा सर्व लाभार्थींना प्रकल्पामध्ये समान संधी असतील आणि त्यांना प्रकल्पाचे लाभही समान तऱ्हेने मिळतील याविषयी प्रकल्प पूर्ण दक्षता घेईल.

४. **फॅसिलिटेशन:** प्रकल्पाच्या विविध घटकांचा प्रकल्प अंमलबजावणीत आणि देखरेखीत सहभाग असावा यासाठी प्रकल्पाचे कर्मचारी सातत्याने प्रयत्न करतील. लाभार्थींना जास्तीत जास्त जबाबदारी घेता यावी यासाठी प्रकल्पाचे कर्मचारी सर्वतोपरी प्रयत्न करतील.

५. **पारदर्शिता:** प्रकल्पातील सर्व उपक्रम आणि सामुदायिक खरेदीसारख्या प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शी असतील. सर्व लाभार्थींना आणि विशेषत: संस्थागत सदस्यांना प्रकल्पाची माहिती उपलब्ध असेल.

६. **उत्तरदायित्व:** प्रकल्पाचे कर्मचारी आणि सामुदायिक संस्था निधी आणि कार्यक्रम यासाठी उत्तरदायी असतील.

******

# प्रकरण ९ सत्र १.५ लिंगभाव मापदंड (Gender Norms)

**या प्रकरणात आपण पुढील मुख्य मुद्दे शिकणार आहोत:**

- लिंगभाव मापदंड स्त्रिया आणि पुरूषांसाठी कसे वेगवेगळे असतात ते समजून घेणे.
- या वेगळ्या मापदंडांचा स्त्रियांच्या आणि पुरूषांच्या जीवनावर काय परिणाम होतो ते विस्ताराने समजून घेणे.

**सत्राची रूपरेषा**

| घटक / मुद्दा | तपशील |
|---|---|
| सत्राची उद्दिष्टे: | • आपल्या रोजच्या व्यवहारावर प्रभाव टाकणारे लिंगभाव मापदंड जाणणे<br>• लिंगभावाच्या धारणा स्त्रिया आणि पुरूषांच्या आयुष्यात कशा प्रकट होतात ते जाणणे |
| कालावधी: | ७५ मिनिटे |
| पद्धत: | • छोट्या गटांत विशिष्ट विषयांवर सविस्तर चर्चा<br>• गटांचे सादरीकरण<br>• गटांच्या सादरीकरणातून समोर आलेल्या मुद्द्यांवर चर्चा |
| आवश्यक साहित्य: | चार्ट्स, मार्कर पेन्स, सेलोटेप अथवा पिन्स |

**सत्र संचालनाची प्रक्रिया**

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| ०० - ०५ | • सत्राचा उद्देश सागंणे<br>• प्रशिक्षणार्थींची पाच गटांत विभागणी करणे<br>• तीनपेक्षा जास्त गट करावे लागले तर एक विषय दोन गटांना देता येईल. |
| ०५ - २५ | छोट्या गटांमध्ये अभ्यास<br>• गट १ – सुनेकडून असणाऱ्या अपेक्षा आणि जावयाकडून असणाऱ्या अपेक्षा<br>• गट २ – चांगली स्त्री कोणाला म्हटले जाते आणि चांगला पुरूष कोणाला म्हटले जाते याची यादी<br>• गट ३ -जुळ्या बहीण-भावांचा जीवनप्रवास<br>• गट ४ – कार्यालयात चांगली स्त्री कर्मचारी आणि चांगला पुरूष कर्मचारी कोणाला समजले जाते त्या गुणांची यादी<br>• गट ५ – नोकरी करणाऱ्या (कामाला बाहेर जाणाऱ्या) स्त्रियांकडून आणि नोकरी करणाऱ्या (कामाला बाहेर जाणाऱ्या) पुरूषांकडून केल्या जाणाऱ्या अपेक्षा |
| २५ - ४५ | गटांचे सादरीकरण |

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| ४५ - ७५ | पुढील मुद्द्यांवर चर्चा<br>• स्त्री-पुरूषांकडून असणाऱ्या अपेक्षा<br>• स्त्री-पुरूषांची कामे<br>• स्त्री-पुरूषांवर असणारी बंधने<br>• स्त्रियांचा -पुरूषांचा निर्णयांमध्ये सहभाग<br>• पुरूषांना-मुलांना आणि स्त्रियांना-मुलींना मिळणारे विशेषाधिकार<br>• पुरूषांना आणि स्त्रियांना मिळणारे प्राधान्य<br>• स्त्रियांसारखा व्यवहार पुरूषांनी केल्यास येणाऱ्या प्रतिक्रिया<br>• पुरूषांसारखा व्यवहार स्त्रियांनी केल्यास येणाऱ्या प्रतिक्रिया<br>• स्त्री-पुरूषांकडून वेगळया अपेक्षा करणे आपण कोठून शिकतो<br>• यात बदल कसा करायचा - त्यासाठी व्यक्ती म्हणून आपण काय करू शकतो |

**सत्र संचालनासाठी आवश्यक माहिती: लिंगभाव मापदंड**

या सत्रातील गटांच्या सादरीकरणानंतर चर्चेसाठी पुढील मुद्द्यांचा उपयोग करावा.

स्त्रिया आणि पुरूष यांच्यात अनेक प्रकारचे भेद केले जातात. हे भेद व्यक्तीच्या लिंगानुसार न ठरता त्या लिंगाबद्दल सामाजिक धारणा काय आहेत यावरून ठरते. काही उदाहरणे.

- लहान मुलांना शर्ट चड्डी घालायची आणि मुलींना फ्रॉक घालायचा याचा त्यांच्या जीवशीस्त्रीय लिंगाशी काहीही संबंध नाही.
- मुलीला भातुकली खेळायला देणे आणि मुलाला कार किंवा बंदूक देणे यातून स्वयंपाक करणे हे मुलीचे काम आहे हेच आपण बिंबवतो.
- मुलीला बाहुली देण्यातून बालसंगोपन हे तिचे काम आहे हे बिंबवले जाते.
- आपण जी भाषा वापरतो त्यातही लिंगभाव धारणा दिसून येतात. मुलगा रडायला लागला तर 'मुलीसारखा रडू नकोस' असे म्हणणे किंवा एखाद्या राजकीय नेत्यावर नाराजी व्यक्त करताना त्याला बांगड्या भेट म्हणून देणे (म्हणजे तू एखाद्या बाईसारखा नाकर्ता आहेस असे सुचवणे) यातून स्त्रियांचे दुय्यम स्थान अधोरेखित केले जाते.
- तुमच्या घराजवळच्या मैदानात तुम्हाला कोण खेळताना दिसते? मुली मैदानी खेळ का खेळत नसतील?
- घरात मुलींसाठी कोणते नियम असतात आणि मुलांसाठी कोणते नियम असतात?
- लग्न ठरवताना मुलीचे वय, उंची, शिक्षण हे मुलापेक्षा कमी असावे अशी अपेक्षा का असते?
- सून आणि जावई यांच्याकडून असणाऱ्या अपेक्षांमध्ये काय फरक दिसतात? हे फरक का आहेत?
- बाहेर जाऊन अर्थार्जनक करणाऱ्या स्त्रिया आणि पुरूष यांच्याकडून केल्या जाणाऱ्या अपेक्षा वेगळया असतात का? या घरात कामाची विभागणी कशी असते? या घरातील निर्णय कोण घेते?

- मुलींना कोणते स्वातंत्र्य असते आणि मुलांना कोणत्या गोष्टींचे स्वातंत्र्य असते?
- पुरूषाला न आवडणारी भाजी नियमितपणे घरात होते का?
- उपास कोण जास्त करते - स्त्रिया की पुरूष? स्त्रियांचे उपास कशासाठी असतात आणि पुरूषांचे उपास कशासाठी असतात? (उदाहरणार्थ - वटसावित्री, हरितालिका)
- कार्यालयातही स्त्रिया आणि पुरूषांकडून वेगवेगळ्या अपेक्षा केल्या जातात का? का?

या सामाजिक धारणा बदलणे गरजेचे आहे. आपण या बदलाची सुरूवात स्वत:पासून आणि आपल्या कुटुंबापासून केली पाहिजे.

******

# प्रशिक्षण प्रारूप (Module) २ :
# कृषि क्षेत्रातील लिंगभावाच्या समस्या

# प्रकरण १० सत्र २.१ - पहिल्या दिवसाची उजळणी

**या प्रकरणात पहिल्या दिवशी पूर्ण केलेल्या प्रमुख विषयांची उजळणी कशी करावी याबबातची माहिती देण्यात आली आहे.**

| घटक / मुद्दा | तपशील |
|---|---|
| सत्राची उद्दिष्टे: | • प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी शिकलेल्या मुदद्यांची उजळणी करणे.<br>• अस्पष्ट असणाऱ्या संकल्पना परत समजावून सांगणे. |
| कालावधी: | ३० मिनिटे |
| पद्धत: | • प्रशिक्षणार्थी त्यांनी पहिल्या दिवशी शिकलेला एक मुद्दा सांगतील |
| आवश्यक साहित्य: | चार्ट, मार्कर्स, सेलोटेप अथवा पिन्स |

**<u>सत्र संचालनाची प्रक्रिया</u>**

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| ०० - १५ | • प्रशिक्षकाने सर्वांचे स्वागत करावे. प्रशिक्षणार्थींचा मूड कसा आहे ते जाणून घ्यावे.<br>• प्रत्येक प्रशिक्षणार्थीने पहिल्या दिवशी तिला/त्याला शिकायला मिळालेला एक मुद्दा सांगावा.<br>• ते मुद्दे प्रशिक्षकाने फळ्यावर अथवा चार्टवर लिहावेत. |
| १५ - २५ | • पहिल्या दिवशी झालेल्या विषयांपैकी जे विषय वर आले नसतील, त्यासंबंधी प्रशिक्षकाने प्रश्न विचारावे व संकल्पना स्पष्ट आहेत ना याची खात्री करून घ्यावी.<br>• जे मुद्दे सर्वात कमी वेळा आले असतील त्याविषयी चर्चा करावी.<br>• प्रशिक्षणार्थींच्या निवास, भोजन यासंबंधी काही अडचणी असतील तर त्याही ऐकून घ्याव्यात. (निवास आणि भोजनाचे व्यवस्थापक या सत्रास उपस्थित असतील तर बरे. नसल्यास माहिती त्यांच्यापर्यंत पोचवावी.) |
| २५ - ३० | • आजचे दिवसभराचे (दिवस दुसरा) वेळापत्रक थोडक्यात सांगावे. |

******

# प्रकरण ११ सत्र २.२ कृषि क्षेत्रातील लिंगभाव समस्या

**या प्रकरणात आपण पुढील मुख्य मुद्दे शिकणार आहोत**

- कृषि क्षेत्रातील लिंगभाव समस्यांविषयी संक्षिप्त माहिती.

**सत्राची रूपरेषा**

| घटक / मुद्दा | तपशील |
|---|---|
| सत्राची उद्दिष्टे: | • कृषि क्षेत्रातील लिंगभाव समस्यांविषयी प्रशिक्षणार्थींना अधिक माहिती होणे |
| कालावधी: | ३० मिनिटे |
| पद्धत: | • कृषि क्षेत्रातील लिंगभाव समस्यांविषयी प्रशिक्षणार्थींना मुद्दे विचारणे<br>• प्रशिक्षकाने स्लाईड्सच्या साहाय्याने व उदाहरणांसहित माहिती देणे |
| आवश्यक साहित्य: | लॅपटॉप, प्रोजेक्टर, प्रेझेंटेशन |

**सत्र संचालनाची प्रक्रिया**

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| ०० - ०५ | • कृषि क्षेत्रातील लिंगभाव समस्यांविषयी प्रशिक्षणार्थींना मुद्दे विचारणे |
| ०५ - ३० | • प्रशिक्षकाने स्लाईड्सच्या साहाय्याने व उदाहरणांसहित माहिती द्यावी. |

**सत्र संचालनासाठी आवश्यक माहिती: कृषि क्षेत्रातील लिंगभावाच्या समस्या**

सत्राच्या सुरूवातीस प्रशिक्षणार्थींना कृषि क्षेत्रातील त्यांना माहिती असलेल्या लिंगभावाच्या समस्यांविषयी विचारावे. इथे सविस्तर चर्चा अपेक्षित नाही, एक किंवा दोन शब्दांत मुद्दे सांगितले जावेत. हे मुद्दे सर्वांना दिसतील अशा प्रकारे एका चार्टवर नोंदवावेत.

शेती हा महाराष्ट्राचा कणा आहे. राज्यातील ५५ टक्के जनता प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रीत्या शेतीवर अवलंबून आहे. (संदर्भ: Task force on Agriculture development, Niti Aayog, 2015). भात, ज्वारी, बाजरी, गहू, डाळी, कापूस, ऊस, आणि शेंगदाणे, सूर्यफूल, सोयाबिनसारख्या तेलबिया ही राज्यातील प्रमुख पीके आहेत.

२०१५-१६च्या कृषिगणनेनुसार राज्यात १४.७१ दशलक्ष कृषि भूधारक आहेत. त्यापैकी ५१.३९ टक्के अत्यल्प भूधारक आहेत, तर २९.३३ टक्के शेतकरी अल्पभूधारक आहेत. तसेच १४.३९ टक्के शेतकरी अर्ध-

मध्यम तर ४.४७ टक्के मध्यम शेतकरी आहेत. शेतजमिनीच्या बाबतीत असलेली स्त्री-पुरूष असमानता यावरून स्पष्ट होते.

**कृषि क्षेत्रात स्त्रियांना कोणत्या अडचणी आहेत?**

- **जमीन आणि कर्जाची अनुपलब्धता:** पुरूषांच्या तुलनेत अल्पभूधारक शेतकरी स्त्रियांना आधुनिक कृषिमूल्यसाखळीमध्ये प्रवेश करण्यात जास्त अडचणी येतात. शेतीचे उत्पन्न वाढवायचे आणि स्पर्धात्मक बाजारात उतरायचे तर जमीन, भांडवल, कर्ज, प्रशिक्षण यांसारखी उत्पादक संसाधने आवश्यक असतात. परंतु अल्पभूधारक शेतकरी स्त्रियांना या बाबी उपलब्ध नसतात. २०१५-१६च्या कृषिगणनेनुसार १४६ दशलक्ष भूधारकांपैकी फक्त १३.८७ टक्के स्त्रिया आहेत.
- **जमिनीची मालकी:** उत्पादक संसाधनांची मालकी आणि स्त्रियांवर होणारी हिंसा यांचा जवळचा संबंध आहे. २००५ च्या एका अभ्यासानुसार संपत्तीवर अधिकार नसलेल्या ४९ टक्के स्त्रियांनी कुटुंबात शारिरीक अनुभवली, तर ८४ टक्के स्त्रियांचा मानसिक छळ झाला. जमिनीवर मालकी असलेल्या स्त्रियांच्या बाबतीत हिंसेचे प्रमाण तुलनेने बरेच कमी दिसून आले. ७ टक्के स्त्रियांना कुटुंबामध्ये शारीरिक हिंसा भोगावी लागली तर १६ टक्के स्त्रियांचा मानसिक छळ झाला.
- **कृषि निविष्ठा:** बियाणे, खते, औषधे अशा प्रकारच्या कृषि निविष्ठांसाठी सामान्यपणे पुरूषांना प्राधान्य मिळते. कौटुंबिक पातळीवर अधिकार आणि जबाबदाऱ्या यो दोन्ही पातळयांवर असलेली स्त्री-पुरूष असमानतेच्या परिणामस्वरूप संसाधनांची विषम वाटणी होते. बाजारातील विविध प्रोत्साहक योजनांना प्रतिसाद देण्याची स्त्रियांची क्षमताही यामुळे मर्यादित राहते.
- **तंत्रज्ञान:** शेतीच्या वाढत्या यांत्रिकीकरणामुळे स्त्रिया पारंपरिक कमी पैसे देणाऱ्या कामात अडकून पडल्या आहेत. शेतीमधली यंत्रे स्त्रियांच्या गरजा लक्षात न घेता बनवली जात असल्याने स्त्रियांना ती यंत्रे वापरण्यात अनेक अडचणी येतात.
- **शिक्षण, प्रशिक्षण, विस्तार सेवा:** या तिन्ही बाबतीत पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांना कमी संधी मिळतात.
- **अनेकविध भूमिका:** दिवसभर शेतात कष्टाचे काम करत असताना स्वयंपाक करणे, मुलांचे संगोपन करणे, पाणी भरणे, लाकूडफाटा जमा करणे, घराची साफसफाई करणे यांसारख्या घरातल्या अनेक कामांचीही जबाबदारी स्त्रियांना उचलावी लागते.
- **वेतन:** पुरूष शेतकऱ्यांच्या तुलनेत स्त्रिया शेतात जास्त वेळ आणि जास्त कष्टाची कामे करतात. परंतु स्त्रियांना पुरूषांच्या तुलनेत कमी शेतमजुरी मिळते आणि अनेकदा त्यांच्या शेतातल्या कामाचे मोलही केले जात नाही.
- **बाजारपेठ:** मार्केट यार्ड, रस्ते, वाहतूक व्यवस्था, माल साठवण्याची व्यवस्था, शीतगृहे यांच्या अभावामुळे आणि दलालांमुळे अल्प आणि अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांना बाजारपेठेपर्यंत पोचण्यात अडचणी येतात. या अडचणींसोबतच स्त्रियांना शिक्षणाचा अभाव, बाहेरच्या जगाशी फारसा संपर्क नसणे, शेतीविषयक संस्था-समित्यांमध्ये स्त्री-प्रतिनिधी नसणे अशा अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.

- **निर्णयप्रक्रिया:** जमीन, पिकाची निवड, बियाणे-खते-औषधे यांची निवड, कर्ज, विस्तारसेवा, आणि बाजारपेठ अशा सगळया निर्णयांमध्ये स्त्रिया सहभागी नसण्याची आपल्याकडे परंपरा आहे. या सर्व बाबतीतले निर्णय प्रामुख्याने पुरूषच घेतात.
- **हिंसा:** शेतकरी स्त्रिया आणि शेतमजूर स्त्रिया यांच्यावर शेतीत काम करत असताना होणारी हिंसा आणि लैंगिक छळ यांची नोंद सहसा कुठेही होत नाही.
- **आरोग्य आणि व्यावसायिक धोके:** प्रशिक्षणाचा अभाव, संरक्षणात्मक साहित्याचा अभाव, आणि दीर्घ काळ काम करण्याने स्त्रियांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होतो. सकस आहाराच्या अभाव असे दुष्परिणाम वाढवतो.
- **लिंगभावाधारित श्रमविभागणी:** पेरणी, प्रत्यारोपण, खत घालणे, तण काढणे, कापणी ही स्त्रियांची शेतीतली पारंपरिक कामे आहेत. घरकाम आणि बालसंगोपन यांच्या जोडीने स्त्रिया ही कामे करतात. इतकी कष्टाची कामे करूनही स्त्रियांना पुरूषांना मिळणाऱ्या मजुरीच्या ७० टक्केच मजूरी मिळते. अनेक स्त्रिया मजूरीविनाच शेतीतल्या कामाचा वाटा उचलतात. पिकांच्या उत्पादनात आणि मूल्यसाखळीतल्या सफाई, वर्गीकरण, पॅकेजिंग अशांसारख्या कामात स्त्रिया मोठा वाटा उचलतात. परंतु मालाच्या विक्रीच्या साखळीत स्त्रिया अदृश्यच आहेत.
- **शेतीचे स्त्रीकरण:** उपजीविकेच्या शोधात ग्रामीण पुरूष मोठ्या संख्येने शहरांकडे स्थलांतरण करत आहेत. वाढत्या यांत्रिकीकरणामुळे शेतीतले पुरूष बिगरशेती उपजीविकांकडे वळत आहेत. स्त्रिया मात्र त्यांच्या खुरपणी, काढणी, सफाई, जनावरांची देखभाल अशा पारंपरिक कामात अडकून पडल्या आहेत.
- **उत्पादक संसाधने:** पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांना उत्पादक संसाधने फार कमी उपलब्ध असतात. जमीन, भांडवल, कर्ज, प्रशिक्षण यांसारख्या गोष्टी स्त्रियांना सहज उपलब्ध होत नाहीत. घरातल्या कामाचीही जबाबदारी मुख्यत्वे स्त्रियांवरच असते. यामुळे स्त्रियांना बाजारपेठेतल्या प्रोत्साहनपर योजनांमध्ये सहभागी होता येत नाही.
- **अन्य अडचणी:** शेतीतले कष्टाचे, हाताने करायचे काम मुख्यत्वे स्त्रिया करतात. कृषिमूल्यसाखळीतही सफाई, वर्गीकरण अशी कामे स्त्रिया करतात पण बाजारपेठेत त्या दिसत नाहीत. मूलभूत सुविधा (रस्ते, गोदाम, वाहतूक) आणि दलाल या अडचणी स्त्री शेतकरी उत्पादक संस्थांनाही येतात. आर्थिक उलाढाल, तंत्रज्ञानाची कमतरता, आणि काढणीपश्चात अनुभवांचा अभाव याही समस्या स्त्री शेतकरी उत्पादक कंपन्यांना येतात. अनेकदा त्यांना बँकेकडून कर्ज मिळण्यातही अडचणी येतात.

# प्रकरण १२ सत्र २.३ लिंगभाव विश्लेषण: संकल्पना आणि साधने

**या प्रकरणात आपण पुढील मुख्य मुद्दे शिकणार आहोत**

- लिंगभाव विश्लेषण म्हणजे काय ?
- लिंगभाव विश्लेषणाची साधने – हंगामी दिनदर्शिका, शेतीतील कामाचे विभाजन, २४ तासांचे घड्याळ, साधनांचा वापर आणि साधनांवर नियंत्रण, निर्णय विभाजन.

**<u>सत्राची रूपरेषा</u>**

| घटक / मुद्दा | तपशील |
|---|---|
| सत्राची उद्दिष्टे: | • प्रशिक्षणार्थींना लिंगभाव विश्लेषण (Gender Analysis) संकल्पनेची तोंडओळख करून देणे.<br>• लिंगभाव विश्लेषणाच्या विविध साधनांची ओळख करून देणे. |
| कालावधी: | ७५ मिनिटे |
| पद्धत: | प्रशिक्षकाचे स्लाईड्सच्या साहाय्याने व उदाहरणांसहित व्याख्यान |
| आवश्यक साहित्य: | लॅपटॉप, प्रोजेक्टर, प्रेझेंटेशन |

**<u>सत्र संचालनाची प्रक्रिया</u>**

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| ०० - १० | • 'लिंगभाव विश्लेषण' ही संकल्पना काय आहे, ही संकल्पना का महत्त्वाची आहे याची माहिती स्लाईड्सद्वारे द्यावी.<br>• लिंगभाव विश्लेषणाच्या खालील साधनांची प्राथमिक ओळख करून द्यावी. यासाठी त्या त्या भागातील प्रमुख पीक निवडावे. सहभागी पद्धतीने, चर्चेद्वारे साधनाची ओळख करून द्यावी. |
| १० - २० | **साधन १: हंगामी दिनदर्शिका** (कोणत्या हंगामात शेतातले काम असते, शेतीचा हंगाम नसतो तेव्हा काय कामे केली जातात, शेती सोडून अन्य उपजीविकांशी संबंधित कामे काय असतात आणि ती कोण करते) |
| २० - ३० | **साधन २: शेतातील कामाचे विभाजन** (स्त्रिया आणि पुरूष कोणकोणती कामे करतात, त्यासाठी किती दिवस लागतात, यंत्रांनी करायची कामे कोणती आणि हाताने करायची कामे कोणती, कोणती कामे एकदाच करावी लागतात आणि कोणती कामे जास्त वेळा करायला लागतात इत्यादी) |
| ३० - ४० | **साधन ३: २४ तासांचे घड्याळ** (सकाळी लवकर कोण उठते, कोण उशिरा झोपते, कोण |

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| | इतरांची सेवा करते, कोणती कामे नियमितपणे करावी लागतात, मोकळा वेळ कुणाला जास्त असतो, मनोरंजनासाठी कोण वेळ काढू शकते, एकाच वेळी कोण एकाहून जास्त कामे करते इत्यादी) |
| ४० - ५० | **साधन ४: साधनांचा वापर आणि साधनांवर नियंत्रण** (वापर आणि नियंत्रण यांची व्याख्या स्पष्ट करावी, घरातील आणि शेतातील साधनांची यादी करावी, वापर आणि नियंत्रण असे दोन वेगळे रकाने करावेत आणि दोन्ही रकान्यांत स्त्रिया आणि पुरूष असे उपरकाने असावेत.) |
| ५० - ६० | **साधन ५: निर्णय सहभाग -** शेतीत आणि घरात कोणकोणते छोटे-मोठे निर्णय घ्यावे लागतात, आणि ते कोण घेते याची चर्चा करावी |
| ६० - ७५ | शंका निरसन |

### सत्र संचालनासाठी आवश्यक माहिती

### लिंगभाव विश्लेषण

लिंगभाव विश्लेषण ही एक प्रक्रिया आहे. एखाद्या विशिष्ट परिस्थितीत अथवा संदर्भात स्त्री-पुरूषांच्या भूमिका, जबाबदाऱ्या, निर्णयप्रक्रियेतला त्यांचा सहभाग, संसाधनांवर असणारे त्यांचे नियंत्रण, त्यांना मिळणारे फायदे आणि स्त्री-पुरूषांमधील सत्तासंबंध समजून घेण्याची प्रक्रिया म्हणजे लिंगभाव विश्लेषण.

### लिंगभाव विश्लेषण का करायचे?

आपण सगळे कृषि खात्यात कार्यरत आहोत आणि आपण काही जेंडर विषयातले तज्ज्ञ नाही. 'मग आपण लिंगभाव विश्लेषण का करायचे' असा प्रश्न तुमच्या मनात कदाचित आला असेल. कार्यक्रम आणि प्रकल्प तयार करताना, त्यांची अंमलबजाणी करताना लिंगभाव विश्लेषण केले तर कृषि खात्यामधली आपली जबाबदारी अधिक परिणाकारकपणे पार पाडण्यास आपल्याला मदत होईल.

- शेतकरी स्त्रिया आणि शेतकरी पुरूष यांना शेती करताना कोणत्या अडचणी येतात आणि त्यांना कोणत्या संधी आहेत हे समजते.
- स्त्रिया आणि पुरूष शेतकरी या दोघांनाही फायद्चे ठरतील असे कृषि कार्यक्रम आखण्यासाठी माहिती मिळते.
- कृषि कार्यक्रमांत स्त्रियांचा सहभाग वाढविण्यात काय अडचणी आहेत आणि त्यावर काय उपाययोजना करता येईल यासंबंधी माहिती मिळते.
- शेतकरी स्त्रियांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी खास प्रयत्नांचे नियोजन करता येणे शक्य होते.
- कृषि कार्यक्रमातून मिळणाऱ्या फायद्यांमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढवण्यासाठी योजना आखता येते.

थोडक्यात असे म्हणता येईल की लिंगभाव विश्लेषणातून जी माहिती समोर येते त्याच्या आधारे प्रकल्पांमध्ये आणि धोरणांमध्ये योग्य ते बदल करून स्त्रियांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी योग्य पावले उचलता येतात.

### लिंगभाव विश्लेषणाची साधने

लिंगभाव विश्लेषण कसे करायचे याबाबत जगभरात अनेक लोकांनी अभ्यास करून वेगवेगळी साधने तयार केली आहेत आणि वापरली आहेत. लिंगभाव विश्लेषण आरोग्य, पर्यावरण, अन्नसुरक्षा... अशा वेगवेगळया क्षेत्रांत केले जाते. या प्रशिक्षणात आपण कृषि क्षेत्राच्या संदर्भात लिंगभाव विश्लेषणाची निवडक साधने समजावून घेणार आहोत. प्रथम आपण साधने काय आहेत ते समजावून घेऊ. त्यानंतर छोट्या गटांमध्ये आपण या साधनांचा सराव करणार आहोत.

### साधन १: हंगामी दिनदर्शिका

उपजीविकेमधले बदल समजून घेणे हे या साधनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. शेतीतल्या कामात दर महिन्यात काय बदल होतात (कामाचे तास, पीक वाढीचे चक्र, कामाचे बदलते स्वरूप) याबाबत विस्ताराने माहिती मिळते. पेरणीच्या आणि काढणीच्या वेळा, किती श्रम आणि कधी करावे लागतात, आणि बाजारपेठेच्या संधी याबाबत माहिती गोळा करण्यासाठी हे साधन उपयोगी आहे.



तुमच्या कार्यक्षेत्रातील एक प्रातिनिधिक शेतकरी कुटुंब निवडा. हे शेतकरी कुटुंब प्रामुख्याने कोणते पीक घेते? या पिकासोबत आणि या पिकाच्या उत्पादनानंतर त्या जमिनीत अन्य कोणती पिके घेतली जातात? फळझाडांचे, भाजीपाल्याचे उत्पादन होते का? साधारणपणे शेतकरी कुटुंबात कोणकोणती जनावरे असतात? गाय, म्हैस, बकरी असते का? कुक्कुटपालन केले जाते का? शेतीसोबत काही जोडव्यवसाय आहे का? .... अशा विविध मुद्द्यांचा विचार करून आपापसातील चर्चेने तुमच्या शेतकरी कुटुंबाविषयीचे चित्र स्पष्ट करा.

आता आपल्याला या शेतकरी कुटुंबाचे वर्षभराचे वेळापत्रक समजून घ्यायचे आहे. प्रत्येक पिकाचे (यात फळझाडे आणि भाजीपालाही घ्यावा), जनावराचे (प्रत्येक प्रकारच्या जनावराची वेगळी नोंद करावी) आणि जोडव्यवसायाचे वर्षभर कसे काम असते हे समजून घेण्यासाठी हंगामी दिनदर्शिकेचा उपयोग होतो. कामाच्या तपशीलासोबत अन्नसुरक्षा आणि हातात रोकड कधी येते याचाही आपण संक्षेपाने आढावा घेणार आहोत. त्याचबरोबर आरोग्यविषयक समस्या कोणत्या काळात जास्त असतात आणि नैसर्गिक संकटे कोणत्या काळात कमी-जास्त असताता हेदेखील आपण समजून घेणार आहोत. सण-उत्सवांत काम किती

असते आणि हातात रोकड असते का हेही या माहितीच्या आधारे आपल्याला समजेल. कोणत्या हवामानात कोणते काम करावे लागते याचाही अंदाज या साधनातून येतो. हवामान लिहिताना पावसाळा, हिवाळा, उन्हाळा असे लिहिले तरी चालेल. एकाच ठिकाणचे विश्लेषण करताना हवामानाचा फारसा फरक पडणार नाही. परंतु राज्य स्तरावर, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अभ्यास करताना वेगवेगळी माहिती मिळते जिचा कार्यक्रमाचे नियोजन करताना उपयोग होतो. महिन्यांच्या रकान्यात जितकी सविस्तर माहिती लिहिता येईल तितकी लिहा. तुम्ही साधन १ आणि साधन २ ही दोन्ही साधने एका अभ्यासात अथवा एका गटासोबत वापरणार असाल तर मात्र साधन १ च्या रकान्यांत विस्ताराने माहिती लिहिण्याची गरज नाही.

**साधन १ चा आराखडा**

| तपशील | जाने | फेब्रु | मार्च | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टें | ऑक्टो | नोव्हें | डिसें |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हवामान | | | | | | | | | | | | |
| पीक १ (नाव लिहा) | | | | | | | | | | | | |
| पीक २ (नाव लिहा) | | | | | | | | | | | | |
| पीक ३ (नाव लिहा) | | | | | | | | | | | | |
| पीक ४ (नाव लिहा) | | | | | | | | | | | | |
| पीक ५ (नाव लिहा) | | | | | | | | | | | | |
| ........... | | | | | | | | | | | | |
| ............ | | | | | | | | | | | | |
| जनावर १ (नाव लिहा) | | | | | | | | | | | | |
| जनावर २ (नाव लिहा) | | | | | | | | | | | | |
| जनावर ३ (नाव लिहा) | | | | | | | | | | | | |
| जनावर ४ (नाव लिहा) | | | | | | | | | | | | |
| ........... | | | | | | | | | | | | |
| ................. | | | | | | | | | | | | |
| कुटुंबासाठी पुरेसे अन्न उपलब्ध असते का | | | | | | | | | | | | |
| महिलांचे काम | | | | | | | | | | | | |
| पुरूषांचे काम | | | | | | | | | | | | |
| रोख रक्कम हातात असते का | | | | | | | | | | | | |
| महत्त्वाचे सण/उत्सव असतात का | | | | | | | | | | | | |
| कुटुंबियांचे आरोग्य चांगले असते का | | | | | | | | | | | | |
| नैसर्गिक संकटे (दुष्काळ, पूर, रोगराई, कीड... इ.) असतात का | | | | | | | | | | | | |
| स्थलांतरण करावे लागते का | | | | | | | | | | | | |

**साधन २: शेतातली कामे - विभाजन आणि निर्णय**



या साधनाचा अभ्यास करताना आपण एक एकर क्षेत्राचा विचार करणार आहोत. तुमच्या कार्यक्षेत्रातील प्रमुख पीक निवडा. या पिकाच्या पूर्वतयारीपासून ते काढणीपर्यंतचा काळ विचारात घ्या. पूर्वतयारीत कोणकोणती कामे करावी लागतात याची नोंद करा. उदाहरणार्थ - जमिनीची मशागत, बियाणे निवड, बियाणे प्रक्रिया ही काही ठळक कामे आहेत. बियाणे लागवड या महत्त्वाच्या कामानंतर काढणीपर्यंत गवत काढणे, औषधांची फवारणी, पाणी देणे अशी अनेक कामे आहेत. काढणीनंतर मळणी, धान्य साठवणे, धान्य विकणे अशी महत्त्वाची कामे आहेत. तुम्ही निवडलेल्या पिकानुसार या यादीत भर पडेल. काही कामे एकदाच करावी लागतात (उदाहरणार्थ नांगरट) तर काही कामे अनेकदा करावी लागतात (उदा. खुरपणी).


या कामांची यादी करताना प्रत्येक काम कोण करते - स्त्रिया की पुरूष - याची नोंद करावी. काही कामे दोघे मिळून करत असतील तर त्यात स्त्रियांचे काम काय आणि पुरूषांचे काम काय असते याची नोंद करावी. प्रत्येक कामाला किती दिवस लागतात ते लिहावे. काम काही तासांत होत असेल तर ते दिवसांत रूपांतरित करून नोंदवावे. आठ तासांचा एक दिवस धरावा आणि कामाला चार तास लागत असतील तर त्याची नोंद अर्धा दिवस अशी करावी.

ज्यांची शेती आहे ते स्त्री-पुरूष काम करत असतील किंवा शेतमजूर स्त्री-पुरूष करत असतील. ते काम स्त्रिया-पुरूष या रकान्यांमध्ये लिहिले जावे. शेतमजूरांना - स्त्रियांना आणि पुरूषांना - एका दिवसाची किती मजूरी मिळते ते लिहावे. काम हाताने केले जाते की यंत्रांच्या साहाय्याने केले जाते याची नोंद करावी. प्रत्येक कामासंबंधीचा निर्णय कोण घेते याचीही नोंद करावी. 'निर्णय दोघे मिळून घेतात' असे उत्तर आल्यास त्या दोघांपैकी कोणाचा निर्णय अंतिम असतो त्याची नोंद करावी.

**साधन २ चा आराखडा**

| कामाचा तपशील | महिना | कोण करते | | यंत्राने की हाताने | किती दिवस लागतात | मजूरी | | निर्णय कोण घेते | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **महिला** | **पुरूष** | | | **महिला** | **पुरूष** | **महिला** | **पुरूष** | |
| जमिनीची मशागत | | | | | | | | | | |
| बीज प्रक्रिया | | | | | | | | | | |
| लावणी | | | | | | | | | | |

| कामाचा तपशील | महिना | कोण करते | | यंत्राने की हाताने | किती दिवस लागतात | मजूरी | | निर्णय कोण घेते | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ....... | | | | | | | | | | |
| ..... | | | | | | | | | | |
| ...... | | | | | | | | | | |
| काढणी | | | | | | | | | | |
| ...... | | | | | | | | | | |
| विक्री | | | | | | | | | | |



स्मार्ट प्रकल्पाने नागपूर जिल्ह्यातील महिलांच्या गटासोबत केलेल्या सोयाबीनच्या साधन १च्या अभ्यासाचा नमुना संदर्भासाठी खाली दिला आहे. पिकानुसार आणि भौगौलिक क्षेत्रानुसार या माहितीत बदल होऊ शकतो. या चार्टमध्ये काम हाताने करताना की यंत्राने याचा उल्लेख शेरा या रकान्यात केला आहे. परंतु वरील नमुन्यात दाखविल्याप्रमाणे या माहितीसाठी वेगळा रकाना वापरणे जास्त उपयोगी आहे.

या नमुन्यात तुम्हाला दिसेल की 'शेरा' या रकान्यात बरीच माहिती आहे. आपण जेव्हा शेतकऱ्यांसोबत चर्चा करतो तेव्हा सर्व शेतकरी स्त्री-पुरूषांची माहिती एकच असेल अशी शक्यता कमी असते. कुटुंबानुसार काही माहिती बदलते. अशा माहितीचा नोंद ठेवून नंतर त्या माहितीचेही विश्लेषण करावे.

या साधनाच्या अभ्यासातून असे दिसते की स्त्रिया शेतातही बरेच काम करतात, परंतु त्यांचे काम उत्पादक काम म्हणून गणले जात नाही. घरच्या कामासारखे स्वत:च्या शेतातलेही काम स्त्रियांसाठी पैसे न देणारे पण वारंवार करावे लागणारे - म्हणजेच पुनरूत्पादक काम - असते.

**साधन ३: २४ तासांचे घड्याळ**

एखाद्या सर्वसाधारण दिवशी दिवसभरात स्त्रिया आणि पुरूष काय काय करतात याची माहिती मिळवण्यासाठी या साधनाचा उपयोग केला जातो. त्यापैकी शेतीतल्या कामाची माहिती आपण साधन १ द्वारे मिळवली आहे. म्हणून साधन २ चा उपयोग करताना घरातील कामांची सविस्तर चर्चा करावी.

स्त्री-पुरूषांच्या शेतातल्या कामाची विभागणी पाहताना आपल्याकडे घरातल्या कामाची जबाबदारी संपूर्णपणे स्त्रियांवर असते हा महत्त्वाचा मुद्दा विसरता कामा नये. घरातले काम स्त्रियांनीच करायचे असते अशी आपली सामाजिक धारणा आहे. या साधनाद्वारे लिंगाधारित श्रमविभाजनाची वस्तुस्थिती आपल्याला कळते. लिंगाधारित श्रमविभाजन हा लिंगभावाच्या धारणेतून रूजलेला मुद्दा आहे. पोळया लाटणे किंवा

कपडे धुणे हा काही जन्मजात कौशल्याचा भाग नाही. स्त्रियांनाही ही कामे नेटाने शिकावी लागतात. ही कामे मुख्यत्वे मुलींनाच शिकवली जातात (आणि मुलांना शिकवली जात नाहीत) हा लिंगभाव धारणेचा परिणाम आहे.

२४ तासांचे घड्याळ पाहताना सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत स्त्री आणि पुरूष काय करतात याचा आढावा आपण घेणार आहोत. माहितीची गुंतागुंत टाळण्यासाठी घरातील मुलींनी आणि मुलांनी केलेल्या कामाचा विचार आपण करणार नाही. प्रौढ स्त्री-पुरूषांच्या (पती-पत्नीच्या) कामाची नोंद या साधनाद्वारे करणे अपेक्षित आहे.

सकाळी लवकर कोण उठते, कोण उशिरा झोपते, कोण इतरांची सेवा करते, कोणती कामे नियमितपणे करावी लागतात, मोकळा वेळ कुणाला जास्त असतो, मनोरंजनासाठी कोण वेळ काढू शकते, एकाच वेळी कोण एकाहून जास्त कामे करते इत्यादींचा विचार केल्यास स्त्रियांवर असलेला कामाचा बोजा आपल्या लक्षात येईल.

**साधन ३ चा आराखडा (रकान्यातील माहिती उदाहरण म्हणून दिली आहे)**

| वेळ | स्त्रिया काय करतात | पुरूष काय करतात | शेरा |
|---|---|---|---|
| सकाळी ५.०० | उठणे, स्वत:चे आवरणे, चूल पेटवणे, | ...................... | |
| सकाळी ६.०० | चहा बनवणे, घरातल्या सर्वांना उठवणे, अंथरूण-पांघरूण आवरणे, सगळयांना चहा देणे, कपबशा विसळणे | .................... | |
| सकाळी ७.०० | | | |
| ..... | | | |
| ..... | | | |
| दुपारी १२.०० | | | |
| दुपारी १.०० | | | |
| ........ | | | |
| ....... | | | |
| संध्याकाळी ५.०० | | | |
| संध्याकाळी ६.०० | | | |
| ..... | | | |
| ...... | | | |
| रात्रीचे ८.०० | सगळयांना जेवायला वाढणे, भांडी घासणे, अंथरूण टाकणे | ........................ | |
| रात्रीचे ९.०० | दुसऱ्या दिवशीची स्वयंपाकाची तयारी करणे | ........................ | |
| रात्रीचे १०.०० | झोपी जाणे | | |

## हे साधन वापरताना लक्षात घ्यायचे काही महत्त्वाचे मुद्दे

**१**

शेतीत जशी आपण बारीक-सारीक कामांची नोंद केली, तशीच इथेही केली पाहिजे. उदाहरणार्थ – भांडी दिवसातून किती वेळा घासावी लागतात.

**२**

काही कामे रोज करावी लागत नाहीत, पण काही ठराविक दिवसांनी करावी लागतात. जसे की चादरी धुणे, भिंतीवरची जळमटे काढणे. अशी माहिती शेरा या रकान्यात त्या त्या कामांपुढे लिहावी.

**३**

सणासुदीच्या दिवशी किंवा पाहुणे आले असतील तर नेहमीचा साधा स्वयंपाक करून चालत नाही, काहीतरी विशेष पदार्थ करावा लागतो. तसेच उपासाच्या दिवशी वेगळे पदार्थ करावे लागतात.

**४**

लोक घड्याळ लावून कामे करत नाहीत. त्यामुळे वेळ ही अंदाजे असेल हे लक्षात घ्यावे. कुटुंबातील सदस्यांच्या संख्येनुसार कामाला लागणारा वेळ कमी जास्त असू शकतो. म्हणून वेळ या रकान्याबद्दल जास्त चर्चा करण्यात वेळ घालवू नये.

### साधन ४: संसाधनांचा वापर आणि त्यावर नियंत्रण

लिंगभाव विश्लेषणातला आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे संसाधनाचा वापर कोण करते आणि त्यावर नियंत्रण कोणाचे आहे हे समजून घेणे.

संसाधन म्हणजे काय? अगदी सोप्या शब्दांत सांगायचे तर जी कोणती गोष्ट उपयोगात आणली जाते, ज्या ज्या गोष्टी आपण वापरतो त्या सगळ्यांना संसाधन म्हणता येईल. जीवन जगताना आपण काही भौतिक वस्तूंचा वापर करतो, तसेच ज्ञान, माहिती, कौशल्य यांचाही वापर करतो. ही सगळीच संसाधने आहेत. व्यक्तीच्या सामाजिक-आर्थिक स्थितीनुसार काही संसाधने बदलतात. उदाहरणार्थ बैल हे एखाद्या शेतकरी स्त्री-पुरूषाचे महत्त्वाचे संसाधन असेल, पण शहरात नोकरी करणाऱ्या व्यक्ती बैल वापरत नाहीत. पेन हे तुमचे आमचे महत्त्वाचे संसाधन आहे, कार्यालयात आपल्याला ते सतत वापरावे लागते. परंतु लिहिता न येणाऱ्या व्यक्तीसाठी पेन पूर्ण निरूपयोगी आहे.

साधारणपणे असे दिसते की काही संसाधनांचा वापर फक्त पुरूष करतात - जसे की ट्रॅक्टर, मोटरसायकल. काही संसाधनांचा वापर जास्त करून स्त्रिया करतात, पण पुरूषांनी त्यांचा वापर करायला बंदी नसते - जसे की स्वयंपाक करण्याची भांडी.

संसाधनावर नियंत्रण याचा अर्थ असा आहे की ते संसाधन उसने देणे, भेट म्हणून देणे, विकणे याचे पूर्ण अधिकार असणे. पती अथवा पत्नीचा विरोध असतानाही, किंवा त्यांच्या परवानगीची गरज नसताना संसाधनाबाबत निर्णय घेण्याची क्षमता म्हणजे संसाधनावर नियंत्रण.

**साधन ४ चा आराखडा - संसाधनांचा वापर आणि त्यावर नियंत्रण**

| संसाधनाचा तपशील | वापर | | नियंत्रण | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | **महिला** | **पुरूष** | **महिला** | **पुरूष** | |
| १. जमीन | | | | | |
| २. विहीर | | | | | |
| ३. जनावरे (गायी-बैल) | | | | | |
| ४. शेतातला वीजेचा पंप | | | | | |
| ५. ट्रॅक्टर | | | | | |
| ६. शासकीय योजनांची माहिती | | | | | |
| ७. मोबाईल | | | | | |
| ८. टेलिविजन | | | | | |
| ९. प्रशिक्षण/शेतीशाळा अभ्यास | | | | | |
| १०. बँकेकडून कर्ज | | | | | |
| ११. मार्केटची माहिती | | | | | |
| १२. गोदाम पावती | | | | | |
| १३. शेतीविषयक तंत्रज्ञान | | | | | |
| १४. बी-बियाणे, खते, औषधे | | | | | |
| १५. बाजारपेठ | | | | | |
| १६. जिनिंग | | | | | |
| १७. विविध शासकीय योजना | | | | | |
| १८. ................. | | | | | |
| १९. ................ | | | | | |
| २०. ............... | | | | | |

संसाधनाची यादी सामाजिक -आर्थिक स्तरानुसार बदलती राहील. साधारणपणे असे चित्र दिसते की संसाधनांवर स्त्रियांचे नियंत्रण जवळजवळ नसतेच. त्यामागची कारणे लिंगभाव धारणा आणि त्यावर आधारित समाजरचना यात सापडते.

**साधन ५: निर्णय प्रक्रिया**

स्त्रियांचा निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढायला हवा याबाबत शासन प्रयत्नशील आहे. कृषि खात्याच्या अनेक योजनांमध्ये महिला सहभाग वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. महिलांचा निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढविताना त्यांचा सहभाग आत्ता नेमका किती आणि कोणत्या निर्णयांमध्ये आहे हे माहिती असणे गरजेचे आहे.

सर्वसाधारणपणे घरात कोणकोणते निर्णय घ्यावे लागतात?

- शिक्षण - मुलांना कोणत्या शाळेत घालायचे, उच्च शिक्षण द्यायचे का नाही, शिक्षणासाठी परगावी पाठवायचे का नाही इत्यादी
- आरोग्य - आजारी व्यक्तीला दवाखान्यात न्यायचे की नाही, कधी आणि कुठे न्यायचे. औषध कोण आणणार, रोजची शुश्रूषा लागत असेल तर त्याबाबत निर्णय
- घर - घराची दुरूस्ती, सामान (टीव्ही, फ्रीज, सोफा) कधी आणि कोठून घ्यायचे, घर भाड्याने देणे किंवा घेणे, घर विकणे, घराचे रंगकाम, घरासाठी कर्ज
- लग्न आणि कुटुंब विस्तार - लग्न कधी आणि कोणाशी करायचे, कुटुंबनियोजनाच्या साधनांचा वापर करायचा का आणि कोणी करायचा, अपत्य कधी होऊ द्यायचे, किती अपत्ये, कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया कोणी करायची
- धर्म - सण साजरे कसे करायचे, शाकाहार की मांसाहार, मासिक पाळीसंबंधी धारणा, उपवास
- .....
- ......

शेतातल्या निर्णयांसंबधी आपण साधन १ मध्ये विचार केला आहे. पण तो केवळ एका पिकापुरता आहे. त्यामुळे शेतीशी संबंधित महत्त्वाचे निर्णय या साधनात पुन्हा एकदा विचारात घ्यायला हरकत नाही.

निर्णयांबाबत विचार करताना अनेकदा ‘पती आणि पत्नी दोघे मिळून निर्णय घेतात’ असे सांगितले जाते. पण त्या निर्णयात शेवटचचा शब्द कुणाचा मानला जातो ते जाणून घेणे महत्त्वाचे आहे. तसेच छोटे निर्णय आणि मोठे निर्णय अशीही एक विभागणी दिसून येते. आज कोणती भाजी करायची हा निर्णय छोटा आहे तर पीक कुठे विकायचे हा निर्णय मोठा आहे. शिवाय किती घरांमध्ये नवऱ्याला न आवडणारी भाजी आवर्जून केली जात असेल? म्हणजे भाजी कोणती करायची यासारखा छोटा निर्णयही प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या पुरूषाच्या इच्छेवर अवलंबून असतो. मांसाहर न करणारी पत्नी मांसाहार शिजवते हे दृष्य अनेक घरांत दिसते. पण पती आणि सासरचे इतर लोक शाकाहारी असले तरी बायकोला-सुनेला मांसाहार आवडतो म्हणून किती शाकाहारी घरात मांसाहार शिजवला जाईल?

छोट्या निर्णयांमध्ये पैशांची उलाढाल नसते किंवा अगदी कमी असते. मोठे निर्णय मात्र पैशांच्या उलाढालीशी संबंधित असतात. अनेकदा मोठे निर्णय रूढी-परंपरा-सामाजिक आणि सांस्कृतिक नियम यांच्याशीही संबंधित असतात.

**साधन ५ चा आराखडा**

| निर्णय | महिला | पुरूष | शेरा |
|---|---|---|---|
| घरातले निर्णय | | | |
| भाजी कोणती करायची | | | |
| मुलांना कोणत्या शाळेत अथवा महाविद्यालयात पाठवायचे | | | |
| घराची स्वच्छता | | | |
| गायी विकत घेणे अथवा विकणे | | | |
| कोणत्या बँकेत खाते उघडायचे | | | |

| निर्णय | महिला | पुरूष | शेरा |
|---|---|---|---|
| मुलांचे लग्न | | | |
| घर विकत घेणे/विकणे | | | |
| ........ | | | |
| ........ | | | |
| शेतीमधले निर्णय | | | |
| कोणते पीक घ्यायचे, ती किती एकरमध्ये घ्यायचे | | | |
| कोणते बियाणे वापरायचे, तसेच कोणती खते व औषधे वापरायची | | | |
| पेरणी कधी करायची | | | |
| मजूर कोणते बोलवायचे | | | |
| कर्ज कोठून घ्यायचे | | | |
| पीक किती, कधी, आणि कुठे विकायचे | | | |
| पीक विकून आलेल्या पैशांचं नियोजन | | | |
| शेत विकत घेणे/ विकणे | | | |
| गोदामात माल ठेवायचा की नाही | | | |
| शासनाच्या कोणत्या योजनेकरीता प्रस्ताव सादर करायचा | | | |
| ............... | | | |
| .................. | | | |

**विचारांसाठी काही महत्त्वाचे मुद्दे:**

- पाचही साधनांतून दिसणाऱ्या स्त्री आणि पुरूष यांच्या काय भूमिका आहेत?
- पाचही साधनांतून दिसणारी श्रमविभागणी कशी आहे?
- महिला व पुरूष यांच्या कामांचे मूल्य कसे केले जाते?
- संसाधनांचा वापर आणि संसाधनांवर नियंत्रण याबाबत पाचही साधनांतून कोणते चित्र समोर येते?
- निर्णयप्रक्रियेतील स्त्रियांच्या सहभागाबाबत एकूण काय वस्तुस्थिती समोर येते?
- स्त्रियांच्या शेतीतील सहभागाबद्दल काय वस्तुस्थिती आहे?
- महिलांची विविध कृषि संसाधनांपर्यंत पोच वाढविल्याने कृषि उत्पादकतेवर सकारात्मक परिणाम होऊ शकतो का?

पाचही साधनांचा एकत्रित विचार केल्यावर खालील महत्त्वाचे मुद्दे आपल्या लक्षात येतील.

- लिंगभाव धारणांच्या प्रभावामुळे स्त्रियांचे आयुष्य एका प्रकारचे बनते तर पुरूषांचे दुसऱ्या प्रकारचे बनते.
- शेतकरी कुटुंबात स्त्रिया आणि पुरूष दोघांनाही कष्ट करावे लागतात. पण स्त्रियांचे कष्ट दुप्पट ते तिप्पट असूनही त्यांच्या घरातल्या आणि शेतीतल्या कामाचे मूल्य मात्र नगण्य राहते.

- स्त्रियांचे संसाधनांवर नियंत्रण नगण्य आहे आणि आर्थिक बाबतीतल्या निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग नावापुरताच असतो. अशा परिस्थितीत आपण ज्या योजना राबवतो त्यांचा फायदा थेट स्त्रियांना मिळेल याबाबत आपण अधिक जागरूक असले पाहिजे.
- स्त्रियांची स्थिती बदलायची तर फक्त स्त्रियांना माहिती देणे पुरेसे नाही. पुरूषांनाही स्त्रियांच्या स्थितीची जाणीव झाली पाहिजे. निर्णयप्रक्रियेत आणि फायद्यांत स्त्रियांचा सहभाग वाढावा यासाठी पुरूषांनीही त्यांच्या विचारांत आणि व्यवहारांत काही बदल करणे गरजेचे आहे.

******

दिवस दुसरा

# प्रकरण १३ सत्र २.४ लिंगभाव विश्लेषण: छोट्या गटांमध्ये अभ्यास

**या प्रकरणात आपण पुढील मुख्य मुद्दे शिकणार आहोत**

- लिंगभाव विश्लेषणाची साधने कशी वापरावी.

**सत्राची रूपरेषा**

| घटक / मुद्दा | तपशील |
|---|---|
| सत्राची उद्दिष्टे: | लिंगभाव विश्लेषणाची साधने कशी वापरायची हे प्रत्यक्ष कृतीद्वारे शिकणे |
| कालावधी: | ६० मिनिटे |
| पद्धत: | चार ते पाच प्रशिक्षणार्थींचा एक गट असे पाच गट प्रत्येकी एका साधनाचा अभ्यास करतील |
| आवश्यक साहित्य: | चाट्र्स, मार्कर्स, पिन्स, सेलोटेप, पाच साधनांची प्रत्येकी एक प्रत गटांना देण्यासाठी |

**सत्र संचालनाची प्रक्रिया**

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| ०० - ०५ | • गट तयार करताना नेहमीच्या एक-दोन-तीन-चारऐवजी अभिनव पद्धत वापरा<br>• उदाहरणार्थ क, व, स या अक्षरांनी पहिले नाव सुरू होणारे लोक एका गटात. य, म, ह, या अक्षरांनी पहिले नाव सुरू होणारे लोक एका दुसऱ्या गटात असे गट तयार करता येतील. किंवा लोकांना जन्माच्या वर्षानुसार आडवी ओळ तयार करायला सांगायची आणि पहिल्या पाचांचा एक गट, दुसऱ्या पाचांचा दुसरा गट असे करायचे.<br>• प्रत्येक गटात महिला-पुरूषांचा सहभाग समान ठेवण्याचा प्रयत्न करा. |
| ०५ - ६० | • प्रत्येक गटाला अभ्यासासाठी वेगळे साधन द्या.<br>• त्या साधनाची एक प्रत गटाला संदर्भासाठी द्या.<br>• प्रत्येक गटाला चार्ट आणि मार्कर्स द्या.<br>• गटाने एक प्रतिनिधी निवडायचा आहे. गटाचे प्रतिनिधी पुढच्या सत्रात सादरीकरण करतील.<br>• गटांमध्ये जाऊन त्यांना काही अडले असल्यास मदत करा. पण सगळे मुद्दे तुम्हीच सांगू नका.<br>• वेळ संपण्यापूर्वी पाच मिनिटे गटांना वेळ संपत आल्याची सूचना द्या. |

### सत्र संचालनासाठी आवश्यक माहिती

या सत्राविषयीच्या सूचना वरील तक्त्यामध्ये दिल्या आहेत. छोट्या गटांत अभ्यास चालू असताना गटांमध्ये फेरफटका मारावा आणि साधनाचे विश्लेषण योग्य रीतीने चालू आहे याची खातरजमा करून घ्यावी. प्रशिक्षणार्थींना साधनाच्या वापराविषयी काही शंका असल्यास त्यांचे निरसन करावे. मात्र गटाच्या चर्चेचे सूत्र हाती घेऊ नये.

******

# प्रकरण १४ सत्र २.५ लिंगभाव विश्लेषण: छोट्या गटांचे सादरीकरण आणि माहितीचे विश्लेषण

**या प्रकरणात आपण पुढील मुख्य मुद्दे शिकणार आहोत**

- लिंगभाव विश्लेषणाची साधने वापरण्याचे कौशल्य

**सत्राची रूपरेषा**

| घटक / मुद्दा | तपशील |
|---|---|
| सत्राची उद्दिष्टे: | लिंगभाव विश्लेषणाची साधने वापरण्याचे कौशल्य प्रशिक्षणार्थींना प्राप्त होणे |
| कालावधी: | ६० मिनिटे |
| पद्धत: | • प्रशिक्षणार्थींचे सादरीकरण<br>• प्रशिक्षकाकडून माहितीची भर |
| आवश्यक साहित्य: | चार्ट्स, मार्कर्स, पिन्स, सेलोटेप |

**सत्र संचालनाची प्रक्रिया**

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| ०० - ३५ | **गटांचे सादरीकरण**<br>• प्रत्येक गटाच्या एका प्रतिनिधीने गटाने तयार केलेल्या साधनाचे सादरीकरण करावे.<br>• प्रत्येक गटाला पाच मिनिटांचा वेळ सादरीकरणासाठी द्यावा. दोन मिनिटांचा वेळ अन्य गटातील प्रशिक्षणार्थींना असणाऱ्या प्रश्नांसाठी द्यावा. हे प्रश्न केवळ तर्क समजून घेणारे असावेत. संकल्पनात्मक प्रश्न सत्राच्या उत्तरार्धात घ्यावेत.<br>• सादरीकरणानंतर त्वरित चर्चा सुरू केल्यास पहिल्या एक दोन गटांना जास्त वेळ जातो आणि शेवटच्या गटांना वेळ पुरत नाही असा नेहमी अनुभव येतो. त्यामुळे वेळेचे बंधन पाळावे.<br>• सादरीकरण करणाऱ्या गटाला अन्य गटांनी प्रश्न विचारण्यासाठी एक पर्याय असा आहे की प्रत्येक गटाच्या सादरीकरणानंतर प्रशिक्षणार्थींनी आपले प्रश्न कागदावर लिहावेत. सर्व गटांचे सादरीकरण झाल्यावर एकत्रित प्रश्नोत्तर करावीत. |
| ३५ -५५ | **चर्चा आणि प्रशिक्षकाने माहितीत भर घालणे**<br>• पाचही साधनांतून दिसणाऱ्या स्त्री आणि पुरूष यांच्या काय भूमिका आहेत?<br>• पाचही साधनांतून दिसणारी श्रमविभागणी कशी आहे?<br>• महिला व पुरूष यांच्या कामांचे मूल्य कसे केले जाते?<br>• संसाधनांचा वापर आणि संसाधनांवर नियंत्रण याबाबत पाचही साधनांतून कोणते चित्र समोर येते?<br>• निर्णयप्रक्रियेतील स्त्रियांच्या सहभागाबाबत एकूण काय वस्तुस्थिती समोर येते? |

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| | • स्त्रियांच्या शेतीतील सहभागाबद्दल काय वस्तुस्थिती आहे?<br>• महिलांची विविध कृषि संसाधनांपर्यंत पोच वाढविल्याने कृषि उत्पादकतेवर सकारात्मक परिणाम होऊ शकतो का?<br>• या साधनांचा वापर करण्याबाबत काही तांत्रिक प्रश्न असतील तर त्याविषयी विचारविनिमय करावा.<br>• साधनांच्या अभ्यासातून आलेल्या माहितीचे विश्लेषण कसे करायचे याबाबत प्रशिक्षकाने माहिती द्यावी - आधीच्या सत्रातील मुद्द्यांची उजळणी करावी. |
| ५५ – ६० | प्रश्नोत्तरे, शंकानिरसन |

*****

# प्रशिक्षण प्रारूप (Module) ३ : कृषिमूल्यसाखळीत महिलांचा सहभाग आणि स्मार्ट प्रकल्पाची जेंडर स्ट्रॅटेजी

# प्रकरण १५ सत्र २.६ बेस्ट प्रॅक्टिसेस आणि केस स्टडी

**या प्रकरणात आपण पुढील मुख्य मुद्दे शिकणार आहोत**

- महिलांचा शेती व शेतीपूरक व्यवसायात सक्रिय सहभाग दर्शविणाऱ्या यशोगाथा आली आहे.

**सत्राची रूपरेषा**

| घटक / मुद्दा | तपशील |
|---|---|
| सत्राची उद्दिष्टे: | • शेतकरी उत्पादक कंपनीच्या महिला संचालकांशी चर्चा करून त्यांना आलेल्या अडचणी आणि त्यांनी त्या अडचणींवर कशी मात केली हे समजून घेणे.<br>• महिला शेतकऱ्यांना कृषि खात्याकडून कोणत्या प्रकारची मदत लागते यासंबंधी स्पष्टता येणे. |
| कालावधी: | ६० मिनिटे |
| पद्धत: | • दोन महिला संचालकांशी मुलाखत (अथवा भाषण) आणि प्रश्नोत्तरांद्वारे चर्चा |
| आवश्यक साहित्य: | मुलाखत पद्धत वापरणार असाल तर मुलाखतीसाठी प्रश्न |

**सत्र संचालनाची प्रक्रिया**

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| ०० - १० | • एफपीसी महिला संचालकांची प्रशिक्षणार्थींना सविस्तर ओळख करून देणे.<br>• प्रशिक्षणाचा उद्देश, प्रशिक्षार्थी कोण आहेत याबद्दलची माहिती पाहुण्या महिलांना देणे |
| १० - ४० | एफपीसी महिला संचालकांचे अनुभवकथन |
| ४० - ५५ | प्रश्नोत्तरे, विस्तारपूर्वक चर्चा, प्रशिक्षणार्थी त्यांच्या कार्यक्षेत्रातील महिला एफपीसीबद्दल अनूभव सांगतील. |
| २५ - ४० | छोट्या गटांत एका पिकाची कृषिमूल्यसाखळी तयार करणे आणि त्यात महिलांचा सहभाग कसा वाढवता येईल यासंबंधी चर्चा |
| ४० - ५५ | गटांचे सादरीकरण आणि त्यातील समान मुद्द्यांवर चर्चा |
| ५५ - ६० | आभार प्रदर्शन |

**सत्र संचालनासाठी आवश्यक माहिती**

ज्या महिला शेतकरी एफपीसी संचालकांना आपण प्रशिक्षणात बोलावणार आहोत त्यांना आधी भेटून प्रशिक्षणाविषयी आणि त्यांच्याकडून प्रशिक्षणार्थींना काय अपेक्षा आहेत याविषयी सविस्तर चर्चा करावी. प्रशिक्षकांना या महिलांच्या यशोगाथेची पूर्ण कल्पना असणे आवश्यक आहे. या शेतकरी स्त्रियांना

सार्वजनिक सभेत बोलायची सवय नसेल तर त्या अल्प काळात त्यांचे मत मांडून मोकळ्या होतात आणि त्यात सर्व मुद्दे स्पर्शले जात नाहीत. त्यामुळे या स्त्रियांची मुलाखत घेणे हा एक पर्याय असू शकतो. ही मुलाखत प्रशिक्षकानेच घ्यायला हवी असे नाही. या शेतकरी स्त्रियांच्या सोबत काम करणारा कृषि खात्याचा कर्मचारी (स्त्री अथवा पुरूष) ही मुलाखत घेऊ शकते-शकतो. मुलाखतकर्त्यांने मुलाखत घेण्याची पुरेशी तयारी करायला हवी. त्यासाठी खाली काही मुद्दे दिले आहेत.

**यशस्वी शेतकरी स्त्रियांच्या मुलाखतीसाठी काही मुद्दे**

- त्या स्त्रियांची व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक, आणि शेतीविषयक माहिती
- शेतकरी उत्पादक कंपनीविषयी - एफपीसीची स्थापना कधी झाली, सध्या कंपनीचे काय उपक्रम चालू आहेत, आत्तापर्यंत कोणते उपक्रम अतिशय यशस्वी झाले आहेत, किती महिला सभासद आहेत, किती महिला संचालक आहेत, भागभांडवल कसे जमा केले इत्यादी
- एफपीसी स्थापनेची गरज का वाटली? एफपीसी स्थापनेची प्रक्रियेविषयी सविस्तर सांगा - कागदपत्रं, शुल्क वगैरे
- एफपीसीत स्त्रियांचा सहभाग वाढवण्यासाठी कोणते विशेष प्रयत्न केले?
- एफपीसी चालवण्यात आत्तापर्यंत कोणत्या अडचणी आल्या? त्यावर मात कशी केली?
- एफपीसी स्थापन करताना कोणत्या संधी नजरेसमोर होत्या? आत्तापर्यंत त्या दिशेने प्रगती कशी झाली आहे?
- एफपीसीचे प्रशासन आणि आर्थिक व्यवस्थापन याविषयी सविस्तर माहिती
- व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक आणि आर्थिक स्तरांवर झालेल्या बदलाची उदाहरणे - लिंगभावाधारित भूमिका, श्रमविभाजन, संसाधनांचा वापर आणि नियंत्रण, निर्णयप्रक्रियेत सहभाग, काढणीपश्चात व्यवस्थापन आणि विक्री यातील सहभाग, शासकीय योजनेत सहभाग, बँकेचे कर्ज मिळाले का... इत्यादी.
- आज मागे वळून पाहताना काय वाटते, पुढचा कोणता पल्ला अजून गाठायचा आहे?
- इतर शेतकरी स्त्रियांना आणि पुरूषांना या स्त्रियांच्या प्रयत्नांच्या कथनातून कोणती प्रेरणा मिळेल?
- कृषि खात्याने या स्त्रियांना केलेली वैशिष्ट्यपूर्ण मदत कोणती आहे?
- या स्त्रियांच्या अनुभवातून मिळणारे धडे इतर शेतकरी स्त्रियांना अंमलात आणता येतील का, कसे?
- या स्त्रियांच्या कथेतून जेंडर मेनस्ट्रीमिंग कसे अभिव्यक्त होते
- .......
- .......

हे सत्र परिणामकारक होण्यासाठी प्रशिक्षक, शेतकरी स्त्रिया आणि मुलाखत घेणारे कृषि खात्याचे कर्मचारी यांनी पूर्वतयारी करणे गरजेचे आहे. सत्र सुलभीकरण्यादरम्यान आवश्यकतेनुसार खालील प्रातिनिधिक यशोगाथांचा देखील आपण वापर करू शकता.

## १५.१ यशोगाथा - सावित्रीबाई फुले शेळी उत्पादक कंपनी

# एकतेची ताकद

राज्याच्या ग्रामीण भागातील बहुतांश कुटुंबाची अर्थव्यवस्था ही शेतीवर आधारीत आहे. तथापी बदलत्या परिस्थितीत केवळ शेतीवर उपजिविका करणे हे एक मोठे आव्हान ठरत आहे. याशिवाय बदलत्या हवामानाचा परिणाम देखील शेती क्षेत्रावर होताना दिसतो. या पार्श्वभूमीवर शेती सोबतच पूरक व्यवसाय समुह पातळीवर उभा करून तो शाश्वतपणे चालविणे सहाय्यभूत ठरेल. सदर बाब विचारात घेऊन दोडी बु. ता. सिन्नर जि. नाशिक येथील जवळपास २५०० महिलांनी एकत्रित येऊन सावित्रीबाई फुले शेळी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून सुरूवातीस शेळीचे दुध, मांस, कातडी व सेंद्रीय खत संकलन व एकत्रित विक्रीस प्रारंभ केला आहे.

### कंपनीच्या जमेच्या बाजू

- स्थानिक महिलांचा शेळी पालनातील अनुभव ही जमेची बाजू
- मुळात शेळी ही निरोगी, सुदृढ व आजाराला बळी न पडणारा दणकट व दमदार प्राणी
- शेळीचे संगोपन इतर पाळीव प्राण्यांच्या तुलनेत सोपे आहे
- उत्पादनाच्या मागणीत सातत्यामुळे इतर व्यवसायाच्या तुलनेत कमी जोखीम




कंपनी आज शेळीच्या दुधावर प्रक्रिया करून चीज देखील तयार करते व ते निश्चित केलेल्या खरेदीदारास विकत आहे. कंपनीचे हे काम कौतुकास्पद असून दुष्काळीभागात केवळ शेतीवर अवलंबून न राहता पूरक व्यवसायातून देखील आर्थिक उन्नती साधता येते हेच सावित्रीबाई फुले शेळी उत्पादक कंपनीने दाखवून दिले आहे.

## १५.२ यशोगाथा - कळंब महिला शेतकरी उत्पादक कंपनी लि.

# टीम वर्क मुळे कळंब गावातील महिला बाजारपेठेशी जोडल्या



शेती क्षेत्रात महिलांचे योगदान हे उल्लेखनीय आहे. शेतीत विशेषत: पेरणीपासून काढणीपर्यंत महिलांचा सक्रिय सहभाग असतो (मुख्यत: पेरणी, निंदणी, कापणी इ. कामे) तथापी काढणीपश्चात कामात, प्रक्रिया उद्योगात, शेतमाल विक्रीत इ. मध्ये मात्र त्याचा सहभाग हा नगण्य आहे. वाढते शहरीकरण, ग्राहकांची शेतमालाप्रती बदलत चाललेली मागणी, बदलते हवामान, बदलती जीवनशैली इत्यादी बाबींचा विचार करता भविष्यात केवळ शेती करणे परवडणारे नाही. यासाठी दर्जेदार उत्पादनासोबतच शेतमालाचे संकलन, साफसफाई, प्रतवारी, प्रक्रिया, सामुहिक विक्री इ. बाबींवर देखील काम करणे गरजेचे आहे. याचाच विचार करून कळंब गावातील जिल्हा यवतमाल शेतकरी महिलांनी कळंब महिला शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना केली व शेतमालाच्या काढणी पश्चात शेतमालाचे संकलन आणि विक्री क्षेत्रात फिनिक्स भरारी घेतली आहे.

पारंपारिकरित्या हे काम बहुतांश ठिकाणी पुरक मंडळी विशेषत: आडत्या दलाल किंवा व्यापारी / प्रक्रिया उद्योजक करताना दिसतो. परंतु कळंब गावातील महिलांनी एकत्रित येऊन काढणीपश्चात शेतमालाचे संकलन व सामुहिक विक्री करण्याचे काम सुरू केले. कंपनी मुख्यत: सोयाबीन, तुर, ज्वारी, भुईमुग, कापुस इत्यादी पिकामध्ये काम करते. कंपनीने जवळपास २००० महिला सभासद असून वरील धान्याचे संकलन, प्रतवारी व एकत्रित विक्री करणे यासाठी आवश्यक मशनरी कंपनीने कळंब गावात स्थापित केली तसेच आवश्यक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून कामास प्रारंभ केला. मागील वर्षी कंपनीची उलाढाल २.२५ कोटी होती.

मित्रहो, महिला देखील काढणीपूर्व कामासोबतच काढणी पश्चात कामात देखील उल्लेखनीय काम करू शकतात व शेतकरी सभासदांना निव्वळ नफा वाढवू शकतात हेच जणू या उदाहरणातून आपणास समजते. कंपनीने केलेले हे काम सर्व ग्रामीण भागातील महिला पुरुष शेतकऱ्यांना दिशादर्शक आहे.

******

# प्रकरण १६ सत्र २.७ कृषि मूल्यसाखळीच्या मुख्य प्रवाहात महिला

**या प्रकरणात आपण पुढील मुख्य मुद्दे शिकणार आहोत**

- कृषि मूल्यसाखळी ही संकल्पना.
- कृषि मूल्यसाखळीत स्त्रियांच्या सहभागामध्ये येणाऱ्या अडचणी व त्यावरच्या उपाययोजना.

**सत्राची रूपरेषा**

| घटक / मुद्दा | तपशील |
|---|---|
| सत्राची उद्दिष्टे: | • कृषिमूल्यसाखळी ही संकल्पना स्पष्ट होणे.<br>• कृषिमूल्यसाखळीत स्त्रियांच्या सहभागामध्ये येणाऱ्या अडचणी व त्यावरच्या उपाययोजना यासंबंधी अधिक माहिती मिळणे. |
| कालावधी: | ६० मिनिटे |
| पद्धत: | • प्रशिक्षकाने माहिती देणे<br>• मोठ्या गटांत चर्चा<br>• छोट्या गटांत अभ्यास<br>• मोठ्या गटात सादरीकरण |
| आवश्यक साहित्य: | प्रेझेंटेशन, लॅपटॉप, प्रोजेक्टर, चार्ट्स, मार्कर्स, सेलोटेप अथवा पिन्स |

**सत्र संचालनाची प्रक्रिया**

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| ०० - ०५ | कृषिमूल्यसाखळी म्हणजे काय |
| ०५ - १५ | एका पिकाची कृषिमूल्यसाखळी सोदाहरण स्पष्ट करणे |
| १५ - २५ | वरील कृषिमूल्यसाखळीत स्त्रियांचा सहभाग यावर चर्चा |
| २५ - ४० | छोट्या गटांत एका पिकाची कृषिमूल्यसाखळी तयार करणे आणि त्यात महिलांचा सहभाग कसा वाढवता येईल यासंबंधी चर्चा |
| ४० - ५५ | गटांचे सादरीकरण आणि त्यातील समान मुद्द्यांवर चर्चा |
| ५५ - ६० | प्रश्नोत्तरे, शंकानिरसन |

**सत्र संचालनासाठी आवश्यक माहिती**

**क. कृषिमूल्यसाखळी म्हणजे काय?**

ढोबळमानाने मूल्यसाखळी म्हणजे शेतमालाच्या उत्पादकापासून ते अंतीम खरेदीदारापर्यंत सर्व कार्यांची व ती कार्ये करण्याच्या सर्व भागधारकांची साखळी होय. या साखळीत वस्तू/शेतमाल पुढे सरकताना त्याची

मालकी एका भागधारकापासून दुस्ऱ्या भागधारकाकडे जाते तसेच त्यात काही सुधारणा देखील होते व त्यामुळे त्याच्या किंमतीत वाढ (मूल्यवृध्दी) होते.

मूल्यसाखळी म्हणजे एकमेकांना पूरक कार्यांची अशी साखळी ज्यामुळे वस्तुच्या किंमतीत वृध्दी होते. यात अशी कार्ये व ती कार्ये करणाऱ्या भागधारकांचा समावेश असतो ज्यांच्यामुळे वस्तूमध्ये सुधारणा होते तसेच उत्पादक प्रक्रिया उद्योग आणि बाजाराशी जोडले जातात.

### ख. कृषि मूल्यसाखळीत कोण काय करते?

मूल्यसाखळीमध्ये उत्पादकापूर्वी कृषि निविष्ठा पुरवठादार (उदा.बियाणे औषधे व खते उत्पादक कंपन्या आणि विक्रेते) त्यानंतर शेतमालाचा उत्पादक म्हणून शेतकरी, पुढे शेतमाल तयार झाल्यावर काढणीनंतर विक्रीसाठी बाजारात न्यावा लागतो त्यामुळे वाहतूकदार व बाजारातील इतर सर्व घटकांचा ज्यामध्ये आडते व ठोक व्यापारी यांचा समावेश होतो. त्यानंतर शेतमालावर प्रत्यक्ष प्रक्रिया करणारे प्रक्रिया उद्योजक, शेतमाल निर्यात करणारे निर्यातदार असतात. त्याहून पुढे मालाची विक्री सुलभ करण्यासाठी घाऊक व किरकोळ व्यापारी आणि शेवटी अंतिम खरेदीदार (म्हणजे शेवटचा ग्राहक) ज्यांना या शेतमालाची आवश्यकता आहे त्याचा समावेश असतो. याशिवाय या सर्व प्रवासात आवश्यक अर्थसहाय्य करणाऱ्या बँका,विमा कंपन्या, प्रशिक्षण देणाऱ्या संस्था इ.चा देखील समावेश असतो. वरील सर्व भागधारक मूल्यसाखळीत कोणत्या ना कोणत्या कार्यासाठी जबाबदार असतात. सर्वसाधारणपणे कृषि मूल्यसाखळीत समाविष्ट असणारे प्रमुख भागधारक व त्यांचे कार्य दर्शविणारा तक्ता खाली दिला आहे.

| क्र. | भागधारक | कार्ये |
|---|---|---|
| १ | **निविष्ठा उत्पादक कंपन्या** | • दर्जेदार शेतमालाच्या उत्पादनासाठी कृषि निविष्ठाचे (बियाणे, कीटकनाशके, खते इ.) चे उत्पादन करणे<br>• शेतकऱ्यांमध्ये वरील उत्पादनाचा अवलंब करण्यासाठी प्रचार प्रसार करणे व आवश्यकतेनुसार तांत्रिक सहाय्य करणे.<br>• स्थानिक पातळीवर वरील उत्पादने उपलब्ध करून देणे. |
| २ | **शेतकरी** | • शेतमालाचे उत्पादन करणे |
| ३ | **वहातूकदार** | • शेतमालाचे बाजारपेठेपर्यंत /खरेदीदारापर्यंत सुरक्षित वहन करणे |
| ४ | **स्थानिक शेतमाल संकलनकर्ता** | • गावपातळीवर शेतमालाचे संकलन व पुढे त्याची विक्री करणे |
| ५ | **आडते व ठोक व्यापारी** | • शेतमालाची घाऊक खरेदी, साफसफाई, प्रतवारी व पॅकींग करून शेतमालाची पुढे घाऊक विक्री करणे इ. |
| ६ | **घाऊक व किरकोळ विक्रेते** | • आवश्यकतेनुसार मालाची साफसफाई, प्रतवारी व पॅकींग करणे व पुढे शेतमालाची घाऊक विक्री करणे<br>• शेतमालाची किरकोळ विक्री करणे |
| ७ | **प्रक्रिया उद्योजक** | • कच्च्या शेतमालावर प्रक्रिया करून तयार प्रक्रियायुक्त पदार्थ / घाऊक विक्रेत्यांना/किरकोळ विक्रेत्यांना देणे |
| ८ | **निर्यातदार** | • शेतमाल निर्यात करणे |
| ९ | **अंतिम ग्राहक** | • शेतमालाचा खादयपदार्थ बनविण्यासाठी वापर व त्याचे सेवन |

**ग. स्त्रियांचा सहभाग**

कृषिमूल्यसाखळीत स्त्रियांचा सहभाग किती असतो हे तपासून पाहण्यासाठी आपण भाताचे (तांदळाचे) उदाहरण घेऊ. स्थानिक परिस्थितीनुसार या तक्त्यात थोडेफार बदल होतील. परंतु राज्यभराचे हे प्रातिनिधिक चित्र आहे असे म्हणता येते.

| क्र. | भागधारक | कार्ये | सहभाग | |
|---|---|---|---|---|
| | | | स्त्रिया | पुरूष |
| १ | **निविष्ठा उत्पादक कंपन्या** | दर्जेदार तांदूळाच्या उत्पादनासाठी कृषि निविष्ठाचे ,बियाणे) चे उत्पादन करणे (.खते इ ,किटकनाशके | X | ✓ |
| | | शेतकऱ्यांमध्ये वरील उत्पादनाचा अवलंब करण्यासाठी प्रचार प्रसार करणे व आवश्यकतेनुसार तांत्रिक सहाय्य करणे. | X | ✓ |
| | | स्थानिक पातळीवर वरील उत्पादने उपलब्ध करून देणे. | X | ✓ |
| २ | **शेतकरी** | तांदळाचे उत्पादन करणे | ✓ | ✓ |
| ३ | **वहातूकदार** | भाताचे बाजारपेठेपर्यंत/ खरेदीदारापर्यंत सुरक्षित वहन करणे | X | ✓ |
| ४ | **स्थानिक शेतमाल संकलनकर्ता (स्थानीक ॲग्रीग्रेटर)** | गावपातळीवर भाताचे संकलन व पुढे त्याची विक्री करणे | X | ✓ |
| ५ | **आडते व ठोक व्यापारी** | भाताची घाऊक खरेदी ,साफसफाई ,प्रतवारी व पॅकींग करून भाताची पुढे घाऊक विक्री करणे इ . | X | ✓ |
| ६ | **घाऊक व किरकोळ विक्रेते** | आवश्यकतेनुसार भाताची साफसफाईप्रतवारी व पॅकींग , करणे व पुढेभाताचीघाऊक विक्री करणे | X | ✓ |
| | | भाताची किरकोळ विक्री करणे | ✓ | ✓ |
| ७ | **प्रक्रिया उद्योजक** | कच्च्या भातावर प्रक्रिया करून तयार प्रक्रियायुक्त पदार्थ / घाऊक विक्रेत्यांना/किरकोळ विक्रेत्यांना देणे | ✓ | ✓ |
| ८ | **निर्यातदार** | शेतमाल निर्यात करणे | X | ✓ |
| ९ | **अंतिम ग्राहक** | शेतमालाचा खादयपदार्थ बनविण्यासाठी वापर व त्याचे सेवन | ✓ | ✓ |

कृषिमूल्यसाखळीत ज्या ज्या ठिकाणी स्त्रियांचा सहभाग नाही किंवा नगण्य आहे, तो वाढवण्यासाठी काय उपाययोजना करता येतील यावर विचारविनिमय होणे आवश्यक आहे. कृषि खात्याचे कर्मचारी सहजरीत्या करू शकतील अशा कृतींची ही काही उदाहरणे:

१. स्थानिक पातळीवर बी-बियाणे, खते इत्यादी उपलब्ध करून देण्यासाठी महिली कृषि केंद्रांना प्रोत्साहन, चालना देणे.
२. वाहतूकदारांची स्त्रियांच्या सामुदायिक उत्पादक कंपन्यांशी ओळख करून देणे, मीटिंग आयोजित करणे.
३. वाहतूकदारांशी, व्यापाऱ्यांशी, ग्राहकांशी वाटाघाटी करण्याचे कौशल्य प्रशिक्षण शेतकरी स्त्रियांना देणे.
४. गावपातळीर धान्याचे संकलन करण्यासाठी शेतकरी स्त्रियांना गोदाम उपलब्ध करून देणे.
५. प्रतवारी करण्याचे विशेष प्रशिक्षण देणे.
६. मोबाईलचा वापर करून धान्याचे वेगवेगळ्या बाजारातले भाव माहिती करून घेणे इ.

******

# प्रकरण १७ सत्र ३.१ दुसऱ्या दिवसाची उजळणी

**या प्रकरणात दुसऱ्या दिवशी पूर्ण केलेल्या प्रमुख विषयांची उजळणी कशी करावी याबाबतची माहिती देण्यात आली आहे.**

**सत्राची रूपरेषा**

| घटक / मुद्दा | तपशील |
|---|---|
| सत्राची उद्दिष्टे: | • प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी शिकलेल्या मुदद्यांची उजळणी करणे.<br>• अस्पष्ट असणाऱ्या संकल्पना परत समजावून सांगणे. |
| कालावधी: | ३० मिनिटे |
| पद्धत: | • प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून उजळणी |
| आवश्यक साहित्य: | काही नाही |

**सत्र संचालनाची प्रक्रिया**

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| ०० - २० | • पाच ते सहा प्रशिक्षणार्थींना स्वयंसेवक म्हणून समोर बोलवावे<br>• प्रत्येक प्रशिक्षणार्थीने क्रमाने दुसऱ्या दिवशीच्या सत्रांत काय काय झाले ते सांगावे. |
| २० - ३० | • स्पष्ट न झालेल्या संकल्पना पुन्हा स्पष्ट कराव्यात.<br>• प्रशिक्षणार्थींच्या प्रश्नांना उत्तरे द्यावीत. |

******

# प्रकरण १८ सत्र ३.२ स्मार्ट प्रकल्पाची जेंडर स्ट्रॅटेजी

**या प्रकरणात आपण पुढील मुख्य मुद्दे शिकणार आहोत.**

- स्मार्ट प्रकल्पाची जेंडर स्ट्रॅटेजी.

**<u>सत्राची रूपरेषा</u>**

| घटक / मुद्दा | तपशील |
|---|---|
| सत्राची उद्दिष्टे: | स्मार्ट प्रकल्पाच्या जेंडर स्ट्रॅटेजीची प्रशिक्षणार्थींना माहिती देणे |
| कालावधी: | ६० मिनिटे |
| पद्धत: | स्लाईड्सद्वारे माहिती |
| आवश्यक साहित्य: | लॅपटॉप, प्रोजेक्टर, प्रेझेंटेशन |

**<u>सत्र संचालनाची प्रक्रिया</u>**

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| ०० - १० | 'सामाजिक मूल्यांकन' अभ्यासात निदर्शनास आलेल्या बाबींची माहिती |
| १० - ५५ | **धोरणातील महत्त्वाचे मुद्दे**<br>• प्रकल्प लाभार्थी<br>• महिला शेतकरी उत्पादक संस्था - स्थापना आणि क्षमता बांधणी<br>• महिला उत्पादकांची /शेतकऱ्यांची क्षमता बांधणी<br>• कृषि विभाग अधिकारी/ कर्मचारी वृंदाची क्षमता बांधणी<br>• महिलांचा शेतजमिनीमध्ये अधिकार वाढवण्याकरिता पथदर्शी उपक्रम<br>• स्मार्ट कॉटन<br>• इतर |
| ५५ - ६० | शंकानिरसन, प्रश्नोत्तरे |

## सत्र संचालनासाठी आवश्यक माहिती

स्पर्धात्मक कृषिमूल्यसाखळीमध्ये महिलांचा सहभाग वाढविण्याकरिता प्रकल्पाने आखलेले विशेष धोरण म्हणजे प्रकल्पाची जेंडर स्ट्रॅटेजी.


महिलांचा कृषिमूल्यसाखळीतील सहभाग जाणून घेण्याच्या उद्देशाने प्रकल्पाद्वारे राज्यामध्ये 'सामाजिक मूल्यांकन' अभ्यास करण्यात आला. सदर अभ्यासामध्ये खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. विविध पिकांच्या उत्पादनांमध्ये महिलांचा सहभाग लक्षणीय आहे. परंतु त्याची औपचारिक नोंद घेतली जात नाही.

२. कृषिमूल्यसाखळीच्या काढणीपश्चात व्यवस्थापन व विपणन प्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग नगण्य आहे.
३. विविध कृषिविषयक संसाधनांपर्यंत उदा. बी-बियाणे, खते, औषधे, शेती अवजारे, विस्तार सेवा, बँकेचे कर्ज, बाजारपेठ इ. बाबतीत महिलांची पोच अत्यल्प आहे.
४. सामाजिक मूल्यांकन अभ्यासामध्ये केवळ ९ टक्के महिलांच्या नावावर शेती असल्याचे आढळून आले. महिलांच्या नावावर शेती नसल्यामुळे बँकेचे कर्ज, शासकीय योजना, गोदाम तारण पावती इत्यादी लाभापासून त्या वंचित राहात असल्याचे निदर्शनास आले. ह्याचा परिणाम म्हणून त्यांचा कृषिमूल्यसाखळीअंतर्गत उत्पादनाच्या पुढील टप्प्यांमध्ये सहभाग नगण्य दिसून आला.
५. कृषिविषयक मूल्यसाखळीच्या विविध टप्प्यांच्या निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग नगण्य आहे. कृषिविषयक काढणीपश्चात व्यवस्थापन व विपणन प्रक्रियेमध्ये प्रामुख्याने पुरूषांचे वर्चस्व असून समूहक, घाऊक विक्रेते, अधिकृत विक्रेते, किरकोळ विक्रेते, निर्यातदार इत्यादी भूमिकांमध्ये महिलांचा सहभाग अत्यल्प आहे.
६. शेतकरी उत्पादक संस्थांमध्ये भागधारक व संचालकपदी महिलांचा सहभाग २० टक्केपर्यंत मर्यादित आहे.
७. बाजार माहिती सेवांपर्यंत महिलांची पोच मर्यादित आहे.
८. कृषि उत्पादनांमध्ये महिलांचे प्रमुख योगदान असूनसुद्धा समान कामाकरता पुरूषांच्या तुलनेत कमी रोजगार दिला जातो.
९. प्रभाग संघ व लोकसंचिलत साधन केंद्र यांचा कृषि आधारित उत्पादन, एकत्रीकरण, काढणीपश्चात व्यवस्थापन व विपणन याबाबत महिलांचा अनुभव मर्यादित आहे.

पशुधन मूल्यसाखळीमध्ये, कृषि उत्पादन व प्राथमिक प्रक्रिया उद्योगांमध्ये महिलांचा बहुतांश सहभाग आहे. सदर महिलांचा काढणीपश्चात व्यवस्थापन व विपणन प्रक्रियेमध्ये सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने स्पर्धात्मक कृषिमूल्यसाखळीमध्ये सहभागी होण्याकरिता त्यांना सक्षम बनविणे याकरता प्रकल्पाने विशेष धोरण तयार केले आहे. सदर धोरणामध्ये खालील बाबींचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

**अ. प्रकल्प लाभार्थी**



## ब. महिला उत्पादकांची शेतकरी उत्पादक संस्था स्थापन करणे व स्पर्धात्मक मूल्यसाखळीमध्ये सहभागी होण्याच्या अनुषंगाने क्षमता बांधणी करणे.

प्रकल्पामध्ये सहभागी होणाऱ्या एकूण समुदाय आधारित संस्थांपैकी किमान ४०० संस्था ह्या महिलाभिमुख असणार आहेत. यामध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व महिला आर्थिक विकास महामंडळ यांनी स्थापन केलेले प्रभाग संघ व लोकसंचालित साधन केंद्र यांचा समावेश असेल. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व महिला आर्थिक विकास महामंडळ यांनी स्थापन केलेले प्रभाग संघ व लोकसंचालित साधन केंद्र यांमध्ये शेती असणारे व बिगर शेती असणाऱ्या सदस्यांचा समावेश आहे. हे सभासद विविध शेती व बिगर शेती आधारित उपजीविका उपक्रमांमधून अर्थार्जन करत आहेत. त्याकरिता महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व महिला आर्थिक विकास महामंडळ यांचेमार्फत त्यांची क्षमता बांधणी करणे, त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे तसेच त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्याकरिता प्रयत्न केले जात आहेत. प्रकल्पाच्या स्पर्धात्मक मूल्यसाखळीमध्ये सहभागी होण्याकरता सदर सदस्यांतून शेती करणाऱ्या कुटुंबातील महिला सदस्यांना एकत्रित करून प्रकल्पामार्फत ४०० शेतकरी महिला उत्पादक संस्था स्थापन करण्यात येतील. सदर स्थापन झालेल्या संस्थांचे प्रभावीपणे कामकाज करण्याच्या अनुषंगाने त्यांच्या प्रशिक्षण गरजा ओळखून त्याआधारे त्यांची विविध विषयांवर क्षमता बांधणी केली जाईल. तसेच बाजारपेठेभिमुख उत्पादन करणे, काढणीपश्चात व्यवस्थापन, विपणन, माहिती सेवा याबाबतही ह्या संस्थांची क्षमता बांधणी केली जाईल.

## क. महिला उत्पादकांची/शेतकऱ्यांची क्षमता बांधणी

उपप्रकल्पांमध्ये समाविष्ट होणाऱ्या शेतकरी उत्पादक संस्थेमधील महिला भागधारक यांचा काढणीपश्चात व्यवस्थापन व विपणन प्रक्रियेतील अनुभव मर्यादित आहे. तसेच त्यांचा निर्णयप्रक्रियेतही सहभाग नगण्य आहे. त्यामुळे कृषि आधारित मूल्यसाखळीच्या विविध घटकांच्या अनुषंगाने क्षमता बांधणी उदा. बाजारपेठभिमुख उत्पादन, काढणीपश्चात व्यवस्थापन व विपणन, बाजार माहिती सेवा, नेतृत्वगुण इत्यादी करण्यावर प्रकल्पातून विशेष भर दिला जाणार आहे. सदर क्षमता बांधणी घटकांमध्ये विविध अभ्यास दौरे, शेती शाळा, कृषिविषयक प्रात्यक्षिके, प्रशिक्षण इत्यादींचा समावेश असेल.

## ड. कृषि विभाग अधिकारी / कर्मचारी वृंदाची क्षमता बांधणी

कृषि विभाग हा या प्रकल्पाकरीता शिखर संस्था असून कृषि विभाग हा प्रामुख्याने “कृषि विस्तार सेवा” च्या माध्यमातून शेती उत्पादन वाढवण्याकरिता कार्यरत आहे. सदर विभागामध्ये गावपातळीपासून ते राज्यपातळीपर्यंत अधिकारी व कर्मचारी वृंदाचे जाळे कार्यरत आहे. सदर प्रकल्पाअंतर्गत बाजारपेठेभिमुख उत्पादन वाढविणे व शेतकऱ्यांना बाजारपेठशी जोडणे या अनुषंगाने सर्व अधिकारी / कर्मचारी वृंदाची क्षमता बांधणी करण्यात येणार आहे. सदर क्षमता बांधणीमध्ये महिलाभिमुख खालील बाबींवर विशेष भर दिला जाणार आहे.

महिलांचा कृषि उत्पादनातील सहभाग लक्षात घेवून त्या आधारे शेती शाळा व प्रशिक्षण कार्यक्रम तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे

महिला उत्पादकांना कृषिव्यवसाय करण्याकरिता प्रोत्साहित करणे.

महिला संस्थांची कृषि विपणन अन्वेषण सेवापर्यंत पोच वाढविणे.

महिला उत्पादक, पशुसखी व कृषिसखी यांची बाजारपेठेभिमुख उत्पादन, कृषि तंत्रज्ञान, काढणीपश्चात व्यवस्थापन, विपणन, बाजार माहिती सेवा यावर क्षमता बांधणी करणे.

### इ. महिलांचा शेतजमिनीमध्ये अधिकार वाढवण्याकरिता पथदर्शी उपक्रम

महिलांच्या नावावर शेती नसल्यामुळे कृषिविषयक विविध संसाधने उदा. वित्तपुरवठा, तंत्रज्ञान, विस्तार सेवा, विविध शासकीय योजना, तारण कर्जपावती इत्यादी लाभांपासून महिला वंचित राहतात. कृषिविषयक उत्पादनामध्ये उल्लेखनीय योगदान देवूनही त्यांना शेतकरी असण्याचे फायदे मिळत नाहीत. कृषि मूल्यसाखळीच्या काढणीपश्चात उपक्रमामध्ये त्यांना गुणवत्तापूर्वक सहभाग घेता येत नाही आणि पर्यायाने याचा एकूणच कृषि घटकांवर परिणाम दिसून येतो. त्यामुळे प्रकल्पाअंतर्गत महिलांचा शेतजमिनीमध्ये अधिकार वाढविण्याकरीता प्रायोगिक तत्वावर उपक्रम राबविण्यात येणार आहे.

### ई. स्मार्ट कॉटन

स्मार्ट कॉटन उपप्रकल्पात महिला व पुरुष कापूस उत्पादक सहभागी होणार असून त्यांचे समूह तयार करुन त्यामार्फत एकसमान धाग्याचा, काडीकचरा विरहित कापूस निर्मिती करुन कापसाच्या धाग्याच्या गुणवत्तेवर आधारित कापूस गाठींचे ई-मार्केट प्लाटफॉर्मद्वारे विक्री करण्यात येणार आहे. सदर उपप्रकल्पामध्ये समाविष्ट होण्याकरीता महिलांच्या नावावर शेती नसली तरी उत्पादक महिला/शेतकरी कुटुंबातील महिलांचा समावेश करण्यात येणार आहे, जेणेकरुन नावावर शेती नसल्यामुळे महिला या प्रकल्पापासून वंचित राहणार नाहीत. या उपप्रकल्पामध्ये लीड फार्मर, प्रात्यक्षिके, प्रशिक्षण, शेतीशाळा, अभ्यास दौरा, निविष्ठा वाटप, तंत्रज्ञान या सर्व उपक्रमांत किमान ३० टक्के महिला लाभार्थी असतील.

### उ. देखरेख, मूल्यमापन आणि अहवाल सादरीकरण (Monitoring, Evaluation and Reporting)

प्रकल्पातील सर्व उपक्रमांची माहिती स्त्रिया आणि पुरूष सहभागीदार या पद्धतीने नोंदवली जाईल. म्हणजे उदाहरणार्थ शेतकरी उत्पादक संस्था स्थापन करण्यासाठी गावात पहिली बैठक झाली, तर त्यात किती स्त्रिया आणि किती पुरूष हजर होते याची नोंद ठेवली जाईल. सभा, प्रशिक्षणे, अभ्यास सहली .... अशा प्रत्येक कार्यक्रमाची स्त्री-पुरूष वर्गीकरण असलेली माहिती ठेवली जाईल. ठराविक कालावधीत किंवा ठराविक उपक्रमात किती स्त्रियांपर्यंत पोचायचे आहे याचे उद्दिष्ट ठरवले जाईल. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी योग्य प्रयत्न होत आहेत ना, सहभागी स्त्रियांची संख्या आणि त्यांच्या सहभागाची गुणवत्ता अपेक्षित पद्धतीने वाढत आहे ना याची देखरेख (सनियंत्रण) केले जाईल. अहवाल सादर करताना त्यामध्ये वरील दोन्ही मुद्द् अंतर्भूत असतील.

**ऊ. इतर**

उपप्रकल्प तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये महिलांची कृषि मूल्यसाखळीमधील भूमिका व अडचणी समजून घेण्याकरिता त्यांच्याबरोबर चर्चा करुन व त्यांच्या वेगळया गरजा लक्षात घेवून त्याप्रमाणे उपप्रकल्प तयार केले जातील.

******

# प्रशिक्षण प्रारूप (Module) ४ :

# कृषि खात्याच्या कार्यक्रमांचे जेंडर समावेशक नियोजन

# प्रकरण १९ सत्र ३.३ कृषि खात्याच्या कार्यक्रमांचे जेंडर समावेशक नियोजन

**या प्रकरणात आपण पुढील मुख्य मुद्दे शिकणार आहोत.**

- लिंगभाव समावेशक नियोजन.

## सत्राची रूपरेषा

| घटक / मुद्दा | तपशील |
|---|---|
| सत्राची उद्दिष्टे: | लिंगभाव समावेशक नियोजन |
| कालावधी: | ६० मिनिटे |
| पद्धत: | १. प्रशिक्षणार्थींची जिल्हा अथवा तालुकानिहाय गटांत ठराविक उपक्रमांचे एक वर्षाचे लिंगभाव समावेशक नियोजन करतील व सादरीकरण करतील<br>२. लिंगभाव समावेशक नियोजनासाठी मार्गदर्शक तत्त्वे सहभागी पद्धतीने तयार |
| आवश्यक साहित्य: | चाट्‌र्स, मार्कर्स, सेलोटेप अथवा पिन्स |

## सत्र संचालनाची प्रक्रिया

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| ०० -०५ | जिल्हा अथवा तालुकानिहाय गट करून त्यांच्याकडून अपेक्षित असलेली कृती स्पष्ट करणे |
| ०५ - २५ | छोट्या गटांत वर्षभराचे लिंगभाव समावेशक नियोजन करणे. त्यासाठी पुढीलप्रमाणे उपक्रम निवडावेत. हे सर्व उपक्रम शेतकऱ्यांसाठी असले पाहिजेत. गरजेनुसार या यादीत योग्य तो बदल करावा.<br>१. शेतीशाळा<br>२. शेतकरी उत्पादक संस्थेची स्थापना प्रक्रिया<br>३. अभ्यास सहल<br>४. जैविक उत्पादनांबाबतचे प्रशिक्षण<br>५. कीटकनाशके आणि खते यांची माहिती देण्यासाठीची बैठक |
| २५ - ४५ | गटांचे सादरीकरण |
| ४५ - ५५ | लिंगभाव समावेशक नियोजनासाठी मार्गदर्शक तत्त्वे सहभागी पद्धतीने तयार |

**सत्र संचालनासाठी आवश्यक माहिती**

गावपातळीवर कृषि खाते शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रम करते. आपण दोन दिवस जी चर्चा केली त्यातून असे दिसते की स्त्रियांचा काढणीपश्चात व्यवस्थापन, विक्री, आणि निर्णयप्रक्रिया यांतला सहभाग वाढवण्यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न होणे गरजेचे आहे.

लिंगभाव संकल्पना, लिंगभाव विश्लेषण संकल्पना आणि त्याचे साधने आपण आपल्या कार्यक्रमांच्या नियोजनात परिणामकारक रीत्या वापरून स्त्रियांचा सहभाग वाढवू शकतो. शेतीशाळा, शेतकरी उत्पादक संस्थेच्या स्थापनेची प्रक्रिया, अभ्यास सहल, जैविक उत्पादनांचे प्रशिक्षण, कीटकनाशके आणि खते यांची माहिती देण्यासाठीची बैठक अशी काही उदाहरणे घेऊन आपण प्रशिक्षणात चर्चा केली. परंतु हे मुद्दे केवळ प्रशिक्षणापुरते न राहता त्यांचा वापर आपण आपल्या नियोजनात, देखरेखीत आणि मूल्यमापनात केला पाहिजे.

**लिंगभाव समावेशक नियोजनासाठी काही मुद्दे**

- किती स्त्रियांपर्यंत पोचायचे आहे त्याचे उद्दिष्ट ठरवा. अधिकाधिका स्त्रियांपर्यंत पोचण्यासाठी तुम्ही काय प्रयत्न कराल? आपण उद्दिष्ट साध्य करत आहोत ना याची सातत्याने देखरेख (मॉनिटरिंग) करा. ठरवलेल्या पद्धतीचा अवलंब करून सहभागी स्त्रियांची संख्या वाढत नसेल तर वेगळे प्रयत्न करा.
- कार्यक्रमाचा अथवा उपक्रमाचा जो विषय आहे त्याबाबतीत स्त्रिया आणि पुरूष यांच्या कामाच्या विभागणीची माहिती करून घेणे.
- या विषयाबाबत कोणकोणते छोटे-मोठे निर्णय घ्यावे लागतात आणि ते कोण (स्त्रिया-पुरूष) घेते याबाबत माहिती करून घेणे.
- या विषयासाठी कोणते तंत्रज्ञान वापरले जाते आणि ते कोण (स्त्रिया-पुरूष) वापरते याची माहिती करून घेणे.
- ही माहिती स्त्रिया आणि पुरूष अशा दोन्ही गटांशी चर्चा करून मिळवावी.
- कार्यक्रमाचे नियोजन स्त्रिया आणि पुरूषांशी विचारविनिमय करून पक्के करावे.
- कार्यक्रमाची जागा आणि वेळ स्त्रियांच्या सोयीची आहे याची खातरजमा करून घ्यावी.
- कार्यक्रमात बसण्याची व्यवस्था स्त्रिया आणि पुरूषांसाठी समान असावी. सगळया स्त्रिया सतरंजीवर आणि पुरूष खुर्चीवर असे चित्र दिसू नये. खुर्च्यांची संख्या मर्यादित असल्यास ज्येष्ठ आणि आजारी लोकांनी (स्त्रिया आणि पुरूष दोघांनाही) खुर्चीवर बसण्याची सोय उपलब्ध करून द्यावी.
- बैठकीची व्यवस्था शक्यतो गोलाकार असावी. पुरूष पुढे आणि स्त्रिया मागच्या रांगेत असे असू नये.
- कार्यक्रम गावाबाहेर असेल तर कार्यक्रमाच्या ठिकाणी स्त्रियांसाठी शौचालयाची व्यवस्था उपलब्ध असावी.
- स्त्रियांबरोबर त्यांची लहान मुले आल्यास त्याबद्दल स्त्रियांवर आरडाओरड करू नये.

- कार्यक्रमाचे नियोजन आटोपशीर असावे. कार्यक्रम ठरलेल्या वेळी सुरू व्हावा आणि ठरलेल्या वेळी संपावा म्हणजे स्त्रियांना त्यांच्या कामाचे नियोजन व्यवस्थित करता येते.
- कार्यक्रमात स्त्रियांना त्यांचे विचार व्यक्त करण्यासाठी योग्य ते वातावरण निर्माण करावे. निर्णय घेताना स्त्रियांचा सहभाग असावा.
- कार्यक्रमात माहिती देताना क्लिष्ट आणि तांत्रिक भाषा टाळावी. सोप्या भाषेत माहिती सांगावी.
- माहिती देताना अमूक एक काम स्त्रियांचे आहे आणि तमूक काम पुरुषांचे आहे अशी भूमिका घेऊ नये.
- प्रत्येक कार्यक्रमातील उपस्थितांची संख्या नोंदवताना किती स्त्रिया आणि किती पुरूष उपस्थित होते ते नोंदवावे.
- गरज भासेल तेव्हा स्त्रियांसाठी वेगळे प्रशिक्षण, अभ्यास दौरे, आणि विस्तारसेवा कार्यक्रम आयोजित करावेत.

******

# प्रकरण २० सत्र ३.४ कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ - (प्रतिबंध, मनाई, आणि निवारण): अधिनियम २०१३

**या प्रकरणात आपण पुढील मुख्य मुद्दे शिकणार आहोत.**

- कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ अधिनियम २०१३ या कायद्याची ओळख.
- कायद्याने केलेली लैंगिक छळाची व्याख्या.
- कार्यालयीन समितीचे कामकाज.

**<u>सत्राची रूपरेषा</u>**

| घटक / मुद्दा | तपशील |
|---|---|
| सत्राची उद्दिष्टे: | • कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई, आणि निवारण) - अधिनियम २०१३ या कायद्याची ओळख होणे.<br>• कायद्याने केलेली लैंगिक छळाची व्याख्या स्पष्ट होणे. |
| कालावधी: | ७५ मिनिटे |
| पद्धत: | पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन |
| आवश्यक साहित्य: | लॅपटॉप, प्रेझेंटेशन, प्रोजेक्टर |

**<u>सत्र संचालनाची प्रक्रिया</u>**

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| ०० -०५ | • प्रशिक्षणार्थींना या कायद्याविषयी काय माहिती आहे ते विचारणे.<br>• या कायद्याची माहिती असणे का आवश्यक आहे ते सांगणे. |
| ०५ - १५ | पार्श्वभूमी, कायद्याचा हेतू, लैंगिक छळाची व्याख्या |
| १५ -४५ | अंतर्गत तक्रार निवारण समिती - उद्दिष्ट, रचना, समितीच्या जबाबदाऱ्या, तक्रार दाखल करण्याची आणि चौकशीची प्रक्रिया, अपील, आस्थापनाच्या जबाबदाऱ्या |
| ४५ -६५ | प्रशिक्षणार्थींचे पुरूष आणि महिला असे दोन गट करावेत. प्रशिक्षकांनी दोन वेगळ्या गटांत पुढील मुद्द्यांवर चर्चा करावी.<br>• तुमच्या कार्यालयात अंतर्गत तक्रार निवारण समिती आहे का?<br>• या समितीचे सदस्य कोण आहेत हे तुम्हाला माहिती आहे का?<br>• लैंगिक छळाच्या विरोधातील दंडात्मक तरतुदी आणि अंतर्गत तक्रार निवारण समितीसंबंधी माहिती कामाच्या ठिकाणी मोक्याच्या जागेवर प्रदर्शित केली आहे |

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| | का?<br>• या समितीच्या सभा होतात का?<br>• या समितीने मागच्या वर्षभरात किती जागरूकता कार्यक्रम घेतले?<br>• कार्यालयातील सहकारी स्त्रीचा लैंगिक छळ होत आहे असे दिसल्यास तुम्ही काय कराल? |
| ६५ - ७५ | प्रश्नोत्तरे, शंकानिरसन |

**सत्र संचालनासाठी आवश्यक माहिती**

**कामाचे ठिकाण म्हणजे काय?**

कामाचे ठिकाण म्हणजे अशा सर्व जागा की ज्याठिकाणी माणसे उत्पादन करतात, सेवा पुरवतात किंवा विक्री करतात. शासकीय, निमशासकीय, शासनपुरस्कृत, स्थानिक स्वराज्य संस्था, कंपनी, महामंडळ, सहकारी संस्था, सामाजिक संस्था, उद्योग, कार्यालय, रूग्णालय, विश्रामगृह, वित्त पुरवठा कंपनी, गोदाम, व्यायामशाळा, शैक्षणिक संस्था, स्टेडियम .... ही सर्व कामाची ठिकाणे आहेत. एखादे कार्यालय घरातून काम चालवत असेल तर ते घरही कामाचे ठिकाण आहे. कृषि खात्याची विविध कार्यालये ही या व्याख्येनुसार कामाची ठिकाणे आहेत. अशा कामाच्या सर्व ठिकाणांना हा कायदा लागू आहे.

**कायद्याची पार्श्वभूमी**

राजस्थानमधील श्रीमती भवरीदेवी १९८५ पासून राज्य सरकारच्या महिला विकास कार्यक्रमात ‘साथिन’ म्हणून काम करत होती. गावागावात जाऊन साफसफाई, कुटुंबनियोजन, मुलींना शाळेत पाठवण्याचे फायदे, हुंडाबंदी, बालविवाह थांबवणे अशा विषयांवर भवरीदेवी स्त्रियांशी बोलत असे. भवरीदेवीचे गाव राजधानी जयपूरपासून केवळ पन्नास किलोमीटर अंतरावर आहे.

राजस्थानमध्ये बालविवाहाची प्रथा होती - आजही आहे. अगदी पाळण्यातल्या मुलींचीही लग्नं लावली जात होती. १९९२ मध्ये गावातील गुजर जमातीच्या एका अल्पवयीन बालिकेचे लग्न थांबवण्याचा प्रयत्न भवरीदेवीने केला होता. गुजर हा त्या भागातला उच्चवर्णीय समूह तर भवरीदेवी दलित. गुजर बालिकेच्या कुटंबातील संतापलेल्या पुरूषांनी भवरीदेवीच्या पतीला मारहाण केली आणि त्याच्यासमोर भवरीदेवीवर सामूहिक बलात्कार केला तो दिवस होता २२ सप्टेंबर १९९२.

बलात्कार केलेल्या गुन्हेगारांना अटक व्हायला एक वर्ष लागले. १९९५ मध्ये न्यायालयाने आरोपींची बलात्काराच्या आरोपातून निर्दोष सुटका केली. ही सुटका करताना न्यायालयाने केलेली कारणमीमांसा वास्तवाला धरून नव्हती. न्यायालयाच्या मते गावचा प्रमुख बलात्कार करणार नाही, विविध जातींचे लोक एकत्र येऊन सामूहिक बलात्कार करणार नाहीत, ६०-७० वर्षाचे पुरूष बलात्कार करू शकत नाहीत, आपल्या नातलग पुरूषांसमोर पुरूष बलात्कार करू शकत नाहीत, उच्चवर्णीय पुरूष दलित स्त्रीवर बलात्कार करणार नाहीत (कारण ती अशुद्ध असते) इत्यादी.

न्यायालयाच्या या निर्णयावर देशातल्या स्त्री संघटनांनी आवाज उठवला. बलात्कार कामाच्या ठिकाणी झालेला नसून शेतात म्हणजे खाजगी जागेत झालेला असल्याने त्यात आमची काही जबाबदारी नाही अशी भूमिका राज्य शासनाने सुरूवातीला घेतली होती. पण नंतर राज्य शासनाने उच्च न्यायालयाकडे आधीच्या न्यायालयीन निर्णायावर दाद मागितली.

राजस्थानमधल्या 'विशाखा' या स्त्रियांसाठी काम करणाऱ्या संस्थेने 'कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळापासून स्त्रियांना संरक्षण मिळाले पाहिजे' अशा आशयाची याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. १९९७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने कामाच्या ठिकाणी महिलांना लैंगिक छळापासून संरक्षण मिळावे म्हणून मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली. 'विशाखा मार्गदर्शक तत्त्वे (गाईडलाईन्स)' या नावाने ही तत्त्वे ओळखली जातात. एप्रिल २०१३ मध्ये भारतीय संसदेने याविषयीचा कायदा संमत केला. ९ डिसेंबर २०१३ रोजी हा कायदा अंमलात आला.


**कायद्याचा हेतू**

या कायद्याचे तीन मुख्य हेतू आहेत.

क. **प्रतिबंध -** पूर्व नियोजन आणि वेळेत कृती करून कामाच्या ठिकाणी होणाऱ्या महिलांच्या लैंगिक छळाच्या घटना रोखणे.

ख. **मनाई -** कामाच्या ठिकाणी होणाऱ्या महिलांच्या लैंगिक छळास मनाई आहे याविषयी सर्व कर्मचाऱ्यांना स्पष्ट कल्पना असणे.

ग. **निवारण -** आवश्यक ती काळजी घेऊनही कामाच्या ठिकाणी एखाद्या स्त्रीचा लैंगिक छळ झाल्यास त्याचे त्वरित निवारण करणे.



**'लैंगिक छळ' म्हणजे काय?**

लैंगिक छळामध्ये स्त्रीच्या इच्छेविरूद्ध केल्या जाणाऱ्या लैंगिक स्वरूपाच्या कृतींचा समावेश होतो. या लैंगिक कृती प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अशा दोन्ही प्रकारच्या असू शकतात. स्त्रीच्या इच्छेविरूदध केलेल्या खालील सर्व कृती लैंगिक छळ गणल्या जातात. या कृती संबंधित स्त्रीच्या संमतीविना केल्या असल्यास त्या लैंगिक छळ आहेत. कर्त्याचा हेतू महत्त्वाचा नसून त्याचा होणारा परिणाम महत्त्वाचा आहे. एका स्त्रीला ज्या गोष्टी त्रासदायक वाटल्या नाहीत त्या गोष्टी दुसऱ्या स्त्रीला त्रासदायक वाटू शकतात.

'क्ष' स्त्रीला अमुक एका गोष्टीचा त्रास होत नाही आणि 'य' स्त्रीला मात्र कसा त्रास होतो ही चर्चा अनावश्यक आहे हे यावरून तुमच्या लक्षात आले असेल.

- **शारीरिक लैंगिक कृती -** स्पर्श, जवळीक, शरीर संबंधांची मागणी, शरीर संबंध, कुरवाळणे, पाठ थोपटणे, हात लावणे, चिमटे घेणे इत्यादी
- **लैंगिक स्वरूपाचे बोलणे -** स्त्रीला उद्देशून लैंगिक शब्द वापरणे (जसे की आयटम, चिकणी), पेहरावावर अश्लील बोलणे, लैंगिक अवयवांबद्दल बोलणे, शिट्टी वाजवणे, अश्लील विनोद करणे, अश्लील बोलणे, द्व्यर्थी शब्द उच्चारणे, अश्लील गीत गाणे, स्वत:च्या किंवा पत्नीच्या लैंगिक जीवनाबद्दल चर्चा करणे इत्यादी
- **लैंगिक हावभाव -** लैंगिक इशारे करणे, हातवारे करणे, डोळा मारणे, इत्यादी
- **लैंगिक स्वरूपाचा संवाद -** वारंवार वा वेळीअवेळी वा विनाकारण मेसेज पाठवणे, लैंगिक गोष्टींचा उल्लेख करून पत्र अथवा इमेल पाठवणे, काम सोपे व्हावे म्हणून लैंगिक सुखाची मागणी करणे, इत्यादी
- **लैंगिक साहित्य किंवा तशी सामग्री दाखवणे -** अश्लील फिल्म, पुस्तके, फोटो दाखवणे,
- **कामामध्ये लुडबुड करणे -** एखाद्या स्त्रीला आकर्षित करण्यासाठी तिच्याकडे अवाजवी लक्ष देणे, किंवा तिच्याकडे साफ दुर्लक्ष करणे, तिला अपमानास्पद वागणूक देणे, तिच्याबद्दल शंकाकुशंका पसरवणे, ज्यामुळे स्त्रीला कामाच्या ठिकाणाची भीती वाटू लागेल असे वागणे.

**पीडित महिला**

पूर्ण वेळ, अर्ध वेळ, सल्लागार, कॉन्ट्रॅक्टवर असणाऱ्या, पगारी, ऐच्छिक काम करणाऱ्या स्त्री कर्मचारी अशा संबंधित कार्यालयात काम करणाऱ्या सर्व स्त्रिया कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ झाल्यास तक्रार करू शकतात. कार्यालयात काम करणारी स्त्रीच फक्त पीडित स्त्री असते असे नाही. कामाच्या ठिकाणी भेट देणारी, ग्राहक म्हणून आलेली कोणतीही स्त्री तिचा लैंगिक छळ झाल्यास तक्रार करू शकते. कामाच्या ठिकाणी संपर्कात येणारी स्त्री तक्रार दाखल करू शकते - तिला वयाची अट नाही.

**कर्मचारी**

पूर्ण वेळ, अर्ध वेळ, सल्लागार, कॉन्ट्रॅक्टवर असणारे, पगारी, ऐच्छिक काम करणारे, ठेकेदाराने नेमलेले, रोजंदारीवर काम करणारे, प्रशिक्षणासाठी आलेले, ऑडिटसाठी आलेले ... या सर्वांना कर्मचारी म्हटले

जाते. हा ठेकेदाराचा माणूस आहे, आम्ही नेमलेला नाही असं म्हणून एखाद्या स्त्रीच्या तक्रारीबाबत आस्थापनाला हात झटकता येत नाहीत.

**अंतर्गत तक्रार निवारण समिती (Internal Complaints Committee -ICC)** *(येथून पुढे 'समिती' असा उल्लेख)*

ज्या कामाच्या ठिकाणी दहापेक्षा जास्त कर्मचारी आहेत तिथे अंतर्गत तक्रार निवारण समितीची स्थापना करावी लागते. १० पेक्षा कमी कर्मचारी असतील तर जिल्हाधिकाऱ्यांनी अशा आस्थापनासाठी 'स्थानिक कामाच्या तक्रार निवारण समिती' स्थापन करणे अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | समितीचा हेतू | कामाच्या ठिकाणी स्त्रीनिर्माण करणे आणि महिलांना पुरूष कर्मचाऱ्यांमध्ये निकोप वातावरण-.सुरक्षितपणे काम करता येईल असे वातावरण निर्माण करणे |
| २ | समितीची रचना | १. किमान चार सदस्य असावेत. किमान पन्नास टक्के सदस्य महिला असाव्यात.<br>२. पीठासीन अधिकारी (Presiding Officer) ही वरिष्ठ कर्मचारी (अधिकारी) स्त्री असावी.<br>३. कायद्याचा आणि सामाजिक कार्याचा अनुभव असलेले अन्य दोन कार्यालयीन कर्मचारी.<br>४. स्वयंसेवी संस्थेची एक सभासद जिला स्त्रियांच्या प्रश्नांवर काम करण्याचा अनुभव/ महिलांच्या लैंगिक छळाविषयी जाण आहे.<br>५. सदस्याचा कार्यकाल तीन वर्षांचा आहे. तीन वर्षांनी दुसरे सदस्य नेमावेत. |
| ३ | समितीच्या जबाबदाऱ्या | आ. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ होऊ नये, त्याला प्रतिबंध व्हावा या दृष्टीने जागरूकता कार्यक्रम घेऊन कार्यालयात महिलांच्या सुरक्षिततेसाठी योग्य वातावरण निर्माण करणे व टिकवणे.<br>इ. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ होत असल्याची तक्रार आल्यास त्याची त्वरित दखल घेणे आणि त्यावर आवश्यक ती उपाययोजना करणे.<br>ई. तीन महिन्यांतून किमान एक मीटिंग घेणे, जागरूकता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात पुढाकार घेणे.<br>उ. अहवाल - कामकाजाचा वार्षिक अहवाल आस्थापन (नियोक्ता -employer) आणि जिल्हा अधिकाऱ्यास देणे. या अहवालात पुढील माहिती असावी.<br>१. वर्षभरात किती तक्रारी प्राप्त झाल्या.<br>२. वर्षभरात किती तक्रारी निकाली काढल्या.<br>३. नियोक्त्याने केलेल्या कृती.<br>४. ९० दिवसांपेक्षा जास्त काळ प्रलंबित असलेल्या तक्रारी.<br>५. लैंगिक छळाच्या विरोधात किती जागरूकता कार्यक्रम, कार्यशाळा इत्यादी घेतल्या त्यांची संख्या.<br>६. तक्रारींच्या तपासाचे अहवाल. |

**समितीची तक्रार निवारणाची प्रक्रिया**

**१. तक्रार प्राप्त करणे**

अ. समितीकडे तक्रार लेखी स्वरूपात आली पाहिजे.

आ. लैंगिक छळाची घटना झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत तक्रार आली पाहिजे.

इ. तक्रार दाखल करण्यास तीन महिने उलटून गेले असतील तर त्यामागची कारणे लक्षात घेऊन तक्रार दाखल करण्याची मुदत समिती वाढवू शकते.

ई. एखाद्या महिलेला तक्रार कशी करायची याविषयी पुरेशी माहिती नसेल तर समितीच्या सदस्यांनी त्या महिलेला तक्रार दाखल करण्यास वाजवी मदत करावी.

उ. एखादी महिला लैंगिक छळाच्या घटनेत मृत पावली असेल; किंवा ती महिला शारिरिक/मानसिक दृष्ट्या तक्रार करण्यास सक्षम नसेल तर तिच्या वतीने तिचे वारस तक्रार दाखल करू शकतात.

**२. तक्रारीची चौकशी**

अ. परस्परसामंजस्याने तक्रारीचे योग्य निवारण होते आहे का याची चाचपणी करणे. तडजोड करण्यासाठी तक्रारदार स्त्रीवर दबाव टाकू नये वा तिला कोणतेही आमिष दाखवू नये.

आ. परस्परसामंजस्याने तक्रारीचे निवारण करण्याची तक्रारदार महिलेची इच्छा नसेल तर समितीने तक्रार दाखल करून घेऊन चौकशी सुरू करावी.

इ. दिवाणी न्यायालयात निहित असणारे अधिकार समितीला आहेत. समितीला घटनेशी संबंधित लोकांना समितीसमोर उपस्थित राहण्यास सक्ती करण्याचे आणि त्यांनी शपथ घेऊन त्यांची चौकशी करण्याचे अधिकार आहेत. समितीने मागितलेले सर्व कागदपत्र समितीला देणे आस्थापनांवर बंधनकारक आहे. समितीस विहित असणाऱ्या सर्व बाबींची पूर्तता आस्थापनाने केली पाहिजे.

**३. चौकशी चालू असताना**

**अ. समिती पुढील शिफारसी आस्थापनाला करू शकते.**

i. पीडित स्त्रीची किंवा प्रतिवादीची बदली करणे.

ii. पीडित स्त्रीला तिच्या हक्काच्या रजांव्यतिरिक्त तीन महिन्यांपर्यंतची अधिकची रजा मंजूर करणे.

iii. समितीस आवश्यक वाटणाऱ्या अन्य सोयी-सवलती पीडित महिलेस उपलब्ध करून देणे.

आ. तक्रार दाखल झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत चौकशी पूर्ण झाली पाहिजे.

इ. तक्रारकर्ती महिला, प्रतिवादी, तक्रारीचे स्वरूप याबाबत गोपनीयता बाळगणे आवश्यक आहे. तक्रारीसंबंधात कोणतीही माहिती औपचारिकपणे वा अनौपचारिकपणाने सार्वजनिक करणाऱ्या व्यक्तीला दंड केला जाईल.

४. **चौकशीनंतर**

अ. चौकशी पूर्ण झाल्यावर दहा दिवसांत चौकशीचा अहवाल सादर केला पाहिजे.

आ. तक्रारदार महिलेने केलेली तक्रार सिद्ध होत नाही अशा निष्कर्षाप्रत समिती आल्यास संबंधित तक्रारीबाबत काही कृती करण्याची गरज नाही असे आस्थापनास कळवले पाहिजे.

इ. तक्रारदार महिलेची तक्रार रास्त आहे या निष्कर्षाप्रत समिती आल्यास ती आस्थापनाला पुढील शिफारसी देऊ शकते.

i. लैंगिक छळ ही गैरवर्तणूक आहे आणि आस्थापनाच्या सेवानियमांनुसार प्रतिवादीबाबत आवश्यक ती कृती केली पाहिजे.

ii. आस्थापनात सेवानियम नसल्यास प्रतिवादीला ताकीद देणे, चूक झाल्याची लेखी कबूली देणे, पगारवाढ आणि पदोन्नती रोखून धरणे, निलंबन करणे, समुपदेशन घेण्याची सक्ती करणे, सामुदायिक सेवेचे काम करणे... अशा शिफारसी समिती आस्थापनाला करू शकते.

iii. कलम १५ च्या तरतुदीनुसार प्रतिवादीच्या पगारातून/मजूरीतून योग्य ती रक्कम कापून घ्यावी व ती पीडित महिलेला वा तिच्या वारसांना द्यावी.

iv. समितीकडून अहवाल प्राप्त झाल्यावर आस्थापनाने साठ दिवसांच्या आत कृती करायची आहे. आस्थापनाने कृती करून त्याचा अहवाल समितीला दिला पाहिजे.

ई. तक्रारदार महिलेने द्वेषभावनेने, मुद्दाम कोणालातरी अडकवण्यासाठी खोटी तक्रार केली आहे असे समितीला आढळल्यास संबंधित महिलेविरूद्ध कृती करण्याची शिफारस समिती आस्थापनाला करू शकते. जाणूनबुजून खोटी साक्ष देणाऱ्यांविरूद्धही समिती अशी शिफारस करू शकते.

५. **अपील**

**अ.** समितीच्या चौकशीतून न्याय मिळाला नाही असे वाटल्यास पीडित स्त्री/प्रतिवादी आस्थापनाच्या सेवानियमांनुसार न्यायालयात अपील करू शकतात.

**आ.** एखाद्या पुरूषावर आरोप करण्याच्या हेतूने नाही तर पीडित महिलेला न्याय मिळावा या हेतूने अपील केले जावे.

**इ.** आस्थापनात लैंगिक छळाच्या घटना भविष्यात घडू नयेत यासाठी आस्थापनाने आवश्यक ती दक्षता घ्यावी.

**आस्थापनाच्या (नियोक्त्याच्या) जबाबदाऱ्या**

१. कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षितपणे काम करता येईल असे वातावरण निर्माण करणे.

२. अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करणे. अशी समिती स्थापन न केल्यास आस्थापनावर दंडात्मक कारवाई होऊ शकते.

३. लैंगिक छळाच्या विरोधातील दंडात्मक तरतुदी आणि अंतर्गत तक्रार निवारण समितीसंबंधी माहिती कामाच्या ठिकाणी मोक्याच्या जागेवर प्रदर्शित करावी.

४. कर्मचाऱ्यांची संवेदनशीलता वाढावी यासाठी वेळोवेळी जागरूकता कार्यक्रम आणि कार्यशाळा आयोजित करणे.

५. अंतर्गत तक्रार निवारण समितीला तक्रारीबाबत चौकशी करण्यासाठी आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा पुरवणे.

६. तक्रारीची चौकशी करताना समितीला लागणारी सर्व माहिती, कागदपत्रे पुरवणे.

७. पीडित स्त्रीने भारतीय दंड संहितेनुसार अथवा दुसऱ्या एखाद्या कायद्यानुसार तक्रार दाखल केली तर त्या कामात पीडित स्त्रीला मदत करणे.

८. प्रतिवादीवर कायदेशीर कारवाई करण्याची समितीने शिफारस केल्यास तशी कृती करणे.

९. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ करणे ही गैरवर्तणूक आहे असे सेवानियमांमध्ये स्पष्ट केले पाहिजे. अशा गैरवर्तणुकीबाबत आवश्यक ती कृती केली जाईल हे सेवानियमांमध्ये स्पष्ट केले पाहिजे.

१०. समितीने वेळोवेळी सादर केलेल्या अहवालांचा आढावा घेणे व समितीच्या शिफारसी अंमलात आणणे.

आपल्या कार्यालयाबाबत आपण पुढील मुद्द्यांचा विचार केला पाहिजे.

- तुमच्या कार्यालयात अंतर्गत तक्रार निवारण समिती आहे का?
- या समितीचे सदस्य कोण आहेत हे तुम्हाला माहिती आहे का?
- लैंगिक छळाच्या विरोधातील दंडात्मक तरतुदी आणि अंतर्गत तक्रार निवारण समितीसंबंधी माहिती कामाच्या ठिकाणी मोक्याच्या जागेवर प्रदर्शित केली आहे का?
- या समितीच्या सभा होतात का?
- या समितीने मागच्या वर्षभरात किती जागरूकता कार्यक्रम घेतले?
- कार्यालयातील सहकारी स्त्रीचा लैंगिक छळ होत आहे असे दिसल्यास तुम्ही काय कराल?

एक कर्मचारी या नात्याने या कायद्यातील तरतुदींची आणि दंडात्मक कारवाईची आपल्याला पूर्ण माहिती असणे गरजेचे आहे. समितीबद्दल तुम्हाला माहिती नसल्यास कार्यालयातील वरिष्ठांशी संपर्क साधून माहिती करून घ्यावी. आपल्या कार्यालयीन सहकारी स्त्रीचा लैंगिक छळ होत असल्यास गप्प बसू नका, तिला समितीकडे तक्रार करण्यास मदत करा. लैंगिक छळ करणाऱ्या पुरूष कर्मचाऱ्यांना पाठीशी घालू नका. आपले कार्यालयीन वातावरण निकोप राखणे, स्त्रियांसाठी सुरक्षित करणे ही व्यवस्थापनाइतकीच आपली सर्वांची जबाबदारी आहे.

******

# प्रकरण २१ सत्र ३.५ प्रशिक्षणार्थींची प्रशिक्षणातील विषयांची तयारी

**या प्रकरणात आपण पुढील मुख्य मुद्दे शिकणार आहोत.**

- सुलभीकरण कौशल्ये - प्रशिक्षणार्थींची प्रशिक्षक या नात्याने तयारी होणे.

**सत्राची रूपरेषा**

| घटक / मुद्दा | तपशील |
|---|---|
| सत्राची उद्दिष्टे: | प्रशिक्षणार्थींची प्रशिक्षक या नात्याने तयारी होणे |
| कालावधी: | ६० मिनिटे |
| पद्धत: | छोट्या गटांत दिलेल्या विषयावर सादरीकरणाची तयारी |
| आवश्यक साहित्य: | विषय लिहिलेल्या पुरेशा चिठ्ठ्या |

**सत्र संचालनाची प्रक्रिया**

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| ०० - १० | • तीन प्रशिक्षणार्थींचा एक असे गट तयार करा. साधारणपणे आठ-दहा गट होतील.<br>• खाली दिलेल्या विषयांपैकी एक विषय एका चिठ्ठीवर लिहावा आणि चिठ्ठ्या एका खोक्यात ठेवाव्यात.<br>१. लिंगभेद आणि लिंगभाव<br>२. लिंगभावाधारित भेदभाव आणि लिंगभावाधारित भूमिका<br>३. लिंगभावाधारित गरजा आणि महिलांची तिहेरी भूमिका<br>४. लिंगभाव समता आणि लिंगभाव समानता<br>५. सामाजिक समावेशन<br>६. हंगामी दिनदर्शिका<br>७. शेतीतल्या कामाचे विभाजन<br>८. २४ तासांचे घड्याळ<br>९. संसाधनांचा वापर आणि संसाधनांवर नियंत्रण<br>१०. निर्णय सहभाग<br>११. कृषि मूल्यसाखळीत महिलांचा सहभाग<br>१२. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ - प्रतिबंध, मनाई आणि निवारण कायदा<br>१३. स्मार्ट प्रकल्पाची जेंडर स्ट्रॅटेजी<br>• प्रत्येक गटाला खोक्यातून एक चिठ्ठी निवडून त्यावर सादरीकरण करण्यासाठी तयारीला वेळ द्या. काही चिठ्ठ्या शिल्लक राहतील. त्यावर प्रशिक्षकाने पुढच्या |

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| | सत्रात उजळणी घ्यावी.<br>• प्रत्येक गटाला सादरीकरणासाठी पाच मिनिटांचा वेळ मिळेल.<br>• प्रत्येक गटाचे मूल्यमापन पुढील मुद्द्यांवर होईल. हे मूल्यमापन इतर प्रशिक्षणार्थी आणि प्रशिक्षक करतील<br>○ संकल्पना स्पष्ट झाली आहे का<br>○ संकल्पना समजून सांगण्यासाठी वापरलेली पद्धत<br>○ प्रशिक्षकाची भाषा (भाषा सोपी आहे का, भाषा लिंगभाव संवेदनशील आहे का) |
| १० - ६० | प्रशिक्षणार्थी विषयाची आणि सादरीकरणाची तयारी करतील. |

*****

# प्रकरण २२ सत्र ३.६ प्रशिक्षणार्थींचे सादरीकरण

**या प्रकरणात आपण पुढील मुख्य मुद्दे शिकणार आहोत.**

- सुलभीकरण कौशल्ये - प्रशिक्षणार्थींची प्रशिक्षक या नात्याने तयारी होणे.

**सत्राची रूपरेषा**

| घटक / मुद्दा | तपशील |
|---|---|
| सत्राची उद्दिष्टे: | प्रशिक्षणार्थींची प्रशिक्षक या नात्याने तयारी झाली आहे का हे तपासून पाहणे |
| कालावधी: | ६० मिनिटे |
| पद्धत: | गटांचे सादरीकरण आणि मूल्यमापन |
| आवश्यक साहित्य: | चाट्‌र्स, मार्कर्स, सेलोटेप, पिन्स |

**सत्र संचालनाची प्रक्रिया**

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| ०० - ३५ | • दिलेल्या विषयावर गटांचे सादरीकरण.<br>• अन्य प्रशिक्षणार्थींकडून मूल्यमापन. |
| ३५ - ५० | • गटांच्या सादरीकरणात काय चांगले झाले यावर चर्चा.<br>• गटांच्या सादरीकरणात कोणत्या सुधारणा होणे गरजेचे आहे यावर चर्चा.<br>• काही संकल्पना अस्पष्ट असतील त्यावर प्रशिक्षकाने स्पष्टीकरण द्यावे. |
| ५० - ६० | • ज्या चिठ्ठ्या निवडल्या गेल्या नाहीत त्यावर प्रशिक्षकाने प्रश्न विचारून उजळणी करावी.<br>• प्रशिक्षणाचे वेळापत्रक कसे तयार करावे यासंबंधी चर्चा. |

******

# प्रकरण २३ सत्र ३.७ समारोप

**या प्रकरणात प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणातून काय शिकले हे कसे समजून घ्यावे याची माहिती देण्यात आली आहे.**

**सत्राची रूपरेषा**

| घटक / मुद्दा | तपशील |
|---|---|
| सत्राची उद्दिष्टे: | • प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणातून काय शिकले यासंबंधी जाणून घेणे<br>• प्रशिक्षण अधिक परिणामकारक होण्यासाठी प्रशिक्षणार्थींच्या सूचना जाणून घेणे. |
| कालावधी: | ६० मिनिटे |
| पद्धत: | प्रशिक्षणोत्तर चाचणी, लेखी मूल्यमापन (परिशिष्ट ७), खुले मनोगत |
| आवश्यक साहित्य: | प्रशिक्षणोत्तर चाचणीच्या प्रती, लेखी मूल्यमापनाच्या प्रती |

**सत्र संचालनाची प्रक्रिया**

| वेळ (मिनिटांमध्ये) | प्रक्रिया |
|---|---|
| ०० -१० | प्रशिक्षणोत्तर चाचणी आणि प्रशिक्षणाचे लेखी मूल्यमापन |
| १० - २५ | प्रशिक्षक म्हणून काम करण्याबाबत प्रशिक्षणार्थांना आत्मविश्वास वाटतो का, त्यांना कोणत्या मदतीची गरज आहे यावर चर्चा |
| २५ – ४५ | प्रशिक्षणार्थींचे खुले मनोगत |
| ४५ - ६० | प्रशिक्षणार्थींसाठी मार्गदर्शक पुस्तिकेचे वितरण<br>प्रशिक्षणानंतर पुढे काय यावर चर्चा |

# प्रकरण २४ परिशिष्ट

प्रशिक्षणाच्या अखेरीस प्रशिक्षणार्थींचा प्रशिक्षणासंबधी अभिप्राय नोंदविण्यासाठीचे प्रपत्र या तक्त्यात देण्यात आले आहे.

## परिशिष्ट १ प्रशिक्षणार्थींची नोंदणी आणि हजेरीपत्रक

**विषय -:---------------------------------------------**

**प्रशिक्षणार्थी नोंदीकरण पत्रक**

प्रशिक्षण स्थळ :------------------------------------------------------------------

प्रशिक्षणाचा कालावधी : / /

| क्र | प्रशिक्षणार्थींचे नाव | स्त्री /पुरूष /अन्य | पद | जिल्हा/तालुका | संपर्क क्रमांक व E-mail- | विभाग /संस्था | सही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |
| ५ | | | | | | | |
| ६ | | | | | | | |
| ७ | | | | | | | |
| ८ | | | | | | | |

**विषय -:---------------------------------------------**

## प्रशिक्षणार्थीचे दैनदिन हजेरी पत्रक

प्रशिक्षण स्थळ :------------------------------------------------------------------

प्रशिक्षणाचा कालावधी : / /

| क्र. | प्रशिक्षणार्थीचे नाव | स्त्री /पुरूष/ अन्य | विभाग | सही | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | दिवस १ | दिवस २ | दिवस ३ |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |
| ६ | | | | | | |
| ७ | | | | | | |
| ८ | | | | | | |
| ९ | | | | | | |

# परिशिष्ट २ प्रशिक्षणपूर्व / प्रशिक्षणोत्तर चाचणी

**दिनांक ..........** **स्थळ .........................**

**नाव....................................................................** *(नाव लिहिणे ऐच्छिक आहे, सक्तीचे नाही)*

**सूचना – तुमच्या उत्तरांवर '✓' ही खूण करा. प्रत्येक प्रश्नासाठी एकच पर्याय निवडा.**

**१. पुढीलपैकी कोणती कामे स्त्रियांना आणि पुरूषांना निसर्गाने दिलेली आहेत असे तुम्हाला वाटते?**

क. आर्थिक निर्णय घेणे
ख. खुरपणी करणे
ग. स्वयंपाक करणे
घ. बैलगाडी चालवणे
ङ. राजकारणात सहभागी होणे
च. वरीलपैकी एकही नाही

**२. स्त्रिया आणि पुरूषांमध्ये शेतीतले काम करण्याची क्षमता समान आहे का?**

क. हो
ख. नाही

**३. तुमच्या मते खालीलपैकी कोणत्या शब्दांत स्त्रियांचे वर्णन करता येईल ?**

क. सौम्य
ख. कठोर निर्णय घेऊ शकणाऱ्या
ग. संवेदनशील
घ. बोलक्या
ङ. कुटुंबप्रमुख
च. धाडसी
छ. नाजूक
ज. लाजाळू
झ. तर्कशुद्ध विचार करणाऱ्या
ञ. भावनिक
ट. आक्रमक
ठ. वरील सर्व शब्द वापरता येतील

**४. तुमच्या मते खालीलपैकी कोणत्या शब्दांत पुरूषांचे वर्णन करता येईल ?**

क. सौम्य
ख. कठोर निर्णय घेऊ शकणारे
ग. संवेदनशील
घ. बोलके
ङ. कुटुंबप्रमुख
च. धाडसी
छ. नाजूक
ज. लाजाळू
झ. तर्कशुद्ध विचार करणारे
ञ. भावनिक
ट. आक्रमक
ठ. वरील सर्व शब्द वापरता येतील

**५. स्त्रिया आणि पुरूष यांच्या कामाविषयी पुढीलपैकी कोणत्या एका वाक्याशी तुम्ही सहमत आहात?**

क. शेतकरी स्त्रिया शेतकरी पुरुषांपेक्षा **खूप जास्त** काम करतात.
ख. शेतकरी स्त्रिया शेतकरी पुरूषांपेक्षा **थोडेसे जास्त** काम करतात.
ग. शेतकरी स्त्रिया आणि शेतकरी पुरूष **समान** काम करतात.
घ. शेतकरी पुरूष शेतकरी स्त्रियांपेक्षा **थोडेसे जास्त** काम करतात.
ङ. शेतकरी पुरूष शेतकरी स्त्रियांपेक्षा **खूप जास्त** काम करतात.

**६. शेतकरी स्त्रियांच्या शेतीतल्या योगदानाबाबत खालीलपैकी कोणती बाब वैशिष्ट्यपूर्ण आहे?**

क. हाताने करायची कामे मुख्यत्वे स्त्रिया करतात
ख. स्त्रियांचा निर्णयप्रक्रियेतला सहभाग नाममात्र असतो
ग. स्त्रियांचे स्वत:च्या शेतीतले काम त्यांना पैसे मिळवून देत नाही
घ. काढणीपश्चात व्यवस्थापनात स्त्रियांचा सहभाग अत्यल्प असतो
ङ. समाजाच्या स्त्रीविषयक धारणांचा स्त्रियांच्या कृषी क्षेत्रातील सहभागावर परिणाम होतो
च. वरील सर्व मुद्दे

**७. 'कामाच्या ठिकाणी स्त्रियांचा लैंगिक छळ – प्रतिबंध आणि निवारण' हा कायदा कोणत्या वर्षी अंमलात आला?**

क. २००९
ख. २०१३
ग. २०१६
घ. असा काही कायदा अस्तित्वात नाही
ङ. मला माहिती नाही

**८. खालीलपैकी कोणते लिंगभावाधारित गरजांचे (जेंडर नीड्स) प्रकार आहेत?**

क. स्त्रियांना राजकीय आरक्षण आणि शेतीत प्राधान्य
ख. व्यावहारिक गरजा आणि नीतिगत गरजा
ग. आरोग्य आणि शिक्षण
घ. वरीलपैकी एकही नाही

**९. पुनरूत्पादक काम म्हणजे ....**

क. मुली-मुलांना जन्म देणे आणि संगोपन
ख. वारंवार करावे लागणारे काम
ग. ज्या कामाचे पैसे मिळत नाहीत असे काम
घ. ज्यातून नवनिर्मिती होते असे कोणतेही काम
ङ. क आणि घ
च. ख आणि ग
छ. यांपैकी एकही नाही

**१०. स्त्रिया आणि पुरूष यांच्यातील श्रमविभाजन खालीलपैकी कोणते साधन वापरून आपल्याला कळते?**

क. साधनांचा वापर आणि त्यावर नियंत्रण
ख. शेतातले काम
ग. २४ तासांचे घड्याळ
घ. निर्णयप्रक्रियेतला सहभाग
ङ. क आणि घ
च. ख आणि ग

## प्रशिक्षणपूर्व चाचणीची उत्तरपत्रिका

१. च (वरीलपैकी एकही नाही)

२. क (हो)

३. ठ (वरील सर्व शब्द वापरता येतील)

४. ठ (वरील सर्व शब्द वापरता येतील)

५. क (शेतकरी स्त्रिया शेतकरी पुरूषांपेक्षा **खूप जास्त** काम करतात)

६. च (वरील सर्व मुद्दे)

७. ख (२०१३)

८. ख (व्यावहारिक गरजा आणि नीतिगत गरजा)

९. च (ख आणि ग - वारंवार करावे लागणारे काम आणि ज्या कामाचे पैसे मिळत नाहीत असे काम)

१०. च (ख आणि ग - शेतातले काम आणि २४ तासांचे घड्याळ)

# परिशिष्ट ३ सत्र १.२ मधील दुसऱ्या खेळासाठी वापरायची वाक्ये

१. घरी रोज स्वयंपाक करणे
२. संध्याकाळी चावडीवर गप्पा मारणे
३. नांगर चालवणे
४. खुरपणी करणे
५. सासूची सेवा करणे
६. मोटरसायकल चालवणे
७. बाहुलीसोबत खेळणे
८. लग्नानंतर नाव आणि आडनाव बदलणे
९. घरातल्या सगळ्यांचे कपडे धुणे
१०. साप पकडणे
११. सण-समारंभाच्या प्रसंगी नारळ फोडणे
१२. कार्यक्रमासाठी आलेल्या पाहुण्यांना ओवाळणे
१३. बांगड्या घालणे
१४. स्तनपान देणे
१५. ट्रक चालवणे
१६. कीटकनाशकांची फवारणी करणे
१७. कृषि केंद्रातून बियाणे आणणे
१८. शेतमजूरांशी सौदा करणे (मजूरी किती द्यायची याबाबत)
१९. घरावर नाव असणे
२०. ७/१२ वर नाव असणे

## परिशिष्ट ४ पॉवर वॉक पहिल्या फेरीच्या अभ्यासासाठी विविध भूमिका आणि प्रशिक्षकाने वाचायची वाक्ये प्रशिक्षणार्थींसाठी विविध भूमिका (पात्र)

१. पदवीधर महिला (किंवा निरक्षर महिला)
२. पदवीधर  पुरूष (किंवा निरक्षर पुरूष)
३. विधवा
४. विधुर
५. महिला डॉक्टर
६. पुरूष डॉक्टर
७. महिला सरपंच
८. पुरूष सरपंच
९. दलित महिला
१०. दलित पुरूष
११. महिला हवालदार
१२. पुरूष हवालदार
१३. माध्यमिक शिक्षिका
१४. माध्यमिक शिक्षक
१५. भाजी विक्रेती महिला
१६. भाजी विक्रेता पुरूष
१७. दुकानदार स्त्री
१८. दुकानदार पुरूष
१९. महिला कंडक्टर
२०. पुरूष कंडक्टर

### पहिल्या फेरीसाठी प्रशिक्षकाने वाचायची वाक्ये

१. माझ्याकडे स्वत:चा मोबाईल फोन आहे.
२. माझे घर (किंवा माझे शेत) माझ्या नावावर आहे.
३. मी घरात रोज स्वैपाक करावाच लागतो.
४. माझी आई नेहमीसाठी माझ्या घरी राहू शकते.
५. मला ग्रामपंचायत निवडणूक लढवणे शक्य आहे.
६. मला किती मुले (मुली आणि मुलगे) हवीत आणि दोन मुलांमध्ये किती अंतर हवे याबाबत मी जोडीदारला न विचारता निर्णय घेऊ शकते /शकतो.
७. मी एकटी /एकटा चित्रपटगृहात जाऊन चित्रपट पाहू शकते /शकतो.
८. मी डेबिट कार्ड वापरते / वापरतो.
९. बाजारात जाऊन मी एकटी/एकटा महागड्या सामानाची खरेदी करू शकते /शकतो.
१०. दु:ख झाल्यास मी मनसोक्त रडू शकते /शकतो.
११. मी पोलिस स्थानकात जाऊन तक्रार करू शकते /शकतो.
१२. आई-वडिलांचे अंतिम संस्कार करण्याचा मला अधिकार आहे.

## परिशिष्ट ५. पॉवर वॉक दुसऱ्या फेरीच्या अभ्यासासाठी विविध भूमिका आणि प्रशिक्षकाने वाचायची वाक्ये प्रशिक्षणार्थींसाठी विविध भूमिका (पात्र)

१. बागाईतदार शेतकरी पुरूष
२. बागाईतदार शेतकरी महिला
३. शेतमजूर पुरूष
४. शेतमजूर महिला
५. अत्यल्प भूधारक शेतकरी पुरूष (एक हेक्टरपेक्षा कमी जमीन)
६. अत्यल्प भूधारक शेतकरी महिला (एक हेक्टरपेक्षा कमी जमीन)
७. आदिवासी शेतकरी पुरूष
८. आदिवासी शेतकरी महिला
९. छोटा शेतकरी पुरूष (एक ते दोन हेक्टर जमीन)
१०. छोटा शेतकरी महिला (एक ते दोन हेक्टर जमीन)
११. मध्यम शेतकरी पुरूष (चार ते दहा हेक्टर जमीन)
१२. मध्यम शेतकरी महिला (चार ते दहा हेक्टर जमीन)
१३. मोठा शेतकरी पुरूष (दहा हेक्टरपेक्षा अधिक जमीन)
१४. मोठा शेतकरी स्त्री (दहा हेक्टरपेक्षा अधिक जमीन)
१५. अनुसूचित जातीची शेतकरी महिला
१६. अनुसूचित जातीचा शेतकरी पुरुष

### दुसऱ्या फेरीसाठी प्रशिक्षकाने वाचायची वाक्ये

१. कृषि खात्याने आयोजित केलेल्या प्रशिक्षणांमध्ये मी सहभागी होऊ शकते / शकतो.
२. शेतीसाठी बँकेकडून मला सहज कर्ज मिळू शकते.
३. मी किसान क्रेडिट कार्ड वापरते/वापरतो.
४. मी ट्रॅक्टर चालवते / चालवतो.
५. माझ्या परिसरातल्या ‘कृषि विज्ञान केंद्रा’ला मी भेट दिली आहे.
६. जमिनीच्या सातबारा कागदपत्रावर माझे नाव आहे.
७. शेतीसाठी लागणारे बी-बियाणे मी खरेदी करते / करतो.
८. शेतात आलेले किती पीक विकायचे आणि ते कोणाला (कुठे) विकायचे याचा निर्णय मी घेते/घेतो.
९. पीक विकून आलेले पैसे बँकेतल्या माझ्या खात्यात जमा होतात.
१०. गोदामात माल पोचवायला मी जाते/जातो.

# परिशिष्ट ६ प्रशिक्षणाचे मूल्यमापन

**प्रशिक्षणाच्या अखेरीस प्रशिक्षणार्थींचा प्रशिक्षणासंबधी अभिप्राय नोंदविण्यासाठीचे प्रपत्र या तक्त्यात देण्यात आले आहे.**

प्रशिक्षणाचा मुल्यमापन अहवाल

(कृपया बरोबर चौकोनात (√) खूण करा : १-उत्कृष्ट, २-उत्तम, ३-ठिक, ४- खराब)

| क्र | तपशील | उत्कृष्ट → खराब | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ |
| **अ** | **प्रशिक्षणाची गुणवत्ता कशी होती?** | | | | |
| **अ.१** | प्रशिक्षणाच्या विषया संबंधीचा अभिप्राय. | | | | |
| १ | प्रशिक्षणा दरम्यान वापरण्यात आलेले साहित्य योग्यरीत्या कार्य करीत होते का? | | | | |
| २ | प्रशिक्षणा दरम्यान देण्यात आलेल्या प्रशिक्षण साहित्याची उपयुक्तता. | | | | |
| ३ | भविष्यामध्ये प्रशिक्षणाचा उपयोग. | | | | |
| **ब** | **साधनव्यक्ती संबंधीचा अभिप्राय** | | | | |
| १ | साधनव्यक्तीना विषयाची माहिती. | | | | |
| २ | साधनव्यक्तीची विषय मांडणी. | | | | |
| ३ | प्रात्यक्षिक | | | | |
| ४ | गट चर्चा | | | | |
| ५ | प्रशिक्षण वर्गादरम्यान प्रशिक्षणाथर्थी आणि साधन व्यक्तीमधील समन्वय. | | | | |
| **क** | **प्रशिक्षणा दरम्यानच्या सुविधा आणि व्यवस्था.** | | | | |
| १ | प्रशिक्षण वर्गातील सुविधा (स्वच्छता आणि सेवा) | | | | |
| २ | प्रशिक्षणा दरम्यान राहण्याची व्यवस्था . | | | | |

| क्र | तपशील | उत्कृष्ट → खराब | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ |
| ३ | प्रशिक्षणा दरम्यान जेवणाची व्यवस्था. | | | | |
| ४ | प्रशिक्षण वर्गादरम्यान शिस्तीचे पालन. | | | | |
| ड. | या प्रशिक्षणानंतर आपल्या कामामध्ये सुधारणा करण्यसंबंधी काहि कल्पना मिळाल्या का?<br>होय नाही असल्यास खालील बाबीमध्ये स्पष्ट करावे /? | | | | |
| १ | ज्ञान -: | | | | |
| | | | | | |
| २ | कौशल्य | | | | |
| | | | | | |
| ३ | माहिती | | | | |
| | | | | | |
| ४ | प्रशिक्षण वर्गाच्या गुणवत्ते मध्ये कशा प्रकारे सुधारणा करता येईल**?** | | | | |
| | | | | | |

# अतिरिक्त वाचनासाठी संदर्भ साहित्य


A. **स्मार्ट प्रकल्पाचे विविध अहवाल आणि प्रेझेंटेशन्स**

1. SMART Project Implementation Plan (PIP), November 2019
2. Draft ESA and ESMF – August 2019
3. Gender and Social Safeguard PPT – by Dr. Sangita Shete
4. सामाजिक व्यवस्थापन आराखडा (पॉवर पॉईंट) - डॉ. संगीता शेटे
5. जेंडर स्ट्रॅटेजी (पॉवर पॉईंट) - डॉ. संगीता शेटे

B. **हिंदी आणि मराठी पुस्तिका**

1. लडकी क्या, लडका क्या- कमला भसीन (जागोरी, १९९९)
2. पितृसत्ता क्या है - कमला भसीन
3. सात पाऊले आकाशी - कुंदनिका कपाडिआ (साहित्य अकादमी, २००९)
4. स्त्री पुरूष तुलना - ताराबाई शिंदे (सुमेध प्रकाशन, २००४)
5. लिंगभाव संचेतना प्रशिक्षण पुस्तिका - सविता कुलकर्णी (बायफ, २००५)

C. **इंग्रजी साहित्य**

1. Gender Mainstreaming and Gender Sensitization, (Agricutlure Extension Management, Block II, Unit 8, MANAGE)
2. Data Needs for Gender Analysis in Agriculture (International Food Policy Research Institute, April 2013)
3. Making the Strognest Links: A Practical Guide to Gender Analysis in Value Chain Development (Mayoux and Mackie, International Labor Organization, 2007)
4. Toolkit for Gender Analysis of Crop and Livestock Production, Technologies, and Service Provision (Improving Productivity and Market Successes, Ethiopia, 2007)
5. Business case for gender mainstreaming in cotton in Maharashtra (IDH the Sustainable Trade Initiative, 2019)
6. Enabling Gender Equity on the Cotton Farm – Gender Sensitization Training Modules (IDH the Sustainable Trade Initiative, 2021)
7. Women, Land, and Agriculture – N C Saxena (UN Women, 2012)
8. Gender Analysis (European Institute for Gender Equality, 2018)
9. Challenges and Barriers in Women's Land Entitlement – Landesa/ UN Women, 2012
10. Sexual Harrassment at Workplace Bare Act - Professional Book Publishers, 2015

STATE OF MAHARASHTRA'S AGRIBUSINESS AND RURAL TRANSFORMATION PROJECT

**SMART**

**PARTNERSHIP FOR PROSPERITY**

